# माणूस

शनिवार । २५ सप्टेंबर १९७६ । साठ पैसे

'ज्या माणसाला वैषयिक सौख्य, संपत्ती, आराम, बढती अगर स्तुती यांची गरज भासत नाही आणि योग्य वाटते तेच तो करतो, अशा माणसांशी व्यवहार करताना अधिकारपदावर असलेल्यांनी फार जपून व्यवहार करावेत. कारण तो फार जहाल आणि संत्रस्त ठेवणारा शत्रू असतो. त्याला शरीराने पकडता येईल, पण त्याचा आत्मा हाती लागणे अशक्य आहे.'

–गांधीजींबद्दल लिहिताना गिलबर्ट मरे

दोन ऑक्टोबरनिमित्त विशेष लेख

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सोळावे – अंक सतरावा**
**२५ सप्टेंबर १९७६**
**मूल्य : साठ पैसे**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
¤
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
¤


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


¤
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर यांनी** साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
¤
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
¤
दूरध्वनी : ४३४५९
¤


## सप्रेम नमस्कार

## रॉय यांचा ‘स्वप्नाळू’ मानवतावाद !

संपादक ‘माणूस’
स. न. वि. वि.

¤ माणूसचा ‘एम्. एन्. रॉय विशेषांक’ वाचला. त्यातील लेखांमध्ये मांडलेला मानवतावाद आकर्षक असला तरी अशास्त्रीय व स्वप्नाळू आहे. मानवीस्वातंत्र्य व प्रगती म्हणजे काय व त्याचा पाया काय ह्याबद्दलच्या चुकीच्या समजुतीमुळे हा स्वप्नाळ मानवतावाद उद्भवतो असे मला वाटते.

मे. पुं. रेगे त्यांच्या लेखात म्हणतात, ‘मानवी सत्त्व म्हणजे माणसाच्या नैसर्गिक प्रेरणा आणि शक्ती.’ पण मानवी सत्त्वाच्या ह्या कल्पनेमुळे माणसाच्या नैसर्गिक प्रेरणा व शक्ती व प्राण्यांच्या नैसर्गिक प्रेरणा व शक्ती ह्यांच्यातील फरक व त्याचप्रमाणे माणूस व प्राणी यांच्यातील फरक स्पष्ट होत नाही. याउलट मार्क्सची मानवी सत्त्व ह्याबद्दलची कल्पना हा फरक स्पष्ट करते व स्वातंत्र्य म्हणजे काय ह्या प्रश्नाचे शास्त्रीय विश्लेषण करू शकते. जाणीवपूर्वक केलेले, सामूहिक, सृजनशील श्रम हे माणसाचे वैशिष्ट्य त्याला प्राण्यांपासून वेगळे करते असे मार्क्स मानतो. अत्यंत नाजूक व सुबक असे जाळे कोळ्यासारखा क्षुल्लक कीटक बांधतो. पण ते जाळे विणण्याआधी तयार होणाऱ्या जाळ्याची प्रतिमा त्याच्या डोक्यात तयार नसते. कारण त्याला जाणीव (Consciousness) नसते. याउलट अगदी ओबडधोबड काम करणाऱ्या चांभाराच्या डोक्यात तो तयार करत असलेल्या वस्तूची प्रतिकृती असते व त्या ‘मेंटल इमेज’च्या बरहुकूम तो ती वस्तू बनवतो. अशा प्रकारचा ‘जाणीवपूर्वक श्रम’ हा गुणधर्म फक्त माणसातच का आहे ? कारण स्वतःच्या निर्वाहासाठी तो प्राण्यांसारखा निसर्गाशी नुसता adapt होत नाही तर निसर्गावर प्रक्रिया करून त्यात बदल घडवून आणून उत्पादनसाधने बनवतो. ह्यासाठी जाणीवेची, बुद्धीची

गरज असते. माणसाच्या वाढत जाणा
गरजांच्या पूर्ततेसाठी अधिक अधिक प्र
उत्पादनसाधने बनवत असताना माणसा
बुद्धी अधिक प्रगल्भ होत गेली, जाण
विकसित होत गेली. याउलट वाढ
जाणीवेमुळे गरजाही वाढत गेल्या. त्यांच
तील संबंध असा द्वंद्वात्मक आहे–असे अ
ल्याला मानवी इतिहासावरून दिसते. ग
हजारो वर्षे मांजराच्या जीवनपद्धतीत फ
पडलेला नाही, पण त्याच अवधीत माणस
जीवन मात्र आमूलाग्र सुधारले आहे. मा
आणि प्राणी ह्यातील ह्या फरकाचे का
‘माणूस निर्वाहासाठी उत्पादनसाधने ब
वतो व प्राणी तसे करत नाहीत’ ह्या
फक्त शोधता येते. रॉयवादी भौतिकव
मानत असतील, तर त्यांना वरील मीमां
मानावी लागेल.

### स्वातंत्र्य म्हणजे काय ?

मानवी सत्त्व (essence of man)
मानवी प्रगतीच्या ह्या कल्पनेचा व स्वातंत्र
बद्दलच्या कल्पनेचा मार्क्सवादात सुसंगत
अतूट संबंध आहे. सतत वाढत जाणा
भौतिक व सांस्कृतिक गरजांची पूर्तता म्हण
स्वातंत्र्य. आज माणूस पूर्ण स्वतंत्र न
कारण बहुसंख्य जनतेच्या वाढत्या भौतिक
सांस्कृतिक गरजा आज पूर्ण होऊ श
नाहीत. पण गुलामगिरीच्या काळापेक्षा अ
माणूस अधिक स्वतंत्र आहे. कारण गुला
गिरीतील काळापेक्षा आज माणसाच्या गर
वाढत्या आहेत व त्या काही अंशी पूर्ण ह
आहेत. पण त्याचबरोबर आज मा
सृजनशील श्रमापासून वंचित आहे. उत्पाद
प्रक्रियेवर माणसाचा ताबा नाही, तर उ
नफ्याच्या प्रेरणेची गुलाम झालेल्या भांडव
दारी उत्पादनप्रक्रियेला माणूस जखडला गे
आहे, तिच्यामागे तो फरफटला जात
भांडवलशाहीत ‘मानवी गरजांची पूर्त

ह्या प्रेरणेने उत्पादन होऊ शकत नाही, तर फक्त नफ्यासाठीच होऊ शकते.

नफ्याच्या प्रेरणेने का होईना, पण भांडवलशाहीत उत्पादनसाधनांची प्रचंड प्रगती झाली व माणूस पूर्णपणे स्वतंत्र होण्यासाठी आवश्यक असा तांत्रिक पाया तयार झाला. अभूतपूर्व अशा तांत्रिक प्रगतीमुळे स्वातंत्र्य हे स्वप्न राहिले नसून एक मूर्त शक्यता आहे. पोट भरण्यासाठी दिवसभर राबण्याची, झगडण्याची आवश्यकता राहणार नाही तेव्हाच माणसाचे माणूसत्त्व पूर्ण फुलेल व पशुत्वापासून तो कायमची व पूर्णपणे काडीमोड घेऊ शकेल. रेगे म्हणतात, 'रॉय ह्यांनी स्वत्वाची इतिहासाचे तावडीतून मुक्तता केली.' पण माणसाचे माणूसत्त्व फुलण्याची शक्यता इतिहासामुळे निर्माण झाली. इतिहासाच्या बाहेर मानवी प्रगती कल्पिता येत नाही. माणसाला इतिहास आहे व प्राण्यांना नाही. मानवी सत्त्वाची 'इतिहासाच्या तावडीतून' सुटका करणे म्हणजे माणूस व प्राणी यातला भेद विसरणे मानवी सत्त्वाच्या व स्वातंत्र्याच्या अशा अनैतिहासिक कल्पनेमुळेच रॉय यांचा मानवतावाद अशास्त्रीय बनतो. फ्युअरबाखूने नेमकी हीच चूक केली होती. त्यांच्या ह्या चुकीवर बोट ठेवून मार्क्सने फ्युअरबाखूच्या मानवतावादाचे अशास्त्रीय स्वरूप उघड केले. मार्क्सच्या पलिकडे जाण्याच्या प्रयत्नात रॉय मार्क्सच्या एक पाऊल मागे जाऊन फ्युअरबाखूच्या पंक्तीला जाऊन बसतात !

## रशियन क्रांतीचा अनुभव

रशियामध्ये संपूर्ण स्वातंत्र्य फुलणे अशक्य होते. सर्व जगभर क्रांती झाल्यावर व त्यानंतर उत्पादन-शक्तीत प्रचंड भर पडल्यावर, नफ्यासाठी नव्हे तर मानवी गरजेकरता जगातील सर्व साधनसामग्री वापरली जाईल तेव्हाच 'प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे' ह्या तत्त्वानुसार उपभोग्य वस्तूंचे वाटप करता येईल अशीच धारणा मार्क्स व लेनिन यांची होती. रशियामध्ये ह्या प्रक्रियेला फक्त सुरुवात झाली होती, पण इतर देशांमध्ये क्रांती झाल्याशिवाय ती फारशी पुढे जाणे शक्य नव्हते. रशियन क्रांतीनंतर युरोपीय देशांत अनेक क्रांतिकारक उठाव झालेसुद्धा; पण काही कारणामुळे ते अयशस्वी झाले. क्रांतीपूर्व रशियातील अर्थव्यवस्था अत्यंत मागासलेली होती व त्या महायुद्धामुळे व क्रांतीनंतर साम्राज्यवाद्यांविरुद्ध कराव्या लागलेल्या युद्धामुळे. त्यातील फक्त १/३ अर्थव्यवस्था शिल्लक राहिली होती ! या युद्धात वर्गजागृत कामगार सतत पुढे होते व त्यातले खूप मारले गेले, भौतिक व सांस्कृतिक मागासलेपणाचा वारसा घेऊन आलेल्या नव्या राजवटीला हे आघात सहन झाले नाहीत. त्यात स्टॅलिनच्या चुकांची भर पडली. रशियात निर्माण झालेल्या विकृतीमुळे मार्क्सवाद खोटा ठरत नाही, तर पूर्ण स्वातंत्र्यासाठी भौतिक पायाची गरज असते ह्या मार्क्सवादी कल्पनेची सत्यता ह्यावेळेस शोकात्मक पद्धतीने अनुभवास येते.

रशिया म्हणजे कम्युनिझम. रशियात दडपशाही आली म्हणजे कम्युनिझम आला की दडपशाही येणार. असली उथळ समीकरणे टाकून द्यायला हवीत. स्टॅलिनवाद म्हणजेच मार्क्सवाद अशी घट्ट समजूत रॉय ह्यांनी करून घेतली. त्याबद्दल भ्रमनिरास झाल्यावर त्यांनी मार्क्सवादाचाच त्याग केला ! रशियन क्रांतीची शोकान्तिका स्टॅलिनवादाचा उदय ह्याची मार्क्सवादी दृष्टिकोनातून चिकीत्सा करून त्यापासून धडे घेऊन मार्क्सवाद विकासित करण्याचे प्रयत्न ट्रॉट्स्कीवाद्यांनी व इतर मार्क्सवाद्यांनी केले. पण रॉय यांना स्टॅलिनवाद व मार्क्सवाद यात भेद करता आला नाही व म्हणून त्यांनी मार्क्सवादाकडे पाठ फिरवली व ते प्रबोधनवादी मानवता वादाकडे वळले.

## भौतिकवाद व अर्थवाद

क्रांती होऊन उत्पादन साधनात प्रगती झाली की आपोआप लोकांची मने बदलतील असे म्हणणे चूक आहे. तो अर्थवाद झाला. समाजवादात जनतेवर भांडवली विचारसरणीचा प्रभाव राहतो व तो सांस्कृतिक क्रांतीच्या सहाय्याने लोकशिक्षणाने घालवावा लागतो. असे मार्क्सवाद मानतो. मार्क्सवाद भौतिकवादी आहे, पण अर्थवादी नाही.

भांडवलशाहीत माणसाला पैशाच्या मागे धावल्याशिवाय गत्यंतर नसते. भांडवली अर्थव्यवस्थेच्या अंगभूत अलिखित नियमामुळे पैशाला अतिमानवी सामर्थ्य प्राप्त होते, व माणूस पैशाचा गुलाम बनणे अपरिहार्य ठरते. भांडवली अर्थव्यवस्था कायम ठेवून मानवतावाद आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वप्नाळूपणा आहे. फारतर काही मूठभर लोक असा मानवतावाद स्वीकारतील. पण बहुसंख्य जनता प्रत्यक्ष व्यवहारात पैशाची गुलाम असणे हा भांडवली अर्थव्यवस्थेचा अत्यावश्यक भाग असल्याने "सत्याचा साधक म्हणून जगण्यासाठी जेवढे आवश्यक असेल तेवढेच आपण घ्यावे. ह्यापेक्षा अधिक घेणे म्हणजे चोरी करण्यासारखी आहे' हा रेग्यांचा 'मानवतावादी' सल्ला कितीजण मानतील ? भांडवली अर्थव्यवस्था बदलल्याशिवाय बहुसंख्य जनता भांडवली विचारसरणीच्या तावडीतून सुटू शकणार नाही.

मात्र क्रांतीपूर्व काळात सती स्वातंत्र्य जातीनिर्मूलन, वंशवादविरोध, इ. सकस सांस्कृतिक मूल्यांसाठी झगडता येणे शक्य आहे व झगडले पाहिजे. तसेच कष्टकरी जनतेच्या ट्रेड युनिअन्स्, किसान सभा इ. जनसंघटना व सोव्हिएट्स्, पक्ष इ. सारख्या राजकीय संघटना यात लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले गेले पाहिजेत. क्रांतीपूर्व काळातील सांस्कृतिक व प्रबोधनकारी कामाला मर्यादित पण निश्चित महत्त्व आहे असे म्हणणे वेगळे व राजकीय कामापासून दूर जाऊन फक्त हेच काम केले पाहिजे असे म्हणणे वेगळे. फक्त प्रबोधनकारी काम करू पहाणारे रॉयवादी काही तत्कालिन कारणांमुळे अयशस्वी झाले असे नाही, तर ते कधीच त्यांना अभिप्रेत असलेला मानवतावाद प्रत्यक्षात आणू शकणार नाहीत.

—अनंत

१९३७ मध्ये अद्‌भुतरम्यतेच्या धुक्यात लपलेल्या येनानला धीर देणारा आणि माओ व इतर चिनी कम्युनिस्ट नेत्यांची बाहेरच्या जगाला प्रथमच ओळख करून देणारा एडगर स्नो हा अमेरिकन लेखक-वार्ताहर नंतरही चीनला वारंवार भेट देत होता. 'Red Star over China' हे स्नोचे पुस्तक भयंकर गाजले व अजूनही ते प्रमाणभूत मानले जाते. सांस्कृतिक क्रांतीच्या काळात स्नो चीनमध्ये गेला असता चेअरमन माओ यांची व स्नोची एक अनधिकृत मुलाखत झाली. पुढे ही मुलाखत अधिकृत करण्यात आली व त्यांतील काही भाग स्नोच्या 'China's Long Revolution' या पुस्तकात प्रसिद्धही झाला. या भागाचा हा काहीसा स्वैर अनुवाद.

# चेअरमन माओ यांच्या अभ्यासिकेत

अनुवादक : भ. मं. नार्वेकर (तळासरी)

चेअरमन माओ यांनी निक्षून सांगितले की, त्यांना मुलाखतबिलाखत द्यायची नाही. गप्पा गोष्टीची एक बैठक व्हावी. मायाहून मात्र त्यांच्याबरोबरच्या त्यांच्या संभाषणात त्यांनी व्यक्त केलेले विचार प्रत्यक्ष शब्द उद्‌धृत न करता प्रसिद्ध करायला त्यांची काही हरकत नसल्याची अधिकृत संमती मी त्यांच्याकडून मिळविली. आमची ही बैठक १० डिसेंबर १९७० रोजी झाली. त्यावेळेस संभाषणाची टिपणं टँग मिग चाओ यांच्या अमेरिकेत जन्माला आलेल्या नॅन्सी टँग या मुलीने घेतली, (टँग हे १९४९ पर्यंत न्यूयॉर्कमध्ये ओव्हरसिज चायनीज डेली या वृत्तपत्राचे संपादक होते. नंतर ते चीन देशात परकीय देशांशी संस्कृती व राजकीय संबंधविषयक प्रमुख अधिकारी म्हणून काम पाहत आहेत.) आणखी एक व्यक्ती हजर होती...एक चिनी महिला सेक्रेटरी. एक लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट माझ्या नजरेत भरली ती म्हणजे तिथे हजर असलेल्यात कोणाही व्यक्तीला माओ-बिल्ला लावलेला नव्हता. आणि अशा तऱ्हेने बिल्ला न लावलेली अधिकृत व्यक्ती आज पहिल्यांदाच मी पाहत होतो.

ही बैठक आटोपताच मी तांबडतोब माझ्या आठवणी ताज्या असतानाच झालेले सारे संभाषण लिहून काढले. आणि नंतर कुमारी टँग हिच्या टिपणांची एक प्रत पण मला देण्यात आली.

चेअरमन माओ यांचे राहते घर जुन्या शाही नगरच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात चारी बाजूला लाल रंगाच्या भिंतीने वेढलेले आहे. हे घर तीएन अॅनमेन या चौकापासून (स्वर्गीय शांततेचे द्वार...Heavenly Peace Gate) जवळच आहे. याच चौकात ऑक्टोबर दिनाच्या संचलनाची सलामी माओ घेत असतात. उंच उंच भिंतीच्या आणि झगमगणाऱ्या पिवळ्या कौलाने शोभणाऱ्या त्या बंगल्यात पूर्वी अनेक चिनी सम्राटांचे अधिकारी राहत असत. आज तिथे चिनी कम्युनिस्ट पार्टीच्या पॉलिटब्युरोचे सभासद चेअरमन माओ आणि पंतप्रधान चौ एन लाय यांच्या सान्निध्यात राहतात आणि काम करतात. पश्चिमेकडील दारातून आपण तेथे प्रवेश करतो; प्रवेशद्वाराशी फक्त दोन सशस्त्र पहारेकरी दिसतात. वनराजीतून आत रस्ता वळण घेत जातो आणि समोर परंपरागत जुन्या चिनी पद्धतीची एकमजली टुमदार बंगली समोर उभी राहते.

बंगलीच्या प्रवेशद्वाराशी जाताच दोन अधिकारी आपले स्वागत करतात. ह्या अधिकाऱ्यांकडे शस्त्रे नाहीत की अधिकारदर्शक कोणतीही निशाणी नाही. नॅन्सी टँगने हळूच सांगितले की, ते जनरल आहेत. कितपत खरे कोण जाणे? स्वत: माओ–त्यांच्या अभ्यासिकेच्या द्वाराशी–स्वागत करतात आणि अधिकारी दृष्टीआड होतात. मला जायला थोडासा उशीर झालेला असतो म्हणून मी माफी मागतो. कोणतीही पूर्वसूचना न देता बोलावणे आले म्हणजे काय करणार?

वेळ कोवळी सकाळची. आम्ही बरोबर न्याहारी घेतली आणि दुपारच्या एक वाजेपर्यंत बोलत बसलो. माओ यांना थोडीशी सर्दी झालेली आहे आणि डॉक्टरना या साध्या गोष्टीसाठी इलाज करता येऊ नये, याबद्दल ते आश्चर्य व्यक्त करत होते! ह्या सर्दीसारखा छोटासा आजार; किती वेळ त्यामुळे वाया जातो आणि त्याला रोखण्यासाठी काही उपाय नसावा? सर्दीवर उपाय म्हणून सी व्हिटॅमिनचे मोठे डोस घेण्याची शिफारस करतो. ते त्यांनी ऐकलेले असते. मी त्या गोळ्या पाठवितो म्हणून सांगतो. ते म्हणतात, घेऊन पाहतो; जर गुण आला तर श्रेय मला मिळेल पण अपाय झाला तर दोष काही देणार नाही.

माओ यांची अभ्यासिका चांगली प्रशस्त आहे. साऱ्या भिंती कपाटांनी झाकून टाकलेल्या आहेत. कपाटात शेकडो चिनी ग्रंथ दिसताहेत. मधूनमधून परकीय ग्रंथपण आहेत. अनेक पुस्तकांत खुणांचे कागद डोकावताहेत. भल्या मोठ्या टेबलावर लिखणाचे व नियतकालिकांचे ढीग रचलेले आहेत. कामात गढलेल्या लेखकाचे टेबल शोभत आहे. अभ्यासिकेच्या खिडक्या चांगल्या मोठ्या आहेत. त्यातून बाहेरची बाग दिसते. तिथंच माओ स्वत:करिता स्वत: भाजीपाला पिकवतात आणि शेतीचे अनेक प्रयोग करतात. पण ती बाग काही 'खाजगी मालमत्ता' नाही. ती सरकारी मालकीची आहे. कदाचित माओ यांना त्यांतील उत्पन्नाची सध्या जरूरी असेल. त्यांनी अलीकडे आपल्या पगारात वीस टक्के कपात केली आहे.

मी जानेवारी १९६५ मध्ये त्यांची मुलाखत घेतली होती; त्याची

चर्चा करतो. त्या मुलाखतीत चीनमध्ये व्यक्तिपूजा खरोखरी आहे. (Cult at Personality) आणि विशेष म्हणजे ती तशी असण्यात काही कारणे पण आहेत, हे माओ यांनी मान्य केले होते; हे मी रिपोर्ट केले होते. अशा प्रकारे लिहिण्याबद्दल काही जणांनी माझ्यावर टीका केली होती. ते म्हणाले, 'चीनमध्ये व्यक्तिपूजा आहे असे लिहिले म्हणून काय झाले ? तशी परिस्थिती आहेच. मग का लिहू नये त्याबाबत ? ते एक सत्य आहे.'...

काही अधिकाऱ्यांनी १९६७–६८ मध्ये मला चीनमध्ये येण्याला विरोध केला होता. ते अतिजहाल गटाचे लोक होते व त्यांनी काही काळ परराष्ट्र व्यवहारखात्याचा कबजा घेतला होता. पण आत त्यांची तेथून हकालपट्टी झालेली आहे. माओ पुढे सांगतात...आमच्या १९६५ च्या मुलाखतीच्या वेळेस त्यांच्या हाती सत्तेवरच नियंत्रण फारसे राहिले नव्हते. विशेषत: प्रांतिक आणि स्थानिक समित्यांच्या प्रचार कामावर; त्यातल्या त्यांत पेकिंग म्युनिसिपल पार्टी कमिटीबाबत ते विशेष होते. म्हणून त्या वेळेस त्यांनी व्यक्तिपूजेची गरज आहे असे सांगितले होते. कारण त्यामुळे माओविरोधी पक्षीय नोकरशाही खतम करण्यासाठी स्फूर्ती देता आली.

अर्थातच व्यक्तिपूजेचे स्तोम थोडे जास्तीच माजविले गेले. आता फरक पडला आहे. त्यांच्या मते तीन हजार वर्षांच्या जुन्या सम्राटाची पूजा करण्याच्या प्रथेमुळे निर्माण झालेल्या सवयी बदलणे जनतेला बरेच कठीण पडलेय. माओ यांना स्वत:ला जी चार विशेषणे लावली जातात–'महान शिक्षक, महान नेता; महान सेनानी; महान कर्णधार'...ती त्रासदायक, नकोशी वाटतात ती पुढेमागे काढून टाकली जातील. त्यांना फक्त 'शिक्षक' हेच विशेषण पुरेसे वाटते. ते सुद्धा साधा शाळामास्तर या स्वरूपात. माओ हे नेहमी आणि आताही साधे शाळामास्तर आहेत. ते कम्युनिस्ट होण्यापूर्वी सुद्धा च्यांग शा येथे प्राथमिक शाळामास्तर होते. बाकीची कोणतीच विशेषणे त्यांना नको आहेत.

मी म्हणालो, 'माओ यांचा तारस्वरात जयजयकार, उदो उदो करणारे खरे म्हणजे काहीजण म्हणतात तसे–लालबावट्याचा पाडाव करण्यासाठीच लालबावटा जास्तीत जास्त नाचवा–' असे नाहीत का ?

माओ यांनी संमतिदर्शक मान डोलावली. अशी माणसे तीन प्रकारची असतात. पहिल्या प्रकारात प्रामाणिक लोक येतात; दुसरा प्रकार म्हणजे वाहत्या प्रवाहाबरोबर जाणाऱ्यांचा. सर्वजण 'झिंदाबाद'चे नारे लावतात म्हणून तेही त्यात सामील होत असतात. आणि तिसरा प्रकार म्हणजे अप्रामाणिकांचा. त्यांच्यापासून मात्र सावध राहिले पाहिजे.

मी म्हणालो, मला आठवतंय की, तुम्ही १९४९ मध्ये पेकिंगमध्ये प्रवेश केल्याबरोबर (कम्युनिस्ट पार्टीच्या) सेंट्रल कमिटीने कुठल्याही रस्त्याला, शहराला किंवा कोठल्याही जागेला कोणाही व्यक्तीचे नाव देण्यास बंदी करणारा ठराव केला होता; आणि तो ठराव तुमच्याच सूचनेने केला होता म्हणतात.

'बरोबर आहे,' असे सांगून ते पुढे म्हणाले, 'पण व्यक्तिपूजेचे अनेक दुसरे प्रकार निर्माण झाले. अनेक घोषणा आहेत, फोटो आहेत, पुतळे आहेत. रेड गार्डस् तर या साऱ्या गोष्टी कुठे कुणाकडे नसतील तर त्यांच्यावर माओविरोधी म्हणून शिक्का मारीत. गेल्या काहीकाळात अशा प्रकारच्या व्यक्तिपूजेची जरूरी होती. पण आता त्याची काही गरज नाही आणि ते आता हळूहळू थंड पडेल.'

पुढे ते बोलू लागले, 'अमेरिकेतसुद्धा व्यक्तिस्तोम नाही काय ? प्रत्येक राज्याचा गव्हर्नर, प्रत्यक्ष अध्यक्षसुद्धा आणि त्यांच्या कॅबिनेटचे सभासद यांनादेखील कोणी ना कोणी स्तुतिपाठक असल्याशिवाय चालेल काय ? नेहमीच पूजा करण्याची आणि करून घेण्याची इच्छा सर्वत्रच असते. आता तुमचेच उदाहरण पहा, तुमची पुस्तकं आणि लेख कोणी वाचलेच नाहीत तर तुम्हाला बरं वाटेल काय ? काही प्रमाणात व्यक्तिपूजा होणं हे स्वाभाविकच आहे आणि ते मला पण लागू आहे.'

मानवाला देवदेवता, परमेश्वर यांची पूजा करण्याची गरज पडते या प्रश्नाचा चेअरमन माओ यांनी बराच खोल विचार केलेला दिसला. पूर्वीच्या मुलाखतीत त्यांनी या प्रश्नावर बरीच प्रदीर्घ चर्चा केली होती. वयाच्या शहात्तराव्या वर्षी त्यांची प्रकृती सर्वसाधारणपणे ठणठणीत दिसत होती. पण तरीदेखील ते म्हणत होते, 'देवाघरी जाणं आता जवळ आलंय, ते अटळ आहे. प्रत्येकाला अखेरीस देवाघरी जावेच लागते.'

मी सांगितले, 'व्हॉल्टेअरने लिहिलंय की, जर परमेश्वर नसेल तरी मानवाला तो निर्माण करण्याची गरज आहे. त्याकाळी परमेश्वर नाहीच असे सरळ सरळ म्हणण्याचे धारिष्ट्य कुणी दाखविले असते तर त्याला आपले डोकेच गमवावे लागले असते.'

'खरे आहे' माओ म्हणाले, 'याच्यापेक्षाही काही कमी जास्त बोलण्याने अनेकांना आपले जीव गमवावे लागले आहेत.'

मी : आता त्या मानाने आपण बरीच प्रगती केलेली आहे. मानवाने आता अनेक परमेश्वरी संकेत बदलले आहेत. अशीच एक गोष्ट म्हणजे कुटुंब नियोजन. याबाबतीत चीन देशात गेल्या पाच-दहा वर्षांच्या मानाने बराच बदल घडून आलेला आहे.'

माओ : छे ! 'तुमची फसगत झाली आहे. अजूनसुद्धा खेड्यापाड्यात स्त्रियांना मुलगाच व्हायला पाहिजे असतो, आणि पहिल्या मुली झाल्या तर मुलगा होईपर्यंत त्या थांबायला तयार नसतात... हा दृष्टिकोन बदलायला हवा पण त्याला वेळ लागेल. अमेरिकेत असेच आहे का ?'

मी : चीन याबाबतीत पुढे आहे. अमेरिकेत स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीचा बराच परिणाम झाला आहे. अमेरिकेत स्त्रिया या मताधिकार मिळविण्यात पहिल्या आहेत आणि त्या अधिकाराचा उपयोग कसा करायचा हे आता त्या शिकताहेत.

एवढ्यात क्वाय चौव प्रांतात तांदळापासून बनणाऱ्या कडक दारूचे प्याले आले व बोलण्यात खंड पडला. सदिच्छा व्यक्त करून आम्ही प्याले तोंडाला लावले. तिथे हजर असलेल्या स्त्रियांना सदिच्छा व्यक्त करायचे (टोस्ट्) माझ्याकडून राहून गेले. ते चेअरमन माओंनी तावडतोब माझ्या ध्यानात आणून दिले. हे त्यांनी माझ्या ध्यानात आणून मला चांगलेच लाजवले–'असे कसे तुम्ही विसरता ? तुम्ही अजूनही स्त्रियांना समान मानायला तयार नाहीत असाच त्याचा अर्थ.

: स्त्री-पुरुषात संपूर्ण समानता आताच प्रस्थापित होणे शक्य नाही. परंतु चिनी आणि अमेरिकन जनतेची मने कलुषित असण्याची जरूरी नाही. परस्परांविषयी आदर आणि समानतेची भावना असा-

यला हवी. या दोन्ही देशांच्या जनतेविषयी त्यांना मोठ्या अपेक्षा; आशा आहेत.

: सोव्हिएत रशिया जर काही करायला तयार नसेल (मार्ग दाखवायला) तर ते अमेरिकन जनतेवर विश्वास ठेवतील. अमेरिकेची वस्ती वीस कोटीहून अधिक आहे. तेथील औद्योगिक उत्पादन कुठ्ल्याही देशापेक्षा जास्त आहे. आणि शिक्षण सार्वत्रिक आहे. तिथे क्रांतीचे पुढारीपण येऊ शकेल; असा पक्ष निर्माण होईल तर त्यांना फार आनंद होईल; पण अशी आशा नजिकच्या भविष्यात त्यांना दिसत नव्हती.

पुढे ते सांगू लागले की, सध्या डाव्या, मध्यममार्गी तसेच उजव्या प्रवृत्तीच्या लोकांना चीन देशाला भेट देण्याला परवानगी देण्याच्या प्रश्नाचा विचार परराष्ट्रखाते करीत आहे. निक्सनसारख्या उजव्या, मक्तेदार भांडवलदारांच्या प्रतिनिधीला चीन भेटीची परवानगी द्यावी काय ?

'त्यांचे स्वागत करावे' माओ खुलासा करू लागले. 'कारण चीन व अमेरिका यांच्यामधील आजच्या समस्यांची उकल करण्यासाठी निक्सनबरोबरच बोलणी करायला हवीत.' निक्सनबरोबर बोलणी करायला माओ यांना आनंदच होईल. मग निक्सन अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून येवोत की साधे प्रवासी म्हणून (Tourist) येवोत.

माओ मला सांगू लागले, 'तुम्ही दुर्दैवाने अमेरिकेचे प्रतिनिधित्व करू शकत नाही. तुम्ही मक्तेदार, भांडवलदार नाही. तुम्ही तैवान प्रश्न सोडवू शकाल ? चँग कै शेक अजून हयात आहे.'

मी : तैवान प्रश्नाशी निक्सन यांचा काय संबंध ? तो प्रश्न ट्रुमन आणि ॲचिसन् यांनी निर्माण केला.

यासंबंधी मला असलेली माहिती नमूद करणे उचित ठरेल. पण ते काही आमच्या बोलण्यात आलेले नव्हते. पेकिंग व वॉशिंग्टन यांच्या दरम्यान काही विशिष्ट मध्यस्थांच्या मार्फत संदेशांची देवाणघेवाण चालली असल्याची बातमी राजनैतिक प्रतिनिधींना माहिती होती. हे जे संदेश होते त्यांचा मतितार्थ–निक्सन यांचा आशियाबाबतच्या 'नव्या दृष्टिकोना'ची चिनी नेत्यांची खातरजमा करून देणे हा होता. असेही सांगितले जात होते की, निक्सन हे शक्य तेवढ्या तातडीने व्हिएतनाममधून बाहेर पडून, आग्नेय आशियामध्ये स्वातंत्र्याबाबत वाटाघाटीद्वारे आंतरराष्ट्रीय हमी मिळविणे, तैवानचा प्रश्न सोडवून चिनी–अमेरिकनसबंधात निर्माण झालेली कोंडी समाप्त करणे, चिनी प्रजासत्ताकाला राष्ट्रसंघात प्रवेश देणे आणि अमेरिकेचे चिनी प्रजासत्ताकशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणे या धोरणाचा पाठपुरावा खंबीरपणे करणार आहेत.

१९७० मध्ये दोन महत्त्वाच्या खास फ्रेंच इसमांनी चीनला भेट दिली होती. पहिले होते नियोजन खात्याचे मंत्री आंद्रे बेटनकोर्ट आणि दुसरे होते द गॉल यांच्या राजवटीतील प्रधानमंत्री मॉरीस कुरे द मुरविले. सदर मुरविले यांनी द गॉल यांची या वर्षी होऊ घातलेल्या चीन-भेटीबाबत सर्व प्राथमिक व्यवस्था पुरी केली. मला खात्रीलायकपणे समजले होते की, निक्सन यांनी पहिल्या प्रथम चीनबरोबर समझोता करण्याचा प्रामाणिक मनोदय द गॉल यांच्यापाशीच व्यक्त केला होता. अनेकांची अशी कल्पना होती की, द गॉल आपल्या चीन-भेटीत चीन–अमेरिकन सुसंवाद फलद्रूप होण्यासाठी प्रयत्न करतील; त्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी पार पाडतील. पण द गॉल यांच्या मृत्यूमुळे ते तेवढ्यावरच राहिले. चेअरमन माओ यांनी द गॉल यांच्या पत्नीला द गॉल यांच्या मृत्यूनंतर व्यक्तिशः शोकसंदेश पाठविला आणि असा शोकसंदेश रूझवेल्टच्या मृत्यूवेळेखेरीज एरवी कोणत्याही बिगर कम्युनिस्ट नेत्याला माओ यांनी कधी पाठविला नाही.

इतर राजनैतिक प्रतिनिधींच्या हालचाली चालू झाल्या होत्या. आमच्या पेकिंगमधील युरोपिअन राजनैतिक दलाच्या प्रमुखाने अध्यक्ष निक्सन यांची भेट घेण्यासाठी वॉशिंग्टनला एक फेरी मारली होती; आणि गेल्या डिसेंबरमध्ये वॉशिंग्टनला तो पुन्हा गेला होता. त्याने स्टेट डिपार्टमेंटला बाजूला सारून सरळ व्हाईट हाऊसमध्ये जाऊन निक्सन यांची भेट घेतली होती आणि चीनमध्ये जानेवारीत तो परत आला होता. मला दुसऱ्या एका खास राजनैतिक गोटातून विश्वसनीय बातमी, मी फेब्रुवारीमध्ये पेकिंगहून निघण्यापूर्वीच मिळाली होती. ती म्हणजे व्हाईट हाऊसमधून चिनी नेत्यांना विचारणा केली गेली होती की, अध्यक्षांचा खास वैयक्तिक प्रतिनिधी पेकिंग येथे वरिष्ठ चिनी नेत्यांशी बोलणी करण्याकरता आला, तर त्याचे स्वागत कसे काय होईल ? त्याच सुमारास एका वरिष्ठ चिनी राजनैतिक मुत्सद्द्याने मला अत्यंत गूढ रीतीने सांगितले होते की, 'निक्सन व्हिएतनाममधून बाहेर पडताहेत.' आणि त्यानेच काही दिवसांपूर्वीच अगदी उलट मत व्यक्त केले होते.

मला येथे ठामपणे नमूद केले पाहिजे की, या वरील बातम्यांपैकी एकही माओ त्से तुंग यांचेकडून मिळालेली नाही.

आमच्या बोलण्यात चेअरमन माओ यांनी पुन्हा एकवार चिनी जनतेला क्रांतीचे धडे दिल्याबाबत जपानी लष्करशहांचे आभार मानले. त्यांचे आक्रमण ही इष्टापत्तीच; कारण जनतेला तिने लढ्याला उद्युक्त केले; आणि परिणामी चिनी समाजवादी राजवट सत्तेवर आली.

मी त्यांना राजकुमार सिंहनुक यांच्याशी झालेल्या बोलण्यात त्यांनी व्यक्त केलेले पुढील मत सांगितले. राजकुमार म्हणाले होते, 'निक्सन हे माओ त्से तुंग यांचे चांगले हस्तक आहेत. ते कंबोडियावर जेवढे जास्त बॉम्ब् टाकतात तेवढे जास्त कम्युनिस्ट ते जन्माला घालतात. ते त्यांच्यासाठीच दारुगोळा पुरवत आहेत.' माओ यांना ते पटले. अशा प्रकारची मदत त्यांना आवडते.

मी त्यांना माझे त्यांच्याशी दोन महिन्यांपूर्वी तीएन ॲन मेन चौकात ऑक्टोबर संचालनाच्या वेळेस झालेल्या संभाषणाची आठवण करून दिली. त्यावेळी त्यांनी मला सांगितले होते की, सध्याच्या परिस्थितीबाबत त्यांना समाधान नाही. त्याबाबत अधिक प्रकाश टाकण्याची मी त्यांना विनंती केली.

त्यांनी उत्तर दिले की, सांस्कृतिक क्रांतीमधील दोन गोष्टी त्यांना बिलकूल अमान्य होत्या. एक म्हणजे खोटे बोलणे. काहीजण म्हणत होते की, लढा हा चर्चा, विचारविनिमयाद्वारे चालविला पाहिजे; हिंसा किंवा जबरदस्ती करता कामा नये; पण प्रत्यक्षात मात्र आडमार्गाने दुसऱ्याला लाथा हाणीत होते. आणि नंतर त्याचा पाय

ओढत होते. ज्याला लाथ मिळे तो विचारी, 'मला का लाथ मारतोस रे बाबा ?' पहिला इसम उत्तर देई, 'मी नाही तुला लाथ मारली; माझा पाय हा इथेच आहे की नाही पहा !' माओ म्हणाले, 'हे असे खोटे बोलणे.' नंतर सांस्कृतिक क्रांतीत संघर्ष वाढीला लागला आणि दोन गटांत धुमश्चक्री चालू झाली. प्रथम भाले, नंतर बंदुका आणि नंतर उखळी तोफा पण. नंतर परदेशी लोकांनी बाहेर बातमी प्रसृत केली की, चीनमध्ये प्रचंड गोंधळ माजला आहे. ते खरे होते. ते खोटे नव्हते. आपापसात मारामाऱ्या चालल्या होत्या.

चेअरमन माओ यांना दुसऱ्या एका गोष्टीचे दुःख होत होते. ते म्हणजे पकडलेल्या लोकांना वाईट वागणूक दिली त्याचे. पार्टी सभासद व इतर अनेकांना सत्तास्थानांवरून काढून त्यांना पुन्हा शिक्षण देण्याचा प्रश्न होता. मुक्तिफौजेचा एक जुना रिवाज होता.पकडलेल्या लोकांना सोडून देणे व त्यांना घरी जाण्यासाठी पैसे देणे. त्यामुळे अनेक शत्रुसैनिक आमच्या सैन्यात स्वखुषीने सामील होत होते. याच तत्त्वाचा आता अनेक वेळा विसर पडला. पकडलेल्यांना वाईट वागणूक दिली गेल्या कारणाने पुनर्बांधणीच्या व पक्ष पुनर्जिवित करण्याच्या कामाची गती मंदावली आहे.

माओ यांनी निष्कर्ष सांगितला– जर एखादा खरे बोलला नाही, तर त्याला दुसऱ्यांचा विश्वास कसा संपादन करता येईल ? त्याच्यावर कोण विश्वास ठेवील ? मित्रांच्या परस्पर संबंधाविषयीसुद्धा असेच असते.

'रशियाला चीनची भीती वाटते काय ?' माझा प्रश्न.

'असे म्हणतात खरे.' त्यांनी उत्तर दिलं. 'पण त्यांना भीती का वाटावी ? चीनचा अॅटमबॉम्ब एवढासा (करंगळी दाखवतात) तर रशियाचा एवढा मोठ्ठा– (आंगठ्याने आकार दाखवतात.) रशिया आणि अमेरिका असा दोघांचा मिळून हा एवढा मोठा. (दोन्ही अंगठे जवळ धरून दाखवितात) दोन आंगठ्यांसमोर ही लहानशी करंगळी काय करणार ?'

पण दूरदृष्टीने विचार केला तर ? तर रशियन चीनला घाबरतात काय ? त्यांनी उत्तर दिले की, 'ते थोडे घाबरतात, असे बोलले जाते. एखाद्या माणसाच्या खोलीत उंदीर असला तरी तो घाबरतो. त्याला वाटत असते की, उंदीर आपली मिठाई फस्त करील म्हणून. उदाहरणार्थ चीन हवाई हल्ल्यापासून बचाव होण्याकरता तळघर बांधतो आहे म्हणून ते बरेच अस्वस्थ झालेले आहेत. पण चिनी लोक आपल्या तळघरात जाऊन बसले तर, ते दुसऱ्यावर कसा काय हल्ला करतील ?

तात्त्विक भांडणास सुरुवात कुणी केली ? रशियनांनी चीनी लोकांना पोथीनिष्ठ म्हटले तर चिनी लोकांनी त्यांना सुधारणावादी म्हटले. चीनने त्यांची टीका प्रसिद्ध केली पण रशियाला चीनने केलेली टीका प्रसिद्ध करण्याची हिंमत झाली नाही. नंतर त्यांनी रुमानियन लोकांना आणि क्युबाच्या लोकांना पाठवून हा तात्त्विक वाद चीनने थांबवावा, असे कळवले.

, तसे होणार नाही. जर जरूर पडली तर, आणखी दहा हजार वर्षे पण हा तात्त्विक वाद चालणार.' नंतर कोसिजीन स्वतः आले. त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर माओ यांनी त्यांना सांगितले की, दहा हजार वर्षांतील फार तर एक हजार वर्षे कमी करता येतील.

माओ पुढे म्हणाले' 'रशियन्स हे चिनी लोकांना कमी, तुच्छ लेखतात. तसेच ते इतर इतर अनेक देशांच्या लोकांनापण तुच्छ लेखतात. त्यांना असे वाटते की, त्यांनी शब्द उच्चारताच इतर लोकांनी ते गुपचूप ऐकावे व त्याप्रमाणे वागावे. अशा प्रकारे वागायला तयार नाहीत असे अनेक लोक असतील यावर त्यांचा विश्वासच बसत नाही. अशा (न जुमानणाऱ्या) लोकांपैकी ते स्वतः एक नम्र इसम आहेत. रशिया–चीनमधील तात्त्विक मतभेद आता कोणताही समझोता होण्यापलीकडे गेला आहे– हे कंबोडियातील त्यांच्या परस्परविरोधी धोरणांमुळे स्पष्ट झाले आहे. तरीदेखील हे सर्व प्रश्न दोन राज्यांमधील प्रश्न जसे सोडविले जातात त्या तऱ्हेने सोडविता येतील.

चेअरमन माओ पुन्हा एकदा अमेरिकेचा उल्लेख करून म्हणाले की, अमेरिकेची प्रगती होण्याचे कारण अमेरिकेने आपल्या पन्नास राष्ट्रांवर जबाबदाऱ्या व संपत्ती यांचे विकेंद्रीकरण करून भार टाकला. यापासून चीनला बरेच काही शिकण्यासारखे आहे. चीनला पण प्रादेशिक व स्थानिक पुढाकारावर विसंबले पाहिजे. सारे काही (स्वतःकडे हातांनी निर्देश करून) याच्यावर सोपवून चालणार नाही.

मला अगत्याने स्वतः उठून दारापर्यंत निरोप देताना ते म्हणाले की, ते कोणी किचकट, अवघड माहीत. खरोखरच ते एक साधेसुधे इसम आहेत. पुढे ते म्हणाले की, ते स्वतः म्हणजे गळकी घेऊन जगाची परिक्रमा करणारे एकाकी तपस्वी आहेत.

□


**पॅपिलॉन**
**पॅपिलॉन**

**लेखक : हेन्री शॅरीयर**
**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**किमत : पंचवीस रुपये**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# स्वायत्तता

## व्यक्ती आणि मर्यादा

वा. दा. रानडे

पंतप्रधान श्रीमती गांधींनी तामिळनाडूच्या दौऱ्यातील भाषणात स्वायत्ततेची मागणी आणि केंद्र व राज्ये यांचे संबंध यासंबंधी काही विचार व्यक्त केले. स्वायत्ततेच्या मागणीतून फुटीरतेच्या प्रवृत्ती बळावून देशाच्या ऐक्यास धोका निर्माण होऊ नये, या पंतप्रधानांच्या तळमळीशी सर्वच राष्ट्रवादी सहमत होतील. फुटून निघण्याचा प्रचार करणे हा गुन्हा ठरविण्यात आला असल्याने स्वायत्ततेच्या बुरख्याखाली फुटीरतेचा प्रचार केला जाण्याची शक्यता दूर सारता येत नाही. तेव्हा फुटीर प्रवृत्ती स्वायत्ततेच्या नावाखाली आपल्या हालचाली चालू ठेवणार असतील तर ते सहन केले जाणार नाही, त्याविरुद्ध कडक उपाय योजले जातील, हा पंतप्रधानांनी दिलेला इशारा योग्यच आहे.

केंद्र सरकार बळकट असण्याच्या आवश्यकतेवर पंतप्रधानांनी भर दिला. त्याबद्दलही दुमत होण्याचे कारण नाही. पण केंद्र बळकट करताना राज्ये दुबळी होणार नाहीत याचीही दक्षता घ्यावयास हवी. केंद्र आणि राज्ये हे देशरूपी एकाच शरीराचे अवयव आहेत. शरीरात हृदयाला जे स्थान ते देशाच्या शरीरात केंद्राला असले पाहिजे. पण शरीराचा तोल नीट सांभाळला जाण्यासाठी सर्वच अवयवांची योग्य वाढ व्हावयास हवी, त्यांना पुरेशा प्रमाणात रक्तपुरवठा व्हावयास हवा. देशाच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. केंद्रसत्ता तर बळकट हवीच. पण राज्यांचीही शक्ती वाढावयास हवी. आपल्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही, त्यासाठी पुरेशी मदत केंद्राकडून मिळत नाही, अशा तक्रारी काही राज्यसरकारे करीत असतात, त्यात तथ्य किती, की आपली अकार्यक्षमता लपविण्यासाठी पुढे केलेली ती सबब आहे, याची पाहणी केंद्राने केली पाहिजे आणि तक्रारीत तथ्य असल्यास त्यामागची कारणे दूर केली पाहिजेत.

केंद्र व राज्यांचे संबंध, तसेच राज्याराज्यांचे संबंध सहकार्याचे असले पाहिजेत; असेही पंतप्रधानांनी सांगितले. वास्तविक असे सहकार्य असले पाहिजे हे सांगण्याची वेळच का यावी ? सहकार्य स्वाभाविकपणेच वाढायला हवे. अपेक्षेएवढे सहकार्य मिळत नाही म्हणून तर पंतप्रधानांना हे आवाहन करावे लागले.

असे सहकार्य स्वाभाविकपणेच वाढविण्यासाठी केंद्र-राज्य संबंधाबाबत योग्य भूमिकेची जाणीव हवी. ही योग्य भूमिका कोणती? आपले राष्ट्र हे एक संघराज्य आहे. पंजाबी, बंगाली, गुजराती, महाराष्ट्रीय वगैरे विविध भाषिक प्रदेश एकत्र येऊन आपले राष्ट्र बनले. या भाषिक प्रदेशांना स्वतःची वेगळी भाषा, संस्कृती, इतिहास व परंपरा आहे. अनेक शतके ती विकसित होत आलेली आहे. हे भाषिक घटक म्हणजे राष्ट्रसदृश प्रदेश आहेत. स्वतःची पृथगात्मता टिकवून राष्ट्रीय जीवनप्रवाहात ते विलीन झाले आहेत. विविधतेतून एकता निर्माण झाली आहे. हे विविधतेतील एकता टिकविण्यासाठी संघराज्य स्वरूपाची घटना आपण स्वीकारली. संघराज्यात संरक्षण, परराष्ट्र धोरण, दळणवळण, चलन यासारखे संबंध देशाच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय केंद्राकडे सोपविलेले असतात आणि बाकीच्या बाबतीतील अधिकार राज्यांकडे असतात. काही थोड्या विषयांच्या बाबतीत केंद्र व राज्ये दोघांनाही कायदे करता येतात. राज्यांना हे जे अधिकार असतात त्यालाच स्वायत्तता म्हटले जावे. स्वायत्ततेची व्याप्ती आणि मर्यादा योग्य रीतीने साभाळल्या गेल्या तर केंद्र व राज्ये यांच्या संबंधाचा योग्य तोल साधला जातो आणि संघर्ष न होता राष्ट्राचा समतोल विकास होतो. केंद्र-राज्य संबंधात आपल्याकडे मधूनमधून संघर्षाचे प्रसंग का येतात ? राज्यांना घटनेने दिलेले अधिकार खरोखरच अपुरे आहेत काय ? घटनेतील तरतुदींचा या दृष्टीने पुनः एकदा विचार होणे आवश्यक आहे. यासंबंधात काही तुरतुदींकडेच मी लक्ष वेधीत आहे.

कायदे करण्याच्या अधिकाराची केंद्रयादी, राज्ययादी, व समाईक यादी अशी तिहेरी विभागणी आपल्या घटनेने केली आहे. पण राज्य यादीतील एखाद्या किंवा एकापेक्षा अधिक विषयाबाबत केंद्रालाही कायदे करण्याचा अधिकार याही कलमान्वये दिलेला आहे. कलम २५० (१) अन्वये पार्लमेंटला अधिकार दिला आहे. त्याशिवाय राज्याच्या कक्षेतील विषयावरसुद्धा काही गोष्टी करण्याबाबत राजकीय आदेश देण्याचे अधिकार आपल्या घटनेने केंद्रास दिले आहेत. हे आदेश नुसते शिफारसवजा नाहीत. ते न पाळल्यास घटनेच्या ३५६ कलमाखाली राष्ट्रपतींना उपाय योजता येतात. अमेरिका ऑस्ट्रेलियात आणीबाणीच्या काळातसुद्धा राज्य यादीतील विषयावर संघराज्य सरकारला कायदे करता येत नाहीत.

राज्यविधिमंडळाने पास केलेल्या कोणत्याही बिलास मंजुरी नाकारण्याचा अधिकार अमेरिकन राज्यघटनेने राज्यपालांना किंवा संघराज्य सरकारला नाही पण आपल्या घटनेत याबाबतीत राष्ट्रपतींना अमर्याद अधिकार आहेत. राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे विचारासाठी पाठविलेले बिल त्यांच्या सूचनांसह विधिमंडळाकडे पुनः पाठविण्यात येते. या सूचनांसह किंवा सूचनांशिवाय ते पुनः विधिमंडळात पास झाल्यावर राष्ट्रपतींकडे पुनः पाठविले जावे पण राष्ट्रपतींनी त्याला मान्यता दिलीच पाहिजे असे बंधन राष्ट्रपतींवर नाही. एखाद्या राज्याने पास केलेले बिल केंद्रास नापसंत असेल, तर त्याला मान्यता नाकारण्यासाठी राष्ट्रपतींच्या या अधिकारांचा वापर केला जाण्याचा संभव आहे.

समाईक यादीतील एखाद्या विषयावर केंद्राने आणि एखाद्या राज्याने कायदे केले आणि या दोन कायद्यात तफावत असली, तर केंद्राचा कायदाच प्रमाण मानला जाईल अशी आपल्या घटनेत तरतूद आहे. वास्तविक राज्याने केलेल्या कायद्यात स्वीकार करण्यासारखे काही आहे काय ? याचा तुलनात्मक विचार होऊन या संबंधात निर्णय घेतला जावयास हवा.

केंद्र–राज्यसंबंध अधिक सहकार्याचे होण्याच्या दृष्टीने घटनेतील व वर उल्लेखलेल्या तरतुदीत काही बदल करण्याची आवश्यकता आहे का ? याचा विचार घटनातज्ज्ञांनी करावी. या प्रश्नासाठी एखादी समिती नेमण्यात यावी. घटनेतील उणीवा दूर केल्याने केंद्र आणि राज्यांचे संबंध अधिक सहकार्याचे होतील. □

दोन ऑक्टोबर :- गांधी जयंतीनिमित्त विशेष लेख

# सत्याग्रहाची सुरुवात

प. बा. सामंत

दिवस दिनांक १८ जुलै १९१४,

स्थळ : दक्षिण आफ्रिकेतील दरबान येथील टाऊन हॉल.

प्रयोजन : मोहनदास करमचंद गांधी आणि त्यांची पत्नी श्रीमती कस्तुरबा दक्षिण आफ्रिकेतील २० वर्षांचे दीर्घ वास्तव्य संपवून हिंदुस्थानात परत निघाले तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी तिथल्या भारतीयांनी घेतलेली जाहीर सभा.

मो. क. गांधींचे सत्कारास उत्तर :

'आज आपण माझे कौतुक करीत आहात. मी आपल्या कौतुकास पात्र ठरलो. मग जे मागे राहिले, ज्यांनी कुणाकडूनही कौतुकाची अपेक्षा न करता शुद्ध-साध्या भावनेने संघर्षात भाग घेतला, हरंभतसिंग, नारायणस्वामी, नागप्पन, व वलीअम्मा यांनी बलिदान केले. ही सारी मंडळी किती कौतुकास पात्र आहेत नाही... मी आता हिंदुस्थानला परत जात आहे – मी एक अपूर्ण सत्याग्रही आहे, ही जाणीव मनाशी ठेवून जात आहे. हा अपुरेपणा काढून टाकावयाचा आहे. आणि हे उद्दिष्ट हिंदुस्थानमध्येच बरेचसे साध्य होईल असा माझा विश्वास आहे.'

समारोपाचे हे भाषण करताना मो. क. गांधींच्या डोळ्यासमोर तो सत्याग्रहाचा ऐतिहासिक प्रसंग आला.

दि. ६ नोव्हेंबर १९१३, स्थळ व्होल्करस्ट, सकाळी ठीक ६–३० ला २०३७ भारतीय पुरुष, १२७ स्त्रिया आणि ५७ मुले ट्रान्सवाल सरकारच्या जुलमी कायद्यांचे रक्षण करणाऱ्या घोडदळाची फळी अहिंसक शांततामय रीतीने मोडण्यासाठी मिरवणुकीने निघाली. या मोर्चात हिंदु, मुसलमान, पठाण, ख्रिश्चन आणि पार्शी होते. तुरळक चिनी आणि युरोपिअन्सही होते. बहुसंख्य खाणीत व साखर कारखान्यांत काम करणारे आणि कराराने जखडलेले तामीळ मजूर होते. बरेच व्यापारीसुद्धा होते. दिवसभर चालून मोर्चाने रात्री पामफोर्ड येथे विश्रांती घेतली. अशी रस्त्याने पायी मजल दरमजल करीत दिनांक १० नोव्हेंबरला सकाळी ९ वाजता मोर्चा वालफोरला पोहोचला. मोर्चाच्या सुरुवातीलाच एका मध्यरात्री मो. क. गांधींना पकडण्यात आले होते. नंतर नेत्याशिवाय घरे, दारे, नोकऱ्या यावर पाणी सोडून हा २२ शे वीरांचा जथा निर्भयपणे पुढे चालू लागला. वालफोरला या सर्व वीरांना ट्रान्सवाल सरकारने पकडून शिक्षा ठोठावल्या आणि तो सत्याग्रह पुरा झाला.

बावीसशे सत्याग्रही आणि मो. क. गांधी यांच्या शिक्षेची बातमी फैलावताच नाताळमधील वीस हजार हिंदी मजुरांनी स्वयंस्फूर्तीने हरताळ पाडला. इतरत्र दरबान ते इसिपिंग व उत्तर किनाऱ्यावरील हजारो मजुरांनीही हरताळ पाडला. खाणी, कारखाने बंद झाले. घोडदळांनी मजुरांवर हल्ले केले. लष्कराने गोळीबार केला. बऱ्याच भारतीयांचे रक्त तिथे सांडले. काहींचे बलिदान झाले. या अत्याचारांचा निषेध तिथल्या गोऱ्यांनीही केला. त्यांच्या सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीने ठराव करून भारतीयांच्या संघर्षाचे समर्थनकेले. भारतीयांवर लादलेला माणशी तीन पौंड जिझिया कर रद्द करावा आणि असहकाराचा हक्क मान्य करावा, असे त्यांनी आपल्या ठरावात म्हटले. द. आफ्रिकेत घडून आलेल्या या शांततामय कायदेभंगाने जगाचे लक्ष आकर्षित करून घेतले यात नवल नाही.

मो क. गांधी १८९१ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी विलायतेत बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानात परत आले. विलायतेत तीन वर्षे राहूनही आईला दिलेल्या वचनाला स्मरून ते शाकाहारी राहिले. स्त्री, मद्य, मांस व सिगरेट यांना त्यांनी स्पर्शही केला नाही. बरेचसे मुखदुर्बल, त्यामुळे हिंदुस्थानात परत आल्यावर मुंबई, राजकोट, पोरबंदर इथे त्यांना पुरेसे कामही मिळेना. १८९३ च्या एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेतील दादा अबदुल्ला कंपनीच्या एका मोठ्या तंट्यात सल्लागार म्हणून मो. क. गांधींची नेमणूक झाली आणि ते दक्षिण आफ्रिकेत आले.

ब्रिटिश साम्राज्यात नागरिकांना सर्वत्र समान वर्तणूक मिळते, ही श्रद्धा मो. क. गांधी यांनी विलायतेतील तीन वर्षांच्या वास्तव्यात आत्मसात केली होती. पण द. अफ्रिकेत उतरता क्षणी या श्रद्धेला एक जबरदस्त चपराक बसली. दरबानला आगबोटीतून उतरून ते रेल्वेने प्रिटोरियास जाण्यासाठी निघाले. वाटेत मॅरिट्झबर्ग स्टेशनवर जवळ पहिल्या वर्गाचे तिकीट असतानाही, रेल्वे अधिकाऱ्यांनी एका गोऱ्या उतारूच्या तक्रारीवरून त्याना मध्यरात्री धक्का देऊन डब्यातून काढून टाकले. मॅरिट्झबर्गच्या हिंदी नागरिकांनी 'या देशात असेच चालते' असे सांगून त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. पण श्रद्धेला बसलेल्या चपराकीची वेदना त्यांना असह्य झाली. त्या वेदनेने ते बरेच तळमळले. शेवटी निर्णय घेऊन ते शांत झाले. पुढे त्यांनी लिहिले – 'त्या क्षणी मी गडबडलो खरा ! पण नंतर विचार केला. अशा प्रसंगी आपले कर्तव्य काय ? ही लज्जास्पद अवस्था टाळण्यासाठी हिंदुस्थानात परत जावे की ईश्वरावर संपूर्ण श्रद्धा ठेवून पुढे जात राहावे आणि जे समोर येईल ते स्वीकारावे – सहन करावे ? शेवटी मी तिथे राहाण्याचा आणि सर्व काही सोसण्याचा निर्णय घेतला. माझ्या सक्रीय अहिंसेच्या उपासनेची सुरुवात त्या क्षणापासून झाली.

१८६० साली नाताळ सरकार व हिंदुस्थान सरकार यांनी एक

करार करून हिंदी मजुरांना दक्षिण आफ्रिकेतील खाणी, कारखाने व मळे यांत दीर्घ मुदतीसाठी पाठविण्याचे नक्की केले. हा एक कायदेशीर गुलामगिरीचा इरसाल नमुना होता. १८९०-९१ मध्ये असे जवळजवळ दीड लक्ष हिंदी मजूर, बहुसंख्य तामीळ, दक्षिण आफ्रिकेतील अनेक ठिकाणी कामावर होते व नाताळमध्ये स्थायिक झाले होते. त्यांच्यावर दरडोई तीन पौंड कर लादला होता. तिथल्या कायद्यात त्यांचा 'आशियाई, अर्ध जंगली वंशाचे' असा उल्लेख केलेला होता. त्यांचा उल्लेख 'कुली' असा केला जाई. त्यांत केवळ मजूर नव्हते तर सर्व हिंदी व्यावसायिकांचाही समावेश केला जात असे. मो. क. गांधींचा उल्लेख 'कूली बॅरिस्टर' असा होऊ लागला. १८८५ ते १८८८ पर्यंत अनेक कडक कायदे करण्यात आले. त्यांचा मतदानाचा हक्क रद्द करण्यात आला. हॉटेलमध्ये वेटर्स इतर गलिच्छ कामे करण्याएवढीच मुभा त्यांना ठेवली. विशिष्ट जागीच राहण्याची, व्यवसाय करण्याची सक्ती लादण्यात आली. आफ्रिकेतील काळ्या लोकांचे कायदे हिंदी लोकांना लागू केले. या साऱ्या गुलामी कायद्यांची एक छोटी चुणूक मॅरिट्झबर्ग प्रसंगाने मो. क. गांधींना येऊन गेली.

'आम्ही व्यापारी नफ्याच्या आशेने या देशात अपमान सोसून राहू शकतो. तुमच्यासारख्या सुशिक्षितास इथे राहणे अशक्य आहे.' मॅरिट्झबर्गच्या एका हिंदी व्यापाऱ्याने मो. क. गांधींना सल्ला दिला. तो ऐकून मो. क. गांधी प्रिटोरियाला गेले.

प्रिटोरियात त्यांनी वकिली व्यवसायाचे बरेच काम करून हिंदी समाजाचा विश्वास संपादन केला. त्यांचा आत्मविश्वास वाढला. दादा अब्दुल्ला आणि तायब शेठ यांच्यामधील चाळीस हजार पौंडांचा वाद कोर्टाबाहेर वाटाघाटींनी सोडवला. त्यांचे नाव कोर्टाबाहेर दक्षिण आफ्रिकेतील व्यापारी जगात मशहूर झाले.

### निरोपाच्या सभेत

१८९३ च्या अखेरीस हिंदुस्तानात परत येण्यासाठी मो. क. गांधी दरबानला आले. नाताळ स्टेटच्या विधानमंडळांत हिंदी नागरिकांच्या विरोधी मांडलेली काही शासकीय विधेयके त्यांनी—'नाताळ मर्क्युरी' मध्ये वाचली. निरोपाच्या सभेत जमलेल्या हिंदी समाजाला त्यांनी इशारा दिला— 'सावध राहा. एकजुटीने वागा. नाहीतर ऑरेंज फ्री स्टेटमध्ये सर्वस्व गमावून बसलात तशीच आपत्ती आता इथे आल्यावाचून राहणार नाही.' व्यापारी म्हणाले, 'आपण म्हणता ते खरे. ऑरेंज फ्री स्टेटमध्ये आम्ही सर्वस्वी नागविले गेलो. आता इथे हीच आपत्ती आली आहे. आम्ही अशिक्षित, अडाणी आहोत. आपण सल्ला द्या. त्याप्रमाणे वागू. पिढ्यान् पिढ्या इथे राहिल्यानंतर शेवटी भिकारीच व्हायचे असेल तर त्यापेक्षा आपण सांगाल तसे वागू. आपण हिंदुस्थानात जाण्याऐवजी इथेच राहा. आपली फी आम्ही देऊ.'

'फी कसली देता ? सार्वजनिक कामासाठी कधी फी द्यावी लागत नाही. मी इथे राहिलोच तर एक सेवक म्हणून, अजून इथे एक दोन महिने राहीन. मात्र हे एकट्याचे काम नाही. अनेकांचे सहकार्य लागेल, आणि बराच खर्चही येईल.' 'अल्लाच्या कृपेने सर्व काही होईल. माणसे मिळतील, पैशांचीही अडचण पडणार नाही. आपण अवश्य राहावे.' जमलेले सर्वजण आत्मविश्वासाने ओरडले. मो. क. गांधींनी पुढील कामाची योजना आखण्यास सुरुवात केली.

१८९४ पर्यंत नाताळ स्टेटमध्ये युरोपिअन नागरिकांसारखाच हिंदी नागरिकांना मतदानाचा हक्क होता. पन्नास पौंडांची स्थावर मिळकत असलेले किंवा दहा पौंड वार्षिक भत्ते भरणाऱ्यांना मतदारांच्या यादीत नावे घालून घेण्याचा हक्क होता. नाताळ स्टेटमध्ये असे १०००० युरोपिअन मतदार होते, तर अवघे २५० हिंदी मतदार होते पण त्यांचा हा हक्क हिरावून घेण्याचे विधेयक नाताळ विधान मंडळात आले होते.

मो. क. गांधींनी एक नम्र पण आग्रही निवेदन तयार केले. हिंदी नागरिकांची एक समिती नेमून तिचे अध्यक्ष श्री. हाजी आदम यांच्या सहीने ते विधानमंडळाच्या अध्यक्षाकडे तारेने पाठवून दिले. त्याची प्रत मुख्यमंत्र्यांना दिली. दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात विधानमंडळाकडे विचारार्थ गेलेला अशा तऱ्हेचा हा पहिलाच अर्ज होता. २८ जून १८९४ रोजी हा अर्ज विधानमंडळाला मिळाला. बिलाचे दुसरे वाचन सुरू होते. ते दोन दिवस स्थगित करण्यात आले.

या अर्जाची हजारो सह्यांची एक प्रत लॉर्ड रीपन 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर कॉलनीज' यांना पाठविण्याचे ठरले. अनुभव नसलेले तरुण रातोरात जमले. अर्जाच्या शंभर प्रती त्यांनी हातानी नकलून काढल्या. सकाळी त्या प्रती घेऊन शेकडो तरुण व्यापारी आपला उद्योगधंदा बाजूला ठेवून सह्या घेण्यासाठी दरबानहून गावोगावी गेले. शहरे, खेडी, खाणी, कारखाने, जिथे जिथे हिंदी लोकांच्या वसाहती होत्या तिथे तिथे ते पोहोचले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी नागरिकांना संघर्षाचा हा नवा अनुभव होता. सारा हिंदी समाज एक अभंग, एकवटलेला आहे, या अनुभवाने सर्वांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

'ब्रिटिश साम्राज्यातील हिंदुस्थानात जनतेला असा मतदानाचा हक्क आहे. त्याचा वापर साम्राज्याच्या संवर्धनासाठी जसा होतो तसाच हक्क नाताळमधील हिंदी नागरिकांचा आहे. ते इथे फारच अल्पसंख्य असून मतदानाचा हक्क सुबुद्धपणे बजावीत आले आहेत. हा हक्क कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेतला जाऊ नये.' अर्जामधील या विचाराने ते भारावून गेले, एक महिन्यात दि. १७ जुलै १८९४ रोजी दहा हजार सह्यांचा अर्ज लॉर्ड रिपनना लंडन येथे देण्यात आला. त्याच्या १००० प्रती साम्राज्यात वाटल्या गेल्या. लंडनच्या 'टाईम्सनेही' हिंदी नागरिकांच्या या मागणीचे समर्थन केले. पण शेवटी नाताळच्या विधानमंडळाने हे अन्याय, जुलमी विधेयक मंजूर करून अनुमतीसाठी राणीकडे विलायतेस पाठवून दिले. परंतु अखेरीस लॉर्ड रिपन यांनी या विधेयकावर राणीची अनुमती देण्यास नकार दिला. विधेयक रद्द झाले. द. आफ्रिकेतील हिंदी नागरिकांच्या या पहिल्या प्रतिकारास यश आले. त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला.

हिंदी नागरिकांची ही एकजूट टिकविण्यासाठी २२ ऑगस्ट १८९४ रोजी नाताळ इंडियन काँग्रेसची स्थापना करण्यात आली. श्रीयुत अब्दुल्ला हाजी आदम अध्यक्ष झाले आणि मो. क. गांधी सेक्रेटरी झाले. वार्षिक तीन पौंड वर्गणी ठरली. एक महिन्यात दोनशे सभासद झाले. दर महिन्यास सभा होऊन विविध प्रश्नावर चर्चा, खल सुरू झाला. १८८५ मध्ये हिंदुस्थानात काँग्रेसची स्थापना झाली आणि दरवर्षी तिची अधिवेशने भरू लागली. हे डोळ्यासमोर ठेवून नाताळ

काँग्रेसची स्थापना झाली. मो. क. गांधींनी महर्षी दादाभाई नवरोजींना पत्र लिहून दक्षिण आफ्रिकेतील हिंदी नागरिकांच्या अनेक सदस्यांची तपशीलवार माहिती दिली आणि त्यांना मार्गदर्शन व साहाय्य करण्यासाठी विनंती केली. भारतीय काँग्रेसनेही आपल्या द. आफ्रिकेतील बांधवांच्या अडचणींचा वेळोवेळी पाठपुरावा केला.

१८९६ ते १९०६ या दशकात गोऱ्या शासनाबरोबर विशेष संघर्ष झाले नाहीत. ५ जून १८९६ ला आपली पत्नी आणि मुले यांना आणण्यासाठी गांधी हिंदुस्थानला निघाले. हिंदुस्थानात ते थोडेच दिवस राहिले, परंतु द. आफ्रिकेतील हिंदी बांधवांच्या अडचणी देशापुढे ठेवण्याचा त्यांनी फार प्रयत्न केला. 'दी ग्रिव्हन्सेस ऑफ दि ब्रिटिश इंडिअन्स इन साऊथ आफ्रिका' या नावाची पुस्तिका त्यांनी प्रसिद्ध केली, 'पायोनियर', 'हिंदू', 'मद्रास स्टॅण्डर्ड', अमृत बझार पत्रिका', 'स्टेटसमन', 'बंगवाणी', 'इंग्लिशमन', या वृत्तपत्रांच्या संपादकांना ते भेटले. मुंबईत ते रानडे व बद्रुद्दीन तय्यबजींना भेटले. फिरोझशाह मेहतांशी त्यांनी विचारविनिमय केला. पुण्यात टिळक, गोखले, डॉ. भांडारकर यांच्या गाठीभेटी घेतल्या. मद्रासमध्ये परमेश्वरन पिल्ले व सुब्रमणियम अय्यरना व कलकत्त्यात सुरेंद्रनाथ बानर्जी-यांना भेटले. कलकत्ता, मुंबई, पुणे व मद्रास येथे जाहीर सभा झाल्या. ३० नोव्हेंबर १८९६ ला कस्तुरबा व मुलांना घेऊन गांधी आफ्रिकेस परत निघाले.

गांधींनी हिंदुस्थानात जो प्रचार केला त्याची विपर्यस्त माहिती 'रुटर' मार्फत द. आफ्रिकेत पोहोचली आणि गोरे लोक खवळले.

१८ डिसेंबर १८९६ ला गांधींची आगबोट दरबानला पोहोचली. दुपारी एक आगबोट अगोदर येऊन थांबली होती. दोन्हींवरून जवळजवळ ६०० हिंदी लोक तिथे उतरणार होते. परंतु पंचवीस दिवस बोटी तिथेच अडकवून ठेवण्यात आल्या. कुणालाही उतरू दिले नाही. शेवटी १३ जानेवारी १८९७ रोजी त्यांना उतरण्यास परवानगी दिली. गांधींचा निषेध करण्यासाठी हजारो गोरे दरबान बंदरांत गोळा झाले होते. गांधींवर अंडी, कुजके पदार्थ फेकून धक्काबुक्की करण्यात आली. त्यांना बरेच मारले. पोलीस सुपरिंटेंडेंटने शेवटी त्यांची सुटका केली.

### दरबान बंदरावर

जोसेफ चेंबर्लेन-सेक्रेटरी ऑफ स्टेटस फॉर कॉलनीज यांनी लंडनहून नाताळ सरकारला तार करून गांधींवर हल्ला करणाऱ्या गुंडांवर खटले भरा म्हणून आदेश दिला. परंतु गांधींनी असे करण्यास नकार दिला. ते म्हणाले 'मी हिंदुस्थानात आफ्रिकन गोऱ्यांबद्दल वाईट प्रचार केला असा इथे गैरसमज करून दिला गेला. सत्य परिस्थिती कळल्यावर हे गैरसमज दूर होतील असा मला विश्वास वाटतो. कुणावरही खटला भरण्याची मला इच्छा नाही.'

नाताळच्या असेंब्लीत आणखी दोन विधेयके मांडण्यात आली. एकाचा हिंदी व्यापाऱ्यांवर वाईट परिणाम झाला, तर दुसऱ्याने द. आफ्रिकेत येणाऱ्या नव्या हिंदी लोकांवर अनेक जाचक बंधने घालण्यात आली. गांधींचे काम वाढले. हिंदी समाजही जागरूक झाला. या विधेयकांचा विविध भाषांत अनुवाद करून लोकमत तयार केले. एक अर्ज राणीला पाठवला, पण या खेपेला सेक्रेटरी ऑफ स्टेटसने साथ दिली नाही. ते दोन्ही कायदे मंजूर झाले.

आता गांधींनी कोर्टात प्रॅक्टिस सुरू केली. दरबानच्या उपनगरात सुंदर बंगला भाड्याने घेतला. त्यांची राहणी इंग्लिश पद्धतीची होती. पण आहार मात्र शाकाहारी होता. घरात स्वयंपाकी, गडी होते. मुलांचा पोषाख, आचार इंग्लिश धाटणीचे होते. मुलांसाठी इंग्लिश आया ठेवली होती. मात्र ते स्वत: मुलांना गुजराथी शिकवीत असत. त्यांचा जम चांगला बसला. प्रॅक्टिस वाढली. अशा समृद्धीतही त्यांचे स्वत:वर विलक्षण जगावेगळे प्रयोग चालले होते.

१८९३ मध्ये त्यांचे मित्र मि. बेकर यांनी गांधींना बायबल वाचण्यास दिले. बायबलच्या वाचनाबरोबर त्यांनी कुराणही वाचले. टॉलस्टॉयच्या 'किंगडम ऑफ गॉड इज विदिन यू' या पुस्तकाचा त्यांच्यावर फार प्रभाव पडला. राजचंद्र यांच्या सल्ल्यावरून त्यांनी मॅक्समुल्लरच्या 'इंडिया-व्हॉट कॅन इट टीच अस ?' या ग्रंथाचा व उपनिषदांचा अभ्यास केला.

आर्यविनचे 'लाईट ऑफ महमद' आणि कार्लाइलच्या 'प्रॉफेट' पुस्तकांचे त्यांनी मनन केले. टॉलस्टॉयच्या 'गॉस्पेल इन ब्रीफ' व इतर पुस्तकांची त्यांच्या मनावर छाप पडली. पुढे त्यांनी विवेकानंदांचा 'राजयोग', पातंजलीची 'योगसूत्रे' आणि 'गीता' यांचा अभ्यास केला. 'अपरिग्रह' आणि 'संभव' या दोन शब्दांतील खोली त्यांना जाणवू लागली. 'रिटर्न टू नेचर' या एका ग्रंथाने त्यांना फार अस्वस्थ केले. रस्कीनच्या 'अन टू दी लास्ट'ने त्यांची झोप उडविली.

'समूहाच्या हितात व्यक्तीचे हित समाविष्ट आहे. वकील, न्हावी आणि धोबी यांचे श्रममूल्य एकच आहे. सर्वांना आपल्या परिश्रमामधून उदरनिर्वाह करावयाचा हक्क आहे. जमिनीची मशागत करणारा आणि कारागीर यांच्या जीवनाचा आदर्श सर्वांपुढे राहावा,' या रस्किनच्या विचारांनी गांधी भारावून गेले. साध्या राहणीच्या या कल्पनेचा दैनिक जीवनात कसा वापर करता येईल याचा ते विचार करू लागले.

गांधींनी आपली विम्याची रु. १०,०००/- ची पॉलिसी रद्द केली. घरातील आरामशीर राहणी व चैन त्यांनी बंद केली. आत्मपरीक्षण करता करता त्यांचे जीवन साधे-सुटसुटीत होऊ लागले. खर्च कमी झाले. कपडे धुणे, केरवारा करणे, भांडीकुंडी धुणे ही कामे ते स्वतः करू लागले. कस्तुरबा व मुले यांनाही त्यांनी ती सवय लावली. केसही स्वतःच कापू लागले. आहारावरही त्यांनी प्रयोग सुरू केले. शाकाहाराचा प्रचार सुरू केला. औषधे कमी केली आणि निसर्गोपचार यावर भर दिला. मातीचे लेप वापरण्याचे प्रयोगही सुरू झाले. माणसाने ओढल्या जाणाऱ्या रिक्षाचा वापर त्यांनी कधी केला नाही. घरात एका महारोग्यास ठेवून त्याची शुश्रूषा केली. कस्तुरबाना साधेपणाने राहण्याचा आग्रह केला.

१९०१ च्या अखेरीस हिंदुस्थानात परत जाण्याचा निर्णय गांधींनी घेतला. एव्हाना द. आफ्रिकेत त्यांनी सहा वर्षे घालविली होती. यापुढे सर्व वेळ प्रॅक्टिसमध्ये जाईल अशी भीती त्यांना वाटू लागली. हिंदुस्थानातील मित्रही त्यांना परतण्याचा आग्रह करीत होते. तिथे आपला सार्वजनिक जीवनात अधिक उपयोग होईल अशी आशा त्यांना वाटत होती. जरूर पडली तर एक वर्षाने अवश्य परत येईन, असे आश्वासन देऊन १९-१२-१९०१ ला हिंदुस्थानला जाण्याचे त्यांनी नक्की केले. निघण्या अगोदर बरेच सत्कार समारंभ झाले.

खूप हिरे, सोने आणि चांदीचे दागिने त्यांना भेट म्हणून मिळाले. कस्तुरबाना एक सोन्याचा हार भेटीत मिळाला.

हिंदुस्थानला निघायच्या आदल्या रात्री त्यांच्या घरात वादळ उठले. आलेल्या सर्व भेटी परत करावयाचा गांधींचा विचार होता. कस्तुरबाना ते अमान्य होते. गांधींनी त्या प्रसंगाबद्दल स्वतःच लिहून ठेवले आहे–

'त्या भेटीतील जडजवाहीर व ऐवज पाहून माझी झोप उडाली. हा ऐवज ठेवून घेणे अवघड वाटत होते आणि परत करणेही तितके सोपे वाटत नव्हते. ऐवज ठेवून घेतला तर मुलांना काय वाटेल? बायको काय म्हणेल? त्यांना मी सेवा शिकवीत होतो. सेवेतील आनंद हेच खरे बक्षीस ठरते. आमची राहणी दररोज साधी होत होती. लोकांना मी साधेपणाने राहावयास आग्रह करीत होतो. अशा वेळी सोन्याचे घड्याळ वापरणे, बटणे, हार वापरणे कसे शोभेल? या भेटी जवळ ठेवून चालणार नाहीत या निर्णयावर मी आलो. सकाळी कस्तुरबा व मुले यांच्याबरोबर बोललो. मुलांनी तात्काळ होकार दिला. पण कस्तुरबा कबूल झाली नाही. ती म्हणाली... मुलांचे काय? तुम्ही नाचवाल तशी ती नाचतील. पण माझे वेगळे आहे. तुम्ही मला लंकेची पार्वती बनविलेत आणि मी झाल्ये. पण उद्या सुना येतील. भविष्यात समोर येणारा दिवस काही सांगून येणार नाही. मी काहीही परत करणार नाही...' तिच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. मी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. आपण व्यवसाय केला त्याची फी लोकांनी वेगळी दिली. पण जी आपण सेवा केली त्याचा मोबदला असा घ्यायचा का? मग ती सेवा कसली?...शेवटी कस्तुरबाने संमती दिली. सकाळी मी पारशी रुस्तुमजी व तीन-चार नामवंत पुढाऱ्यांना बोलाविले. १८९६ पासून ज्या भेटी मिळाल्या होत्या त्या सर्व त्यांच्या स्वाधीन केल्या. एक ड्राफ्ट बनवून त्याचे उत्पन्न तिथल्या हिंदी नागरिकांच्या अडवणी दूर करण्यास वापरावे अशी व्यवस्था केली.' गांधी परिवाराने अपरिग्रहणाचे व्रत अशा रीतीने घेतले.

त्या अगोदर ऑक्टोबर १८९९ मध्ये बोअर लढाई सुरू झाली. दक्षिण आफ्रिकेतील ट्रान्सव्हाल भागात डचांचे राज्य होते. त्यांना बोअर्स म्हणत.त्यांची व ब्रिटिशांची लढाई सुरू झाली.प्रथम ब्रिटिशांची पीछेहाट झाली. ब्रिटिश साम्राज्याचा पराभव होत आहे हे पाहून गांधींनी आपला संघर्ष बाजूला ठेवला. साम्राज्याचे जतन करणे हे आद्य कर्तव्य मानून त्यांनी हिंदी नागरिकांना ब्रिटिशांस मदत करावयास तयार केले. ११०० स्वयंसेवकांचे शुश्रूषा पथक करून त्याच्या चाळीस तुकड्या केल्या. वीस-वीस, पंचवीस-पंचवीस मैल पायी चालून जखमींची शुश्रूषा करून या पथकाने प्रेक्षणीय कामगिरी केली. फेब्रुवारी १९०० मध्ये लढाई जिंकल्यामुळे पथकाचे काम संपले. प्रमुख कामगिरी बजावणाऱ्यांना पदके मिळाली. यानंतर तरी आफ्रिकन सरकार हिंदी नागरिकांशी सन्मानाने वागेल अशी आशा निर्माण झाली.

नंतर १९ डिसेंबर १९०१ ला गांधी मुंबईस परतले. जरूर पडल्यास अवश्य परत येईन असे आश्वासन त्यांनी द. आफ्रिकेतील हिंदी लोकांना दिले. ◻

## फीनिक्स वसाहत

मुंबईच्या हायकोर्टात गांधींनी प्रॅक्टिस सुरू केली न केली एवढ्यात त्यांना द. आफ्रिकेतून तार आली. 'मि. चेंबर्लेन, सेक्रेटरी ऑफ स्टेटस् येताहेत. असाल तसे या.' अवघ्या एका वर्षाने–डिसेंबर १९०२–गांधी नाताळला जाण्यासाठी परत निघाले.

'ट्रान्सव्हालमध्ये जेव्हा डचांचा अंमल होता तेव्हा तिथे तीन पौंड फी भरून हिंदी लोकांस सरकार सरसकट प्रवेश देत असे. आता ब्रिटिशांचे राज्य आल्यावर त्यांनी हिंदी लोकांवर प्रवेश बंदी घातली. परवाने ठेवले. अलग वसाहती केल्या. गांधींनी आपला एक मित्र मिस्टर एस. अलेक्झांडर, दरबानचा पोलीस कमिशनर यांच्यामार्फत ट्रान्सव्हालचा परवाना मिळवला.

'मि. चेंबर्लेन, सेक्रेटरी ऑफ स्टेटस् हे तिथल्या गोऱ्या व बोअर लोकांनी समजुतीने व एकमेकास सहकार्य करून राहावे असे सांगण्यात आले होते. नाताळच्या हिंदी शिष्टमंडळाच्या तोंडाला त्यांनी पाने पुसली. ते म्हणाले, 'गांधी–राणी सरकार वसाहतींच्या स्वायत्ततेत काहीही ढवळाढवळ करावयास मागत नाही.'

ट्रान्सव्हालच्या हिंदी नागरिकांनाही त्यांनी तसेच उत्तर दिले. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांची निराशा झाली. तेव्हा गांधींनी ट्रान्सव्हाल ब्रिटिश इंडिअन असोसिएशनची स्थापना झाली.

गांधींची जोहान्सबर्गच्या सुप्रीम कोर्टात प्रॅक्टिस सुरू झाली. पूर्वी नाताळमध्ये त्यांचे मासिक उत्पन्न दीडशे पौंड होते, तर ते इथे जोहान्सबर्गमध्ये तीनशे पौंड झाले. चार कारकून ठेवूनही काम आवरेना.

आता गांधींनी थिऑसॉफीचा अभ्यास सुरू केला. तरुणलेल्या माणसासारखे त्यांनी वाचन सुरू ठेवले. इंग्लिश, हिंदी, गुजराती, संस्कृत आणि तामीळ भाषांतील पुस्तके वाचून काढण्याचा तडाखा सुरू केला. मॅझिनी, रस्कीन, टॉलस्टॉय, इमर्सन, थोरो, कार्लाइल यांचे विचार त्यांनी आत्मसात केले. मनुस्मृती, पतंजली योगदर्शन, गीता, उपनिषदे यांचे मनन चालूच होते. रस्कीनच्या 'साधे व सामूहिक राहणे' या कल्पनेने ते भारावून गेले.

रस्कीनच्या 'अन टू दी लास्ट' या ग्रंथातील जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी १९०४ साली दरबानपासून १४ मैलांवर शंभर एकर जमीन एक हजार पौंडास खरेदी केली. फोनिक्स रेल्वेस्टेशनपासून ही जमीन अवघ्या दोन-अडीच मैलांवर होती. एक स्वच्छ पाण्याचा झरा, पडके घर आणि बरीच फळझाडे या प्लॉटमध्ये होती. बाकी सर्व जंगली झाडझाडोरा होता. सर्वत्र गवत. साप होते.

गांधींच्याबरोबर हिंदुस्तानातून जी मंडळी आली होती ती सर्व इथे आली. एका तंबूत राहू लागली. लोकरच पत्र्याची एक मोठी शेड बांधण्यात आली. वसाहतीचे नाव 'फोनिक्स वसाहत' असे ठेवले. वसाहतीचे सदस्य गांधींचे निकटवर्तीय व युरोपिअन मित्र होते. आदर्शवादाने भारावलेल्या या मंडळींनी जोमाने काम करावयास सुरुवात केली. सहकाऱ्यांना तीन-तीन एकरांचे प्लॉटस् दिले. सर्व कामे स्वश्रमांनी करावयाचे ठरले. शेती करून कमीत कमी गरजांनी राहावयाचे आणि स्वयंपूर्ण पद्धतीने जीवन घालवायचे अशी योजना ठरली. पुढे प्रत्येकाची स्वतंत्र झोपडी झाली. स्वच्छता, सफाई ही ज्याची त्याने करण्यावर भर होता. गांधीही तिथे राहू

पृष्ठ २१ वर

# सोलकढी

## □ गुणी विद्याधराची चूक

मराठी नाटकांचे निमति–ठेकेदार हे साबूच्या उत्पादकांपेक्षाही कल्पक असतात, असे मी एक पाहून ठेवले आहे. काहीतरी योग काढून खास नाटकांचे खास प्रयोग मराठी नाट्यरसिकांना ते दाखवत असतात. कधी कोणाची पुण्यतिथी असते; कधी कोण्या नटाचा-दिग्दर्शकाचा–संस्थेचा–संस्थेने विकत घेतलेल्या आरामगाडीचा वाढदिवस असतो; कधी नट वा नटी (पहिल्यांदाच) रंगभूमीवरून निवृत्त होणार असते; कधी नाटकात तर, कधी नटनटीत कलात्मक बदल केलेला असतो; कधी कोणालातरी कसलेतरी पारितोषिक मिळालेले असते; कधी आषाढी एकादशी-खोरदाद साल–ईद–गुड फ्रायडे असतो; कधी चातुर्मासात गात्या गळ्यांना कल्हई लावायची असते; कधी एखादे नाटक कोणत्यातरी परीक्षेला लावलेले असते.

जसे यंदा मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. (मराठी) च्या परीक्षेला 'शारदा' नाटक लावलेले आहे. 'शारदा' म्हणजे आपल्या गोविंद बल्लाळ देवल तालीम मास्तरांचे. १८९९ साली लिहिलेले, अजरामर वगैरे नाटक. बी. ए. ची मुले हे नाटक वाचणार–अभ्यासणार. पण नाटक कोरडे वाचून-अभ्यासून थोडेच समजते ? ते खरे समजण्यासाठी त्याचा प्रयोग पाहावा लागतो. मनाच्या रंगमंचावर, फुकट, एकटचाने नव्हे; सर्व सोयींनी सज्ज नाट्यमंदिरात, साडेसात-साडेदहा अशा सवलतीच्या दरात, हाऊसफुल्ल गर्दीत !

हे सगळे नीट ध्यानात घेऊन, विद्यार्थ्यांचे योग्य, उचित, स्वाभाविक प्रबोधन करायच्या उदात्त हेतूने 'अत्रे नाट्यमंदिरा'ने रविवार दिनांक आठ ऑगस्ट रोजी 'संगीत शारदा' नाटकाचा खास प्रयोग लावला. बी.ए. (मराठी) च्या विद्यार्थ्यांनी आपल्या इष्ट मित्रमैत्रिणीसमवेत नाटकाला गर्दी करून सोडली. नाटक सुरू झाले. मध्यन्तरे रीतसर झाली. संपले. अत्रे नाट्यमंदिरा'चे कल्पक चालक पैशांच्या बरोबर विद्यादानाने जोडलेल्या पुण्याचाही हिशेब करू लागले. घरोघर गेलेले बी. ए. (मराठी)चे विद्यार्थी पाहिलेला प्रयोग आणि वाचलेले नाटक यांचा, सभाव्य प्रश्नाच्या अनुरोधाने, जोडविचार करू लागले.

आणि त्यांना 'शारदा' नाटकाच्या निमित्ताने संशयकल्लोळच घडला. त्यांच्यापैकी प्रकाश कार्लेकर, मोहन काडगे, गिरीश जोशी या विद्यार्थ्यांनी शनिवार दिनांक १४ ऑगस्टच्या 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये एक पत्र लिहून आपला संशयकल्लोळ जाहीर केला. त्यांना चाटचेपाट करणारे असे प्रश्न पडले होते की, या नाटकाचे शेवटचे दोन अंक मुद्दाम तत्परतेने का संपविले ? शारदेचा भाऊ जयंता रंगमचावर विदूषकासारखा कोलांटचा का मारत होता ? नाटकाच्या शेवटी शारदेच्या नऊवारी लुगड्याचे अकस्मात पाचवारी कसे झाले ? आणि मुख्य म्हणजे, या प्रयोगासाठी खास पाचारिलेले पाहुणे कलाकार, माजी नाट्यसमेलनाध्यक्ष, माजी नाटककार आणि आजीनत विद्याधरविशेष गोखले यांनी निरोप्या नोकराच्या लाजबाब भूमिकेत कांचनभटाला 'आर्यभटाचा चाचा' असे का हो म्हटले ??

विद्याधरविशेष गोखले 'लोकसत्ते'चे संपादक असल्यामुळे 'महाराष्ट्र टाईम्स' वाचतात. (आमचे मित्रसुद्धा 'महाराष्ट्र टाईम्स' त्यामुळेच वाचतात.) चौदा तारखेला नेहमीप्रमाणे त्यांनी 'महाराष्ट्र टाईम्स' वाचायला घेतला तेव्हा त्यांना देवलांच्या 'शारदे'च्या प्रयोगाबाबतचे पत्र वाचायला मिळाले. मग आपली चूक झाली हे त्यांना बरोब्बर उमगले. त्याबद्दल नुसती दिलगिरी जाहीर करून खरे म्हणजे भागले असते; पण गोखले जात्याच हळवे पडले; झालेल्या चुकीबद्दल स्वतःला शासन म्हणून नाट्यपरिषदेकडे रु. २५ ची देणगी जमा केली तेव्हाच त्यांनी पुढचे पान लावले. सोमवार दि. १६ ऑगस्टच्या 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये गोखल्यांच्या गुणी विद्याधराची ही गोष्ट जिज्ञासूना वाचायला मिळेल.

एखाद्याला ही गोष्ट अगदीच चिल्लर वाटेल; पण तशी ती नाही हे, तो एखादा सोडून, बाकीच्यांनी नीट ध्यानी धरले आहे. कारण त्या चिल्लर गोष्टीतून गोखल्यांचे बडे चारित्र्य कसे खणखणीत वाजते आहे. चूक कोणाची होत नाही ? सगळ्यांची होते, असे खुद्द भरतमुनींनीच सांगितले आहे. पण आपली चूक कबूल करणारा आणि त्यासाठी स्वतःला पंचवीस रुपयांचे शासन करणारा विरळा–तो खरा नाट्यनिष्ठ, असे त्याच भरतमुनींनी, पुस्ती जोडून, सांगितले आहे.



आणि गुणी विद्याधराची चूक ती काय? त्याने कांचनभटाला 'आर्यभटाचा चाचा' म्हटले एवढीच ना? 'आर्यभटाचा' असे म्हणताना विद्याधर गोखल्यांना कोटी करायची असावीसे दिसते. कोटी ही बुद्धिमत्तेची आणि भाषाप्रभुत्वाची द्योतक असते, असे त्यांच्या लहानपणी कोणीतरी त्यांच्या कानात सांगितले आहे. तेव्हापासून त्यांचे हे असे 'कोटिच्या कोटी उड्डाणे' घेणे चालू आहे. जो कोटी करणारा देवांची तमा बाळगत नाही तो देवलांची तमा कशी बाळगेल? असो. 'चाचा' हे गोखल्यांच्या उर्दूच्या व्यासंगाचे द्योतक आहे. असो. शिवाय, पद्मश्री पु. ल. देशपांडयांनी, मागे विद्याधर गोखल्यांच्या साक्षीने, 'शारदा' नाटकातला तो प्रवेश तंतोतंत मूळ संहितेबरहुकूम सादर केला नव्हता, अशीही माहिती विद्याधर गोखल्यांनी त्या पत्रात पुरवली आहे. (मागे केलेल्या या चुकीबद्दल स्वत:ला शासन म्हणून पद्मश्री पु. ल. देशपांडेसुद्धा नाट्यपरिषदेकडे रु. २५ ची देणगी जमा करतील, अशी आशा आहे. विद्याधरभटाने हे ब्येस केले. आपली नाट्यनिष्ठ मंडळी 'नाट्यपरिषदे'ला २५ रु. देणगी देण्यासाठीसुद्धा चुका करतील आता. 'परिषदे'ला पैशाची चिंताच नको. नाट्यपरिषदेचे अध्यक्ष असताना जे विद्याधर गोखल्यांना जमले नाही ते अध्यक्ष नसताना बहुधा जमून जाणार.) आणखी एक मौलिक सूचना गोखल्यांनी त्या पत्रात केली आहे. तिचाही संबंधितांनी विचार करायला हवा, असे अनंतरावांना वाटते. अभिजात संगीत नाटकांच्या अधिकारी तज्ज्ञांकडून रंगावृत्त्या करून घेतल्या पाहिजेत, आणि त्या रंगावृत्त्यांबरहुकूम (अथवा मूळ संपूर्ण) नाटक करणाऱ्यांनाच परवानगी दिली पाहिजे; म्हणजे नव्या काळात ती जुनी नाटके हवी हवी तशी केली जाणार नाहीत, ही ती सूचना.

एकूण असे की, एक किरकोळ चूक झाल्यावर अंतर्मुख होत्साते विद्याधर गोखल्यांनी ज्या धाऊक दुरुस्त्या शिफारसल्या आहेत, त्या पाहिल्यावर माझे अंत:करण डबडब भरून आले.

मराठी नाट्यसृष्टीत असे विद्याधर अनेकानेक असतील, अशी अनंतरावांची पक्की समजूत आहे; फक्त त्यांना चूक करायची हिंमत नाहीसे वाटते. ती हिंमत त्यांच्यात पैदा होवो, हीच नटराजचरणी प्रार्थना. ◻

पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये
राजहंस प्रकाशन
पुणे ३०

## ◻ माणूस कोठेही झोपतो

माणूस केव्हाही झोपतो– अगदी रात्रीसुद्धा. माणूस कसाही झोपतो– अगदी आडव्यानेसुद्धा. माणूस कोठेही झोपतो–(पहिल्या दोन वाक्यांच्या चालीवर, या तिसऱ्या वाक्यासाठी 'अगदी बिछान्यातसुद्धा' हे शब्द पुरवून चाणाक्ष वाचक मोकळे झाले असतील. त्यांनी तसे करावे यासाठीच पहिली दोन वाक्ये त्या विशिष्ट चालीत रचली होती. पण तिसऱ्या वाक्यासाठी तुम्ही पुरवता आहात ते शब्द अनंतरावाला नको आहेत. तुम्हाला हुर्योहूल देऊन तो म्हणतो आहे–) अगदी शवपेटीतसुद्धा.

माणसाला झोप लागते. हीच गोष्ट 'आहार, निद्रा, भय, मैथुनंच,' या सुप्रसिद्ध श्लोकात खुद्द पद्मश्री अनंत काणेकरांनीच सांगून ठेवली आहे. झोप येईपर्यंतच माणूस जागा असतो. (झोप लागल्यावर त्याला सहसा जागे राहता येत नाही.) झोप येण्यासाठीच तो जागा असतो. झोपेसाठी काय वाटेल ती किंमत द्यायला माणूस तयार असतो. झोप घ्यायचे एकदा ठरले की माणूस आडवा होण्याच्या उद्योगाला लागतो. तशी मुंबईच्या गाडयांतून जाता-येता उभ्याने गाढ झोपणारी किंवा पुण्याच्या रस्त्यांतून सायकलीवर बसून शांत झोपणारी आणि स्वप्नेही पाहणारी माणसे आहेत; नाही असे नाही. पण आडव्याने झोपणे हे अंमळ जास्त सोयीसुखाचे असते हे माणसाच्या लक्षात आलेले नाही, असे म्हणतात. (हे खरे नव्हे. घोडासुद्धा आडव्याने झोपतो, असे आमचे घोडयाचे जाणकार मित्र म्हणतात. मीसुद्धा एकदा आडवा झोपलेला एक घोडा पहिला होता. तो आडवा असल्यामुळे झोपलेला आहे, असे मला म्हणवेना. तेव्हा मी त्याला उभा केला आणि त्याच्यावर झोप लादली.) आडवे होण्यासाठी, देशकालपरिस्थितीप्रमाणे माणसाने वेगवेगळ्या धर्तीचे बिछाने कल्पकपणे तयार केले आहेत : भूमी ही सगळ्यात विस्तृत शय्या होय! आगबोटीत, आगगाडीत बर्थ्स असतात. तुमच्या–माझ्या घरी तीन बाय सहाच्या गाद्या किंवा सोफा कम बेड, गिर्यारोहक मंडळी पिशव्या वापरतात. शिकारी कॅम्प–कॉटवर किंवा दोन झाडांच्या आधारे लटकवलेल्या झोळीत झोपतात. पाळणे आणि झोपाळे आपल्याला ठाऊकच आहेत.

पण अमेरिकेत क्लेव्हलँडमधल्या एका सतरा वर्षांच्या छोकरीने झोपण्यासाठी चक्क एक शवपेटी करून घेतली आहे. शवपेटीत, खारकेतल्या बीसारखी, ती सुखात झोपते. पण हे पाहून शेजाऱ्यापाजाऱ्यांची मात्र झोप उडाली आहे. त्यांना ते फार अभद्र वाटते. काळझोपेसाठी जी शवपेटी योग्य ती अल्पकाळ झोपेसाठी सर्वथैव अयोग्य असे त्यांचे म्हणणे. त्या छोकरीला हे पटत नाही. शवपेटीबद्दलचा पारंपरिक संकेत तिला मान्य नाही. शवपेटी हीसुद्धा एक इतर पेटयांसारखी पेटी : झोपायला फार फार सोयीची. आणि झोपेच्या बाबतीत केव्हाही बिछान्यापेक्षा झोपणे महत्त्वाचे, म्हणूनच अनंतरावांनी सुरुवातीलाच सांगितले की माणूस कोठेही झोपतो– अगदी शवपेटीतसुद्धा!

--अनंतराव

पॅरिस, आय् लव्ह् यू

लेखांक सहावा

शांताराम पारपिल्लेवार

# कलाकारांचं खेडं-मॉंटमार

मारी थेरेस अन् मी पुढं बसतो. कोठारी कारच्या मागच्या सीटवर आहे. त्याची पुढं बसायची इच्छा होती. पण मारी म्हणते, 'शांताराम, यू कम इन दी फ्रन्ट. आय कॅन टॉक टू यू.' तिला कुणीतरी बोलायला हवं असतं. कोठारी तसा बोलतो कमी. कलेच्या बाबतीत माझी अन मारीची वेव्हलेंथ जमते.

'मी माझ्या एका मैत्रिणीला फोन केलाय्. तीसुद्धा आपल्याला कंपनी देणार आहे.'– मारी थेरेस, 'ती चांगली फोटोग्राफर आहे. शौक आहे फोटोग्राफीचा.'

'कोण ?'

'तिचंही नाव मारी थेरेस आहे. आम्ही दोघीही एकाच शाळेत शिक्षिका होतो. तिला आता जास्त पगाराची नोकरी मिळालीय्.'

'कुठं काम करते ती आता ?'

'ती एका काम्प्यूटर कंपनीत आहे.'

'दोन्ही मारी थेरेस सारख्याच आहेत का ?'

'तुला म्हणायचं काय ?'

'अग, स्पष्ट आहे. ती तुझ्याइतकीच सुंदर आहे का ?'–मी हसत म्हणतो.

'ओह, यू आॅर ए नॉटी बॉय. एका दगडानं दोन पक्षी मारतो आहेस.' रमेशकडे मागे वळून पाहात म्हणते–'सी. हाऊ सिम्पल ही इज ?'

'आय बेग टू डिफर. टू बी क्वाएट इज नॉट टू बी सिम्पल ?'–मी.

'चूप राहायला काय घेशील ?—' रमेश वैतागून विचारतो.

'मला कळत नाही, ही मारी तुझ्यावर इतका जीव का टाकते?'–मी मराठीत त्याच्याशी बोलतो.

'मलाही कळत नाही.'

'खरं आपण कुठले ? ही कुठली ? थोड्या वेळासाठी भेटतो काय ? अन् जवळ इतक्या येतो जशी आपली जन्माजन्माची ओळख असावी.'

'शांताराम, तुला बोलता चांगलं येतं. कधीकधी तुझा हेवा वाटतो. तुझ्या बोलण्यानंच तू जग जिंकतोस.'

'रमेश, आता मात्र मला तुझा हेवा वाटतोय्. तू चुप राहतोस ते तिला आवडतं. तू सिंपल आहेस् तेही तिला आवडतं. अल्बर्टो मोराबियाच्या एका कादंबरीत एक वाक्य आहे. मला खूप आवडलेलं. प्रिय माणसाचं सारंच आपल्याला आवडतं. त्याचे गुण अन् त्याचे दुर्गुणही. ते त्याचे नसतात. ते तर आपलेच झालेले असतात.'

'यू आर टॉकिंग समथिंग कॉन्फिडेन्शिअल ? मारी मध्येच विचारते.

'नाही. कॉन्फिडेन्सिअल असं काही नाही.' –मी.

'तुझी अन् रमेशची जुनी ओळख आहे का ?'

'नाही- वुई मेट इन फ्रान्स अॅन्ड बिकेम फ्रेन्डस्.'

'शांताराम, मॉंटमार तू एन्जॉय करू शकशील. आय् अॅम डाऊटफुल अबाऊट रमेश. ही इज एलेक्ट्रॉनिक इंजिनीअर. इझन्ट ईट रमेश ?'

'आय वुईल एन्जॉय युवर कंपनी, मारी.' –रमेश.

'यू वुईल लाईक मेनी थिंग्ज देअर.'– मारी थेरेस.

'काय आहे तिथं ? अन् असं अर्ध्या रात्री काय पाहणार आपण ?'–रमेश.

मी मध्येच बोलायला लागतो, 'मॉंटमार हे कलावंतांचं खेडं आहे. पॅरिससारख्या अत्याधुनिक शहराच्या वेशीवर अजूनही आपलं स्वत्व टिकवून ठेवलं आहे त्या खेड्यानं.'

...पाएर ला मूरच्या 'मोलिनरूज' कादंबरीत पहिल्यांदा मॉंटमारशी माझी ओळख होते. केव्हातरी कॉलेजमध्ये असताना मी ती कादंबरी वाचली. नंतर त्या कादंबरीवर आधारलेला रंगीत चित्रपट पाहिला. त्यातला बुटका चित्रकार तुलूस लोत्रेक तेव्हापासून माझा आपला झाला. वयाच्या चौदापर्यंत तो साधारण मुलासारखा होता. त्याला एकामागोमाग दोन अपघात झालेत. ज्या वयात त्यानं धूम पळावं, उड्या माराव्या, खेळावं; त्याला नियतीनं एक शापित अस्तित्व बहाल केलं. यापुढं तो सरळ चालू शकणार नव्हता. पळणं तर दूर राहिलं. त्याच्या पायाचे स्नायू मृत झाले होते. त्याची वाढ खुंटली होती. त्याच्या चेहऱ्यावर गांभीर्य दिसू लागलं. जणू त्याच्या आयुष्यात बालपण कधी आलच नव्हतं–अधू पायांचं अस्तित्व म्हणजे मरण रेटण्यासारखं होतं. त्याच्या आईच्या डोळ्यातले अश्रू वाळेनात. त्याही स्थितीत ती मुलाचं धैर्य बांधायची. नवा विश्वास त्याच्या ठायी बिंबवायचा प्रयत्न करायची. तिच्या प्रयत्नाची परिणती म्हणून की काय एक दिवस त्यानं आईला येऊन सांगितलं–मी डिग्री घेतलीय्. ती आनंदी झाली. म्हणाली, पुस्तकासारखा इमानी मित्र नाही. त्याला मित्रही नव्हते. आईचा मास्टर्स डिग्रीसाठी आग्रह. अन् त्याच्या मनात अस्थिर भविष्याविषयी अनास्था. काही न करता नुसती पुस्तकं वाचीत रटाळवाणं आयुष्य एक दिवस संपवायचं–हा विचारच त्याच्या मनात भीती निर्माण करायचा. जन्ममृत्यूचा विचार माणसाला तत्त्वज्ञ बनवतो. अन् त्याच्या उरी वसणाऱ्या तत्त्वज्ञानं सगळं धुडकावून लावलं. सगळ्या श्रद्धा. सगळे विश्वास अन् देवही. तशात कुठूनतरी उत्स्फूर्त साद यावी तसं त्याचं हृदय भरून आलं. नाही, माझं शापित अस्तित्व मी नियतीच्या पायावर डोकं आपटून संपवणार नाही. माझ्या अस्तित्वाला एक वेगळं परिमाण देईन. नियतीनेही स्तंभित व्हावे एवढं मी स्वतःला मोठं करीन. मी कलावंत होईन– त्यानं मनोमन ठरवलं. त्यानं कलेचा

शास्त्रशुद्ध अभ्यास सुरू केला. वर्गात लिआँ बोनाटने (कलेतील गम्य समजणाऱ्या शिक्षकाने) त्याला आणखी दुखवलं. त्याच्या अहंकाराला डिवचलं. तुला सौंदर्य पाहायची दृष्टीच नाही; तू कुरूप तेवढंच पाहू शकतोस हे शब्द एखाद्या कधीही न बुजणाऱ्या जखमेसारखे तो जन्मभर वागवत राहिला. आणि एका आयुष्यात, फक्त उण्यापुऱ्या सदतीस वर्षात तो कितीतरी आयुष्यं जगला. लिजेंडरी झाला. वयाच्या विसाव्या वर्षी तो माँटमारला आला. नुकतंच माँटमारच्या खालच्या सडकेवर नवीन हॉटेल मोलीनरूज उघडलं होतं. रात्रीचं तिथं कॅनकॅन नृत्य व्हायचं. तो तिथं बीयर पीत बसायचा. तिथल्या नाचणाऱ्या, गाणाऱ्या मुलींची चित्रं काढत बसायचा. त्याच्या चित्रांनी त्या मुलींनाच नव्हे, तर मोलीनरूजला, अमर केलं. पॅरिसला कलात्मक परिमाण दिलं अन् माँटमार, कलाकारांचं खेडं, स्वच्छंद–मुक्त राहता येईल असं जगावेगळं जग जगभर चर्चिलं जाऊ लागलं. Montmartre was astate of mind and a way ot life. अशी तुलूस लोत्रेकची धारणा होती. ह्या खेड्यात कुठून कुठून कलावंत यायचे, कवी यायचे, लेखक यायचे, दर्दी यायचे. इथल्या रेस्ट्राँमधून बीयर पीत ते स्वप्नांचे इमले बांधायचे. माँटमारनं त्या सर्वांना जीवनाची आसक्ती दिली, जगण्याचा मंत्र दिला अन् कलेचा धर्म दिला. माँटमार असं कलेचं धर्मपीठ झालं. कुणाही धर्ममार्तंडाच्या स्वामित्वाशिवाय. म्हणूनच मारी थेरेस जेव्हा म्हणाली, 'इफ यू ऑर नॉट टायर्ड, वुई वील गो टू माँटमार' मी आतुर झालो. तिथं केव्हा एकदा पोचतो अन् केव्हा एकदा ते शाश्वत स्वरूपात अजूनही आपल्या अस्तित्वाला घेऊन उभं आहे हे पाहतो असं मला झालं......

'म्हणजे वेड्यांचं पेडगावच आहे म्हण की ते?' रमेश म्हणतो. काय सांगावं त्याला? माँटमार काय आहे हे सांगून समजणार नाही.

'माँटमार फक्त अनुभवता येतं. अन् तो अनुभव ह्या रात्री आपण घेणार आहोत. तुझ्या सगळ्या कॉमेन्टस् तू नंतर द्याव्यास हे बरं!' – मी.

कार पॅरिसच्या ऐसपैस रस्त्यावरून एखाद्या बोटीनं अलगद पाण्यावरून तरंगत जावं तशी जात आहे. डोळ्यात पुढं जाणाऱ्या कितीतरी गाड्यांच्या टेललॅम्पसचा गर्द लाल उजेड उतरतो आहे. कधी आमची गाडी सीनला समांतर तर कधी दिव्यांच्या महौघात उजळून निघालेल्या नॉटरडेमच्या बाजूनं जातेय्. सडकेवरच्या विद्युत् दीपांचीही मौज वाटते. पॅरिसच्या सडका जुन्या आहेत. त्यावर उभे दिव्यांचे खांब अलंकारिक पद्धतीचे जुनेच आहेत. जुन्या कंदिलासारखे. इलेक्ट्रिकच्या तारा वर कुठेच दिसत नाहीत. दिसतात खांबांच्या शेंड्यांवर मशालीगत तेवणारे दिवे फक्त. एका मागे एक कितीतरी गाड्या जात आहेत. मध्यरात्र झाली असली तरी, रहदारी संपलेली नाही. एवढं एक आहे. दिवसा ब्रेकवर अवधान ठेवून गाडी चालवावी लागते इतकी गाड्यांची गर्दी. त्यात ओव्हरटेक करणारांची कटकट. मारीचा त्यांच्यासाठी ठेवणीतला शब्द 'स्टुपिड मॅन' आहेच. रात्री मात्र गाडी भरदाव सोडता येते. मी स्पीडोमीटर बघतो. काटा शंभर-एकशेदहा ह्यांच्यामध्ये आंदोलित होत असतो.

'मारी, आय होप वुई आर गोईंग टू माँटमार?' मी विचारतो.

'ऑफ कोर्स! तुला काही वेगळं वाटतं का?'

'नाही. काटा शंभराच्या पुढं गेलाय्. यू वोन्ट टेक अस डायरेक्ट टू हेवन.'

ती काच फुटल्यासारखी हसते.

'ओह्! यू आर लाईक् ए गुड बॉय.' कारची गती कमी होते. इतकी रहदारी असली तरी इथं गोंगाट नाही. आवाज नाही. हॉर्नचा आवाज तर चुकूनही ऐकू येत नाही. लोकांची बोलण्याची ढबही वाखाणण्यासारखी. मारी माझ्याशी बोलत असली की रमेशला ऐकू जाणार नाही. इथं 'टॉक' नावाचा शब्दच नाही. फक्त 'व्हिस्पर.'

'दुसरी मारी भेटणार कुठं?' – मी.

'ती सरळ माँटमारला येणार. तिला सांगितलंय् मी कुठं भेटायचं-'

'चुकामुक व्हायची नाही ना?'

'शक्यच नाही. ला बोहेमी रेस्टॉरंटच्या पुढं ती आपल्याला उभी दिसेल.'

अजून तिनं सिगरेट कशी काढली नाही ह्याचं आश्चर्य वाटतं. एरव्ही फार नाही तरी अधूनमधून सिगरेटची तल्लफ तिला येते.

कार चढावाच्या रस्त्यानं वळते. ती बाजूच्या पेव्हमेंटवर गाडीची दोन चाकं घेते. अर्धी सडकेवर अन् अर्धी पेव्हमेन्टवर अशी गाडी पार्क करते. सडक दगडांनी बांधून काढलेली आहे. दोन्ही बाजूची घरं जुनाट आहेत. फार तर दोन मजली. सडकही निरुंद आहे. कारमधून बाहेर पडताच मारी म्हणते,– 'लेट मी फर्स्ट बाय सिगरेटस्.'

तरीच – ही पीत कशी नव्हती?

रमेश सिगरेटचं पाकीट तिच्यापुढं करतो. एक ती घेते. एक रमेश घेतो. एक मला देतो. तिच्या लायटरनं ती सिगरेटस् पेटवून देते. ती म्हणते,–'आय डिडन्ट नो रमेश हॅड देम, सो नाईस ऑफ हिम.'

रस्ता बराच चढणीचा असतो. चालताना आम्ही कंबरेत वाकतो. काही बायामाणसं घोळक्या घोळक्यानं परतत असतात. काही वर चढत असतात. क्वचित जोडपी कमरेत हात घालून जाताना दिसतात.

चढण संपते तिथं दोन रस्ते फुटतात. एक डावीकडे जातो, एक सरळ न जाता थोडा उजवीकडे वळतो. मारी माझं लक्ष डाव्या-बाजूच्या एक मजली बिल्डिंगकडे वेधते. बोटानं खुणावते – 'बघ. तिथं कोपऱ्यांत ते हॉटेल आहे ना त्याच्या भिंतीवर बोर्ड आहे, वाच.' अन् मी-रमेश थोडे जवळ जातो. छोट्या फलकावर लिहिलंय्, 'इथं एमिल झोला, विन्सेंट वॅन गो, तुलूस लोत्रेक, सिझॅन्नी, सिस्ले, पिसॅरो, डिगास भेटत असत.' छोट्या सडकेवर बरीच गर्दी दिसते. सडकेवर सिगरेटस्चा धूर भरून राहिला असतो. एरवी झपझप चालणारी पॅरिसची माणसं इथं निवांतपणे एकेक पाऊल हळूहळू टाकताना दिसतात. कुणी सांगावं– ही सगळी पॅरिसची नसतीलही.काही माझ्यासारखी दूरदेशींची असतील. त्या हॉटेलचं नाव मी बघतो–AUBERGE DE LA BONNE FRANQUETE. इथं पॅरिसमध्ये शब्दोच्चार एकदमच वेगळे वाटतात. लिहिलं एक जातं, उच्चार वेगळा केला जातो.

'सी आय टी ई' ला सीटि म्हणायचं अन् 'जी आय् डी ई' ला गीद म्हणायचं. Versailles चा उच्चार व्हेर्सायि करायचा. Louvre ला लूव्ह म्हणायचं. Reaumur ला रोम्यो म्हणायचं. सरावानं ते आता

अंगवळणी पडलं आहे.

देशोदेशीचे लोक इथं येतात म्हणून की काय एकानं आपल्या हॉटेलचं नाव La Consulate असं ठेवलं आहे. रात्रीचे दोन वाजत आहेत. हॉटेलमधून अजून गर्दी भरून आहे. सडकेवर गर्दी आहे. काही दुकानांतून चित्रं टांगलेली आहेत. पॅरिसच्या पेंट केलेल्या प्रिंटस् आहेत. आयफेल टॉवर, नॉटरडेम्, सक्री-सोर (मॉंटमार), आर्क डि ट्रायम्फ... ती विक्रीसाठी आहेत.

एक मुलगी कोपऱ्यात मॉड ग्लासेस घालून स्वच्छंदपणे सिगरेट पीत आहे. ती एका पायावर उभी असून दुसरा पाय तिनं मुडपला आहे. पाठ हॉटेलच्या भिंतीशी टेकवली आहे. केसं सोनेरी डाय केलेले. भडक लिपस्टिक. मुडपलेल्या हातात मोठी पर्स आहे. वाटतं, ही दुसरी मारी तर नाही ? मी मारीचं लक्ष तिकडे वेधतो. ती पाहते अन् खूप हसते. आम्ही चालतच असतो. 'तू इतकी का हसलीस ?' मी विचारतो.

'तुझी स्त्रियांकडे पाहायची दृष्टी खूप निर्मळ दिसते.'

'असं का वाटतं तुला ?'

'तू त्या स्त्रीला कुठं ओळखलंस ?'

'......'

'ती गळ टाकून बसलीय्. बघतेय् गळाला एखादा मासा लागतो का ?'

'म्हणजे ग !'

'अगदीच बुद्धू आहेस तू. एवढंही तुझ्या लक्षात येत नाही ? शी इज ए व्होअर.'

'अरेच्च्या !' म्हणत मी वळून मागे तिच्याकडे पाहतो. मारी म्हणते-'डोन्ट लुक बॅक. पुढे खूप काही पाहण्यासारखं आहे.' अन् माझा हात जवळजवळ धरूनच ती मला पुढं ओढते. तेवढ्यात ती किंचाळतेच. माझा हात अपापच सुटतो. 'हीयर शी इज !'

मी वर बघतो. ला बोहेमीचा बोर्ड असतो. एक मारी दुसऱ्या मारीला गालावर किस देते. त्या अशा भेटतात जशा कितीतरी वर्षांनंतर पहिल्यांदा भेटत आहेत.

मग आमची ओळख मारी तिच्याशी करून देते. मी दुसऱ्या मारी थेरेसला म्हणतो-' मी तुला मॅड मोझेल रिपर्ट म्हणणार. तुझी काही हरकत नाही ना ?'

'नॉट ॲट ऑल.'

'किती वेळ झाला येऊन ?-' मारी दुसऱ्या मारीला विचारते.

'पंधराएक मिनिटं झालीत. मी तुम्हा लोकांची वाट पाहात उभी होते. क्रेझी बॉईज मला विचारून गेलीत.'

'क्रेझी बॉईज ! अन् काय विचारलं ?' मी.

'मुलं मुलीला आणखी काय विचारणार ? विचारीत होते रात्रीचे किती घेणार ?'

'मग तू काय म्हटलंस् ?'

'काय म्हणणार ? म्हटलं माझ्या रात्रीची किंमत तुम्ही देऊ शकणार नाही. गो टू पिगेल. युवर मदर वुईल बी स्टॅंन्डिंग ऑन दि पेव्हमेंट. शी गेव्हं यू एव्हरीथिंग एक्सेप्ट सेक्स. नाऊ कॅन हॅव्ह सेक्स फ्रॉम हर'

'मारी, ही रिपर्ट खूपच तिखट दिसते नाही ?'

'पहिल्यांदा भेटलास ना ?' म्हणून अशी वाटते. तिला समजायला मला वर्षं लागलीत. शी इज व्हेरी काइंड. शी इज लाईक ए जेंटल रिपल् फ्रॉम क्रूड माऊंटेन.'

तिचे केस कापले असले तरी काळे आहेत. डोळ्यावरचा चष्मा खूपच जाड काचेचा आहे. तिनं चेक डिझाईनचा फ्रॉक घातला आहे. तो चांगला टोंघळ्यापर्यंत उतरला आहे. चेहरा गोल. गाल फुगीर. पांढऱ्या रंगाचं पूर्ण बाह्याचं ब्लाऊज घातलं आहे. त्यावर गर्द लाल रंगाचा पुलओव्हर आहे. वयाचा अंदाज ठीकसा येत नाही. तरी बत्तीसेक वर्षांची तरी असावी. अंगानं बरी भरलीय्

'मारी, ही मिस् रिपर्ट चष्म्याशिवाय तुला ओळखू शकेल का ?'

'तुला माहीत नसावं. ज्यांचे डोळे अधू असतात त्यांचं घ्राणेंद्रिय तीक्ष्ण असतं. ती वासावरून ओळखेल.'

'बापरे ! दूर राहायला पाहिजे तिच्यापासून.'

'शांताराम, तुला तिच्यापासून दूर राहताच येणार नाही. ती कलावंत आहे. अन् तू कलारसिक. तू तिच्यासोबतच राहा. मी आहे रमेशसोबत.'

रस्ता अगदीच निरुंद असल्यामुळं ओळीनं चौघांना चालता येणं शक्य नाही. आम्ही जोडीनं चालतो.

फ्रान्सला यायच्या आधी मी मुद्दाम नागपूरला भाऊ समर्थला भेटून आलो होतो. वाटलं होतं त्याचे काही कलाकार मित्र पॅरिसमध्ये नक्कीच असणार. त्याच्याकडून कळलं की पॅरिस ही कलावंतांची 'प्रॉमिस्ड लॅन्ड' आहे. जगभरचे कलावंत तिथं येतात. पन्नास हजार कलाकार आपला स्टुडिओ सडकेवर, फूटपाथवर थाटतात. चित्रांची प्रदर्शनं चक्क फूटपाथवर भरवली जातात. एखाद्याचं एक जरी चित्र खपलं तर तो प्रदर्शन गुंडाळतो. पटापट फोन करून मित्रांना बोलावतो. मग ते सारे एखाद्या बोहेमियन रेस्ट्रॉंत बसून वाईन पितात, बीअर पितात. विसरतात की पुन: उद्या प्रदर्शन सडकेवर थाटायचं आहे. प्रत्येकाच्या डोळ्यात विन्सेंट व्हॅन गोची, पाल गॉगिनची, तुलुस लॉत्रेकची स्वप्नं असतात. पण जगभरच्या पॅरिसला आलेल्या कलावंतांत त्याचा मित्र कुणी नसतो.

मिस् रिपर्ट विचारते, 'एखाद्या इथल्या चित्रकाराशी ओळख आहे का तुझी ?'

'दिवंगत चित्रकारांशी तेवढी आहे.'

ती हसते. म्हणते, 'मग एकदोन दिवसात एखाद्या जिवंत चित्रकाराशी तुझी भेट ठरवते मी.'

आम्ही थोडं पुढं जातो. रस्त्याच्या डाव्या बाजूला ओळीनं कितीतरी रेस्टॉरन्टस् आहेत. आत तर गर्दी आहेच. फूटपाथवर ठेवलेल्या खुर्च्या-टेबलंही रिकामी नाहीत. दुसऱ्या बाजूला चौकोनी आकाराचं मोठं पटांगण आहे. त्यात छत्र्या लावून त्याखाली खुर्च्या-टेबलं ठेवली आहेत. फुलांच्या कुंड्या आहेत. झाडांच्या फांद्यांवरून फळासारखी दिव्यांची सोय केलीय्. तिथंही गर्दी अमाप. कुणी एक पोक्तशी बाई बीअर पीत बसली आहे. एक चित्रकार तिच्यापुढं बसून तिचं चित्र काढतो आहे. असे चित्रकार इथं खूप. काहींनी चित्रांचं प्रदर्शनच फूटपाथवर मांडलंय्. एका चित्रात, वाटतं, त्याने ते ब्रशनं काढलं नाही, नुसती ट्यूब ओतून चित्र काढलं की काय ? एक गरुड वर झेप घेतोय्. खाली समुद्राची लाट त्याला धरायला झेपावतेय्, अख्खा कॅनवास राखाडी रंगात आहे. गरुड भडक लाल रगात. पाच चित्रं त्यानं टांगलेली आहेत. चारेक खाली झाडांच्या बुंध्याच्या आधारानं ठेवली आहेत. तो निर्विकार सिगरेट पीत उभा आहे. अस्ताव्यस्त जीन्स अन जॅकेट त्यानं घातलंय्. केस थेट मानेपर्यंत आलेत. डोळ्यात भकास उदासवाणा भाव आहे. डोळे तारवटलेले वाटतात. सिगरेटमध्ये तंबाखूऐवजी त्यानं गांजा तर भरला नाही ना ? मी गरुडाची किंमत विचारतो. पाचशे फ्रॅंक. बापरे !

मिस रिपर्ट सांगते, 'तो शंभर फ्रँकला देईल हे चित्र.'

'मग आपल्यालाच एव्हढं महाग का सांगितलं त्यानं ?'

'अमेरिकन टूरिस्ट येतात ना ? ते देतात मागतील ती किंमत.'

'अन ही पोर्ट्रेट काढणारी मंडळी किती घेतात ?'

'कुणीतरी तुला टच करील. त्याला तूच विचार.'

तेवढ्यात एकजण माझ्यापुढं येऊन विचार-तोच, 'मांस्य, पोर्ट्रेट. पॅरिस सोवेनीर ?' बुटकासा तरुण. अस्ताव्यस्त केस. डाव्या हातात त्याच्या पॅड आहे. 'हाऊ मच ?' माझ्या प्रश्नाला त्याचं उत्तर 'ओन्ली फिफ्टी फ्रँक्स.' फिफ्टी फ्रँक्स म्हणजे शंभर रुपये. साध्या पेन्सिलनं काढलेल्या चित्राला शंभर रुपये जास्त वाटतात. 'शांताराम हा तीस फ्रँकला तयार होईल. काढायचं का तुला ?'

'नको...'

आम्ही त्या पटांगणाला वळसा देतो. इथं नुसते चित्रकारच नाहीत. तर चित्रं लावलेल्या छोट्या आर्ट गॅलरीज़ही आहेत. आम्ही मन-सोक्त पाहत असतो. एका चित्राकडे मी सारखा पाहत राहतो. तीन फूट बाय तीन फूट आकाराचं लाईट रंगात काढलेलं चित्र. एका बाईचं. चेहरा लांबोडा. स्तनं लोंबलेली. हातानं तिनं वस्त्र कसं तरी पुढं धरलंय. कमरेखाली पाहतेय जशी भिजल्या डोळ्यांनी. चेहऱ्यावरचे भाव स्पष्ट सांगत आहेत. तिला नाइलाज म्हणून मॉडेल व्हावं लागलं.

मारी मला म्हणते, 'ह्या आधी कुठं पाहिल्यासारखी वाटतात अशी चित्रं ?'

'हो. पाहिलीत. पण त्यांच्या डोळ्यात असा दुखरा सूर नव्हता.'

'मॉडियॉग्लिनीबद्दल बोलतोस ना ? कधी इथंच मॉंटमारमध्ये तो असाच कुणाला विचारायचा—पोर्ट्रेट काढणार का ? त्याची नग्न स्त्रियांची चित्रं म्हणजे पोएम ऑफ फ्लेश होती.'

'ही मात्र किती कूड आहेत. नाही ?' मी तिथल्या चित्रांकडे पाहतो.

'तो मॉडियॉग्लिनी होता. मॉडी एका युगात एकत होतो. इमिटेशन्स कॅनॉट प्रोडयूस जिनियस.'

गॅलरीतनं आम्ही बाहेर पडतो. काही मुलीही पोर्ट्रेट ड्रॉइंग करतात. रमेशचं लक्ष कोपऱ्यावरच्या एका वेगळ्याच कलाकाराकडे जाते. तो सारखा पाहत असतो. एक कला-वंत कैचीनं तुमचं प्रोफाईल पाच सेकंदात कापून तुमच्या हवाली करतो.

'प्रोफाईल हवं का ?'—मारी त्याला विचारते.

रमेश तर त्या कलावंताच्यापुढं खुर्चीवर बसतोही. कलावंत त्याला म्हणतो, 'क्षणभर डावीकडे सारखं पाहा.' डावीकडे खुर्चीवर एक सुंदर मुलगी बसलेली असते. ती कला-वंताची मुलगी असते. ती इतकी सुंदर की कुणीही तिच्याकडे पाहातच राहावं. तेवढ्यात कलावंत कागदाचा प्रोफाईल कैचीनं कापून रमेशच्या हातात देतो. त्याला पैसे द्यायला पाकीट काढतो. त्या आधीच मारीनं कला-वंताच्या हातावर पाच फ्रँकचं नाणं ठेवलं असतं.

हे पटांगण अशा कलावंतांनी गच्च भरलेलं आहे. कुणी पोर्ट्रेट काढतो. कुणी प्रोफाईल कापतो. कुणाचा वनमॅनशो असतो. सारं उघड्या आकाशाखाली सडकेवर. ओपन एअर होटेलमध्ये बेअररची जास्ती टिपसाठी अधिक आर्जवी वागणूक. मला तरी ते कठ-पुतळीच्या खेळातल्यासारखे वाटतात. त्यांच्या हालचाली इतक्या साचेबंद. मोठ्या मग मधली बिअर हिंदकळते. एक जोडपं सारं विसरून तिथंच आलिंगनबद्ध झालेलं असतं.

मनगटावरच्या घड्याळात काटा पुढं सरकत असतो. गर्दी मात्र कमी होत नाही. थोडं पुढं फूटपाथवर काही निग्रोंनी विका-यच्या वस्तू मांडलेल्या असतात. लाकडी हत्ती, चामडी बॅगा, निग्रो ब्लॅक बस्ट—लाकडात कोरलेले. हस्तीदंती माळा...काय धिप्पाड असतो एक एक निग्रो ? दुकानातून सांडणाऱ्या प्रकाशात काळा निग्रो काळ्या आकाशाखाली उजळून निघतो.

आम्ही चर्चजवळ येतो. चर्चच्या पुढच्या पायऱ्यावर तर आनंद सोहळा चालला असतो. 'शांताराम, माईंड युवर लेग्ज !' बीयरच्या फुटक्या बाटल्या इतस्ततः विखुरल्या असतात अन् कोट-पँट घातलेली कितीतरी मुलं-मुली उच्चरवात एका लयीत टाळ्या वाजवीत गात असतात. एकाच्या हातात गिटार असते. दुसऱ्याच्या तांबोली. एकजण गाण्याची एक ओळ म्हणत असतो. बाकीचे सारे त्याची री ओढत असतात. टाळ्या वाजवत असतात. साद देत असतात. तीच गाण्याची ओळ उच्चारीत असतात. एरव्ही इतका गोंगाट, इतका गोंधळ, इतकी आनंदऊर्मी पॅरिसच्या वातावरणात दिसत नाही. सारा आनंदच जणू सप्रेस केला जातो. दाबला जातो. पॅरि-सशी विसंगत मॉंटमारचं वातावरण असतं. फ्रेंच माणूस इतका मोकळा सहसा होत नाही.

'मारी, फ्रेंच माणूस ओठातल्या ओठात बोलणारा, भाव व्यक्त करायला शब्दापेक्षा अंगविक्षेप (गेश्चर) करणारा, पोटभर हसा-यचं मनात असूनही ते दाबणारा—असं अस-ताना हा आनंद, ही ऊर्मी, हा गोंधळ, हा गोंगाट कसा ?'

मारी हसते. 'ही फ्रेंच नाहीत.'

'तर !'

'दे आर अल्जेरियन्स. दे आर मायग्रेटेड एमिग्रंट्स. हलकी कामं करायला त्यांना इथं आणलं जातं.'

—हलकी कामं ? तो शब्द मला बोचतो. खऱ्या अर्थी फ्रेंच माणसाला ऐषआरामात, चैनीत, सुखात राहता यावं म्हणून धडपड-णारा, श्रम देणारा, घाम गाळणारा हा परदेशी माणूस. तो आपली माणसं, आपला देश सोडून आला. चार सारखी माणसं भोवती जमली, ओठावर गाणं आलं, अगदी आतून आलेलं. तो ते उर बडवून व्यक्त करतो आहे. सुसंस्कृत समाजात भावना व्यक्त करायचीसुद्धा भीती वाटते. भावना व्यक्त करणे हे दुर्बळाचे लक्षण समजलं जातं. घाम गाळणाराला मात्र ह्या गोष्टींची लाज नाही. कारण ह्यात लाजिरवाणं आहे तरी काय ? शीण घालवायचा त्याला तेवढा एकच उपाय माहीत असतो. नाचणे...गाणे. गाता येईल तेवढ्या शक्तीनिशी. अशा आनंदाला, अशा गाण्याला पैसा लागत नाही. ज्यांना पैसा मोजता येतो त्यांचा आनंद पॅरिसमध्ये वेगळा आहे. त्यांच्यासाठी कॅबरेज आहेत, स्ट्रीप्टीज आहेत, कॅनकॅन आहे, बेली डान्सर आहेत.

घड्याळात तीन वाजत आहेत. पहाट व्हायला आली आहे. अन् मॉंटमारला रात्र जागते आहे आनंद भरून राहिला आहे. तो बीयरच्या फेसात आहे. रेस्ट्रांतभरल्या धुरात आहे, प्रोफाईल कापणाराच्या कैचीत आहे, पोर्ट्रेट आर्टिस्टच्या पेन्सिलीत आहे, गिटारच्या तारात आहे. अल्जेरियन्सच्या गाण्यात आहे. निग्रोच्या चेहऱ्यात आहे.

आम्ही निघतो. परत कारच्या दिशेनं. मिस् रिपर्टनं दुसऱ्या दिवशीच्या डिनरचं आग्रही आमंत्रण दिलं असतं. मी थकलो असतो. आतून तुटायला आलो असतो.

[ क्रमशः ]

पुस्तक परिचय

## The Bermuda Triangle

By Charles Berlitz ( Avon Books )
Pages 252, Rs. 18·95.

अॅटलांटिक महासागराच्या पश्चिमेस त्याच महासागराचा साधारणत: एक त्रिकोणी भाग आहे. हा भाग बर्मुडा, फ्लॉरिडा, बहामाच्या पुढे पोर्टोरिको याच्या दरम्यान आहे. जगात बऱ्याच गोष्टी अशा घडत असतात की, त्याला शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण मिळत नाही. या भागात आतापर्यंत १०० चे वर आगबोटी व विमाने नाहीशी झाली आहेत. गेल्या २६ वर्षात या आगबोटी व विमानांमधील जवळ जवळ एक हजार प्रवासी नाहीसे झाले आहेत. पण गंमत अशी की, ते अपघात होऊन पाण्यात बुडून मेल्याचे कोणतेही पुरावे सापडले नाहीत. साधारणत: अपघात झाला की समुद्रात किंवा जमिनीत विमानाचे तुकडे, प्रेते किंवा oil slik वगैरे काहीतरी सापडते. पण या बर्मुडा त्रिकोणात आगबोटी व विमाने जणू प्रवाशासह अवकाशात नाहीशी होतात किंवा पृथ्वीच्या पोटात गायब होतात !

असे का होते याचे बरेच तर्क लेखकांनी या पुस्तकात मांडले आहेत: परंतु त्या सर्व तर्कांपैकी एका तर्काचा लेखक जास्त पाठपुरावा करतो. तो हा की, इतर ग्रहांवरचे लोक या आगबोटी व विमाने प्रवाश्यांसह पळवतात. परग्रहावरचे लोक पृथ्वीवर पाळत ठेवत आहेत व पृथ्वीवरचा मानव आता नाहीसा होण्याच्या मार्गावर आहे तर थोडे मानव व त्यांच्या संस्कृतीची प्रतीके संग्रह म्हणून इतर ग्रहांवर ठेवावी या हेतूने आगबोटी व विमाने पळविली जातात असे एक संभाव्य स्पष्टीकरण दिले जाते ! म्हणजे एकंदरीत या पळविलेल्या व्यक्ती भाग्यवानच म्हटल्या पाहिजेत !

लेखकाची शैली अगदी सरळ व वेधक आहे. वाचकाची उत्कंठा सातत्याने जागृत ठेवण्यात त्याला भरपूर यश आले आहे. विमान, आगबोट व समुद्र या विषयावरची महत्त्वाची माहिती ठायी ठायी दिसून येते. वाटल्यास तुम्ही जर hard boiled rationalist असाल तर परग्रहावरची माणसे वगैरेवर तुम्ही विश्वास ठेवू नका. पण एवढ्या अफाट विश्वाच्या पसाऱ्यात कुठे न कुठे तरी निश्चित 'जीवन' असणारच. अर्थात आपल्यास जे 'जीवन' माहिती आहे त्याच्यापेक्षा ते अगदीच निराळे असणार.

या भागात (बर्मुडा त्रिकोणात) विमाने व आगबोटी नाहीशी होण्याचे प्रमाण इतर भागापेक्षा जास्त आहे. समुद्राच्या महाभयानक लाटा (कधी कधी या लाटांची उंची २०० फुटापर्यंत असते) व समुद्रात रहाणारे अजस्र प्राणी यांच्यामुळेसुद्धा आगबोटी नाहीशा होत असतील अशीही शक्यता या पुस्तकात दिली आहे. समुद्र शांत असताना कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय अशी एखादी लाट येते व परत समुद्र एकदम शांत होतो !

कधी कधी समुद्रावरचा प्रवाह एके ठिकाणी वाहात असतो व त्याच वाहत्या प्रवाहाखाली दुसरा प्रवाह विरुद्ध दिशेने वाहात असतो. या दोन प्रवाहांची उष्णतासुद्धा वेगवेगळी असू शकते. यामुळे प्रचंड लोहचुंबकत्व असलेले भोवरे निर्माण होतात. लोहचुंबकत्वामुळे विमाने व आगबोटयावरील रेडिओचे दळणवळण तुटते. लेखक तर असे म्हणतो की, कदाचित या कारणामुळे तेथील गुरुत्वाकर्षणावरही परिणाम होतो व त्यामुळे या आगबोटी व विमाने आकाशात फेकल्या जातात !

UFOs ( Unidentified Flying Objects ) हे बर्मुडा त्रिकोणाच्या भागात जास्त प्रमाणात दिसतात. काही लोकांच्या मते UFOs म्हणजे काही लोकांना झालेला निव्वळ भास. काही मानसशास्त्रज्ञ असे म्हणतात की, मानवाची अवस्था अगदी बिकट झालेली आहे. त्यामुळे मनुष्याच्या सुप्त मनात कुणीतरी परग्रहावरचे त्राते (saviour wish) येऊन आपल्याला वाचवतील अशी उत्कट इच्छा दडलेली असते म्हणून लोकांना UFOs दिसल्याचा भास होतो.

आणखी एक संभाव्य कारण पुस्तकात दिले आहे तेही मोठे चमत्कारिक आहे. समुद्राच्या तळाच्या जमिनीत खड्डे व भुयारे असतात. या खड्डयाच्या खाली परत खोल प्रदेश असतो ! यांना blue holes असे म्हणतात. समुद्रात भरती-ओहोटी आली की या


### आमची काही वैशिष्टये

- पुस्तके वर्षानुवर्षे उत्तम टिकावीत व आकर्षक दिसावीत म्हणून आमच्या 'फिनिक्स' पद्धतीचे बाईंडिंग व प्लॅस्टिक कव्हर्स घालून देतो.
- वाचकांनी खुणेसाठी पुस्तकाची पाने दुमडू नयेत म्हणून पुस्तकात बुक–मार्कस् ठेवतो.
- पुस्तकाच्या पहिल्या पानावर निरनिराळ्या वृत्तपत्रांतील झटकन् वाचून लक्षात रहाण्यासारख्या व मनोवेधक बातम्या चिकटवतो.
- पुस्तकासंबंधीची दुर्मिळ माहिती, परीक्षणे, सिने–स्टोरीज्, फोटो पुस्तकात चिकटवले जातात त्यामुळे वाचकांना पुस्तकासंबंधी बोनस माहिती मिळते.
- जास्त मागणी असलेल्या पुस्तकांच्या ४।५ प्रती ठेवतो, त्यामुळे वाचकांना पुस्तके लवकर मिळतात.
- इतर वाचनालयांप्रमाणे पुस्तक किती दिवस ठेवावे अशी मुदत नसते.
- दीर्घ मुदतीच्या वर्गण्या भरून सभासद होता येते.
- वाचकांच्या माहितीसाठी नवीन आलेल्या पुस्तकांची यादी दर आठवडयाला निरनिराळ्या साप्ताहिकांतून छापली जाते.
- आपणास पाहिजे असलेली पुस्तके परगावीही पाठवितो. ( V. P. नाही. )
- नॉन–मेंबर्सकरिता डेली बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतात.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

खड्डयात एखाद्या नरसाळ्यातनं पसार झाल्या-सारखे पाणी गरगर भोवरा होऊन फिरते व पाण्याच्या पृष्ठभागावरच्या मध्यम व लहान बोटी तळाशी ओढल्या जातात! असले भोवरे बहामा भागात (म्हणजे बर्मुडा त्रिकोणात) पुष्कळ आहेत. पण सर्वांत प्रचंड भोवरा म्हणजे नॉर्वेच्या जवळचा. ह्या भोवऱ्याचे वर्णन एडगर अलान पो यांनी त्यांच्या एका गोष्टीत (A Descent into Maelstorm) केले आहे. ते वाचले तर अंगावर शहारे आल्याशिवाय रहाणार नाहीत. भयकथा लिहिण्यात पॉ सारखा लेखक दुसरा नसेल. काही काही blueholes इतके गुंतागुंतीचे आहेत, की, त्यात मासे उलटे पोहतात! म्हणजे त्यांना सुद्धा पाण्याचा पृष्ठभाग वर आहे की खाली आहे ते कळेनासे होते!

बर्मुडा त्रिकोणाचा सर्वांत रहस्यमय भाग म्हणजे सार्गासो समुद्र. या समुद्राला 'आग-बोटीची स्मशानभूमी' म्हणतात. कारण या समुद्राच्या तळात कित्येक बोटी रहस्यमय रीतीने बुडाल्या आहेत. गंमत अशी की, हा समुद्र अत्यंत शांत आहे. या समुद्रात सरगा-सम नावाची वनस्पती विपुल प्रमाणात होते. या वनस्पतीमुळेच त्याला सार्गासो समुद्र हे नाव पडले. अॅटलांटीस नावाचा पूर्वी पृथ्वीवर एक खंड होता. हा खंड निसर्गसौंदर्याने संपन्न होता. त्यात विविध प्रकारची झाडे व वनस्पती विपुल प्रमाणात होत्या. पण तो अचानक समुद्रतळाशी खचला अशी एक आख्यायिका आहे. त्याला 'Lost continent of Atlantis' असे म्हणतात. हा खंड सार्गासो समुद्राखाली खचला असेल म्हणूनच त्यात विपुल प्रमाणात वनस्पती आहे असा एक दृष्टिकोन या पुस्तकात मांडला आहे. हा सार्गासो समुद्र म्हणजे उत्तर अटलांटिक महासागराचाच एक भाग आहे. तो वेस्ट इंडिज व अझोर्सच्या मध्ये आहे.

सार्गासो समुद्राच्या तळाशी प्रत्येक युगा-तील जहाजे व बोटी आहेत. असा एक समज आहे की, पूर्वीच्या फिनिशियन्स व्यापाऱ्यांच्या बोटींना चांदीची नांगरे होती. व काही काही जहाजे तर सोन्याने गच्च भरलेली होती. ही सर्व जहाजे व आगबोटी त्यातील अवा-ढव्य खजिन्यासह सार्गासो समुद्राच्या तळाशी अक्षरशः तळ ठोकून बसल्या आहेत! कारण त्यांची जोपासना खलाश्यांचे सापळे सतत करीत असतात!

कधी कधी तर फक्त बोटीवरील खलाशी व प्रवासीच नाहीसे झालेले आढळले. म्हणजे बोटीतला माल व बोट एकदम सुरक्षित पण त्यातील माणसेच गायब! पुढे त्यांचा पत्ताही लागत नाही किंवा त्यांची प्रेतेही सापडत नाहीत!

समुद्रात जसे वेगवेगळ्या दिशेने वेगवेगळी उष्णता असलेले प्रवाह वाहत असतात तसेच प्रकार हवेतसुद्धा असतात. त्यामुळे वैमा-निकांना पण चमत्कारिक अनुभव येतो. वातावरण एकदम शांत असते. आकाशात तारे लुकलुकत असतात. चांदीच्या ताटा-सारखा चंद्र अवकाशात तरंगत असतो. आणि तेवढ्यातच विमान भिंतीवर आपटल्यासारखे होते. त्याला CAT (clear air turbule-nce) म्हणतात.

विमाने व बोटी नाहीसे होण्याचे आणखी एक संभाव्य कारण म्हणजे युद्धातले टॉर-पीडोज् व माईन्स. त्या कुठेतरी भरकटत जाऊन फुटतात. तरीपण बऱ्याच वेळा अप-घातातील कोणतेच अवशेष सापडत नाहीत. म्हणजे एकंदरीत लेखक हळूहळू प्रत्येक संभाव्य कारण eliminate करतो व उरते ते एकच मुख्य स्पष्टीकरण, ते म्हणजे पर-ग्रहावरचे लोक या आगबोटी व विमाने पळवत असतील!

कोणत्याही कादंबरीपेक्षा पुस्तक कमालीचे वाचनीय झाले आहे.

ह्याच लेखकाने लिहिलेल्या आणखी एका पुस्तकाची ("The Mystery of Atlan-tis") नवीन आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. ते मी नुकतेच माझ्या वाचनालयासाठी घेतले आहे. त्याचे परीक्षण पुढे केव्हा तरी देईन. बर्लिझचे तिसरे पुस्तक म्हणजे "Mysteries from forgotton Worlds." सहसा एकाच विषयावर (occult phenomena) लागोपाठ पुस्तके वाचायचा कंटाळा येतो. पण बर्लिझची तिन्ही पुस्तके लागोपाठ वाचली तरी कंटाळा येत नाही. म्हणे चार्लस बर्लिझला ३० भाषांचे ज्ञान आहे. या त्याच्या भाषेच्या ज्ञानामुळे त्याला जुने शिलालेख व जुनी हस्तलिखिते वगैरे समजण्यास बरीच मदत झाली.

—जे. एन्. पोंडा


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा.......

॥ मॅक्झिम गॉर्की ॥

। सुमती देवस्थळे ।

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ, पुणे ३०

मूल्य दहा रुपये

# सत्याग्रहाची सुरुवात : पृष्ठ १२ वरून

लागले. काही वेळ फोनिक्स फार्मवर तर काही वेळ जोहान्सबर्गला कोर्टात असा ते देऊ लागले.

दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांशी संपर्क ठेवण्यासाठी आणि त्यांना जागरूक ठेवून परिवर्तन घडविण्यासाठी १९०४ मध्ये गांधींनी 'इंडियन ओपिनिअन' हे साप्ताहिक सुरू केले. सर्वांना समजावे म्हणून ते इंग्लिश, हिंदी, गुजराती व तामीळ या भाषांतून ते छापले जाई. पहिल्या वर्षी गांधींनी पदरचे दोन हजार पौंड खर्च केले. दरबानला फार नुकसान होऊ लागले. म्हणून प्रेस फोनिक्स वसाहतीत हलविला. खर्च कमी करण्यासाठी हिंदी व तामीळ आवृत्त्या बंद केल्या.

'इंडिअन ओपिनिअन' ने द. आफ्रिकेत बरीच जागृती ठेवली. तत्त्व म्हणून जाहिराती घेणे बंद केले. वर्गणी थोडी वाढविली. तरी पण वर्गणीदारांची संख्या १२०० वरून ३५०० वर गेली. दर रविवारी तो प्रसारित होई. गटागटांत तो वाचला जाई. सरकारी अधिकारी गांधींच्या हालचाली कळण्यासाठी काळजीपूर्वक वाचीत. लौकरच आफ्रिकन आंदोलनाचे 'इंडियन ओपिनिअन' हे एक हत्यार बनले.

एप्रिल १९०६ मध्ये स्थानिक झुलू जमातीने ब्रिटिशांविरुद्ध बंड केले. ब्रिटिश लष्कराशी त्यांनी झुंज दिली. यावेळीही गांधींनी हिंदी सेवापथक करून रणांगणावर नेले. पण तेथील परिस्थिती पाहून त्यांचे डोळे उघडले. मुळात अन्यायकारक टॅक्सविरुद्ध हे बंड, हे आंदोलन होते. पण त्याचा बीमोड करताना ब्रिटिश लष्कराने अनन्वित अत्याचार केले. झुलूच्या वसाहती जाळल्या. स्त्री, पुरुष, मुले यांचा विचार न करता सर्वांनाच बेदम झोडपले. आफ्रिकेच्या या भूमिपुत्राशी ब्रिटिशांची वागणूक पाहून त्यांच्या शुश्रूषापथाने जखमी झुलूना उपचार केले आणि त्यांची सहानुभूती मिळविली.

झुलू लॅण्डमधील दऱ्याखोऱ्यांतून पायी फिरताना अनेक वर्षे गांधींच्या मनात अस्पष्टपणे घोळणारे दोन विचार साकार होऊन स्पष्ट झाले. 'ज्याला जीवनात सार्वत्रिक काम करावयाचे आहे त्याने ब्रह्मचर्य पाळावे आणि स्वेच्छेने साधे जीवन स्वीकारावे.' फोनिक्सला परत आल्यावर गांधींनी कस्तुरबाशी व इतर सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून हे निर्धार पक्के केले. १९०६ साली त्यांचे वय ३७ वर्षांचे होते.

२२ ऑगस्ट १९०६ रोजी ट्रान्सव्हाल सरकारने गॅझेटमध्ये नवा ऑर्डिनन्स जाहीर केला. आठ वर्षांवरील सर्व हिंदी, अरब, तुर्क व चिनी यांच्यावर नोंदणीची सक्ती करण्यात आली. हाताचे ठसे, शरीरावरील खुणा सर्टिफिकेटावर घ्यावयाचे होते. पोलिसांना घरात शिरून सर्टिफिकेटसची तपासणी करण्याचा अधिकार दिला होता. कुणी हा कायदा मोडला तर शंभर पौंड दंड आणि तीन महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा ठेवली होती. ४ सप्टेंबरला विधानमंडळात ऑर्डिनन्सचे विधेयक मांडायात आले.

'इंडियन ओपिनियनने' ऑर्डिनन्सचा गुजराती अनुवाद छापला. लेख लिहून लोकांना जागृत केले. जोहान्सबर्गला ३००० प्रतिनिधींची जाहीर सभा झाली. वसाहतीच्या सेक्रेटरीला शिष्टमंडळ भेटले. जोहान्सबर्गच्या सभेत गांधी म्हणाले,

'काही टीकाकारांना आमच्या योजनेत दोष दिसतो. एका बाजूने आम्ही अर्ज विनंत्या करतो, आणि दुसरीकडे कायदेभंगाची धमकी देतो. पण ही धमकी नाही. खंडीभर लिखाण करणे-भाषण करणे. यापेक्षा शेरभर कृती करण्यास माणसाने तयार असावे म्हणून हे आवाहन आहे. प्रत्येक शब्द आम्ही तोलून मोलून वापरलेला आहे. कडक शब्द माहीत असते तर ते वापरण्यास कमी केले नसते. आशियाई नागरिकांविरुद्ध केलेल्या सर्व कायद्यांचा मी अभ्यास केला आहे. पण एवढा काळाकुट्ट कायदा माझ्या पाहण्यात आला नाही. माझी खात्री आहे की आम्ही योग्य दिशेने पाऊल उचलले आहे. आम्ही राष्ट्रनिष्ठ आहोत. मी माझ्या देशबांधवांना ओळखतो. वेळ येईल तेव्हा सर्वजण निर्भयपणे पुढे येतील. आता आम्हाला एकच रस्ता मोकळा आहे. स्वाभिमानाने मरू पण जुलमी कायद्यासमोर वाकणार नाही. आणि एखादवेळी बाकीचे हटले तरी मी हटणार नाही. जी शपथ मी घेतली आहे ती मी मोडणार नाही. शेवटपर्यंत तिचे पालन करीन.'

सर्वत्र सभा होऊ लागल्या. शांततामय प्रतिकाराच्या या नव्या आंदोलनाला काय नाव द्यावे हे कुणाला सुचेना. 'इंडिअन ओपिनिअन' मधून तशी जाहिरात देण्यात आली. 'प्रॅसिव्ह रेझिस्टन्स' ला पर्यायी देशी शब्द शोधण्याची धडपड सुरू झाली. मगनलाल गांधीने ( मो. क. गांधीचा पुतण्या ) 'सदाग्रह' हा शब्द सुचविला. त्यावरून गांधीजींनी 'सत्याग्रह' हा शब्द कायम केला.

शिष्टमंडळाच्या भेटीनंतर विधान मंडळाने कायद्यात थोडी दुरुस्ती करून स्त्रियांना वगळण्यात आले. पण बाकी सर्व कायदा जसाच्या तसा राहिला. नागरिकांनी अखेरपर्यंत प्रयत्न करावयाचे ठरविले मि. अली व गांधी यांच्या शिष्टमंडळाने लंडनला जाऊन राजे सरकारला भेटावे असे ठरले.

२० ऑक्टोबर १९०६ ला गांधी व अली लंडनला पोहोचले. लॉर्ड एल्गिन, सेक्रेटरी ऑफ स्टेटस फॉर कॉलोनीज यांना भेटले. गांधींनी दादाभाई नौरोजींची मदत घेतली. नंतर ते मि. मोर्ले, सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया, यांना भेटले 'हिंदी नागरिकांना ब्रिटिश वसाहतीत समान हक्क मिळवून द्या' अशी मागणी त्यांनी केली. नंतर ते पंतप्रधान सर हेनरी कॅबेल बॅनरमनना भेटले. सहा आठवड्यात त्यांनी हाऊस ऑफ कॉमन्सच्या शंभर सभासदांच्या भेटी घेतल्या. लंडन मधल्या युरोपिअन मित्रांनी आणि हिंदी विद्यार्थ्यांनी त्यांना बरीच मदत केली. 'टाइम्स' 'डेली न्यूज' 'ट्रिब्यून 'मॉर्निंग लीडर' 'साऊथ आफ्रिका' या वृत्तपत्रांनी त्यांना साथ दिली. नंतर गांधी डिसेंबरमध्ये परतले.

बोटीवर त्यांना 'ट्रान्सव्हाल एशियाटिक ऑर्डिनन्सला राजेसरकार अधिक विचारविनिमय केल्याशिवाय मान्यता देण्याचे थांबवू शकत नाहीत' अशी लॉर्ड एल्गिनची घोषणा समजली.

याच वर्षी (१९०६) बंगालची फाळणी केल्यामुळे हिंदुस्तान मध्येही प्रक्षोभ माजला होता. कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनात दादाभाई नौरोजी अध्यक्ष होते. त्यांनी 'स्वराज्य' या राजकीय उद्दिष्टाची घोषणा केली. 'वंदे मातरम' अधिवेशनात प्रथमच म्हटले गेले.

१ जानेवारी १९०७ ला ट्रान्सव्हाल व ऑरेंज कॉलनींना वसाहतीचे राज्य मिळाले. त्यांच्या विधानमंडळांनी २१ मार्च १९०७ च्या एका बैठकीत सर्व काळे कायदे पुन्हा मजूर केले. ३१ जुलै

१९०७ पर्यंत आशियाई लोकांनी सक्तीने नावे नोंदवून ओळखपत्रे घ्यावीत असे जाहीर करण्यात आले.

१ जुलै १९०७ ला नावेनोंदणीसाठी सर्वत्र कचेऱ्या उघडण्यात आल्या. 'इंडिअन ओपिनियनने' पुन्हा प्रचार आघाडी सुरू केली. सभा घरोघर प्रचार सुरू झाला.

३१ जुलैला प्रिटोरियाला आशियाई लोकांची जाहीर सभा झाली. ट्रान्सव्हालमधील १३००० नागरिकांचे २००० प्रतिनिधी या सभेस हजर होते. ट्रान्सव्हाल सरकारचे पंतप्रधान जनरल बोथा यांचे प्रतिनिधी मि. विल्यम हॉस्केन सभेत हजर होते. तेही बोलले. ते म्हणाले . .

'हिंदी नागरिकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण शेवटी हा कायदा होऊन राजाने त्याला मान्यताही दिली. आता या नागरिकांनी राजाचा मान राखून, शांतता राखण्यासाठी या कायद्याचे पालन करावे–त्यात सर्वांचे हित आहे. अध्यक्ष जनरल स्मट्स् हे नियम करताना आपल्या निवेदनांचा अजूनही जरूर तो विचार करतील. ट्रान्सव्हाल सरकार भक्कम आहे. कुणी कायद्याचा भंग केला तर ते भिंतीवर डोके आपटण्यासारखे होईल याची सर्वांनी दखल घ्यावी'

गांधींनी त्यांना उत्तर दिले–

'या काळ्या कायद्याचे पालन केल्याने पुढे याहूनही जाचक कायदे होणार नाहीत याची काय खात्री? उद्या वर्णभेदाचे कायदे होतील तर नंतर परागंदा करण्याचे कायदे होतील. तेव्हा आताच निर्धाराने विरोध करावयास हवा.'

सभेचे हे वृत्त समजल्यावर जनरल स्मट्स्ने उद्गार काढले

'हिंदी लोकांच्या प्रतिकारांतून जर वाईट परिस्थिती निर्माण झाली तर त्याची सर्व जबाबदारी त्यांची व त्यांच्या नेत्यांची राहील. जे नावे नोंदविणार नाहीत त्यांना या देशात राहता येणार नाही. व्यापार करू दिला जाणार नाही. हा देश गोऱ्या लोकांचा रहाणार आहे. *त्या उद्दीष्टासाठी सर्व काही प्रयत्न आम्ही करणार आहोत.* जे पाऊल पुढे टाकले ते कधीही मागे घेतले जाणार नाही.'

गोऱ्या शासनाने वेळोवेळी नोंदणीची मुदत वाढवीत ती ३० नोव्हेंबर १९०७ पर्यंत नेली. परंतु १३००० नागरिकांपैकी अवघ्या ५११ जणांनी नावे नोंदविली.

२६ डिसेंबर १९०७ ला प्रवेशबंदीचा कायदा होऊन त्याला राजाची मान्यता मिळाली. दुसऱ्या दिवशी जाहीर सभा झाली. तीत गांधी म्हणाले–

'सकाळी नवा ऑर्डिनन्स वाचला आणि वाटले की लॉर्ड एल्गिननी हिंदी लोकांच्या राज्यनिष्ठेमध्ये भलतेच तणाव निर्माण केले आहेत. एकावेळी ते हिंदुस्तानचे व्हॉइसरॉय होते. आपण कोट्यावधि हिंदी लोकांचे विश्वस्त आहोत हे ते आज विसरले आहेत. एका अज्ञात मार्गाने हिंदुस्तान आज वेगळा जाऊ मागत आहे. हिंसेचा कुठे कुठे तुरळक वापरही होत आहे. पण यांची बीजे लॉर्ड एल्गिननी रोवली आहेत. असेच मी म्हणेन. आज विद्यार्थीच नव्हेत तर अशिक्षित व्यापारीही या कायद्याने नाराज झाले आहेत. *या असंतोषाचा* जनक मी आहे. याची मला जाणीव आहे. आमचे विचार एक आहेत. आमची कृती एक आहे. हा एक जंगली कायदा आहे. स्वतःला सुसंस्कृत म्हणविणाऱ्या सरकारचा हिंस्त्र कायदा आहे. उद्या जर जीझस ख्राइस्ट जोहान्सबर्गला आला तर त्यालाही ख्रिस्ति धर्माला न शोभणाऱ्या अनेक गोष्टी या काळ्या कायद्यात आढळतील.'

गांधी स्वतःशी विचार करीत होते.

'मला उद्या शासन झाले तर ठीक आहे. पण गरिबांच्या घरची कर्ती माणसे जेलमध्ये टाकली तर त्यांच्या परिवारांचे काय होईल? कायद्यात तर तशी काही व्यवस्था नाही. मग सरकारच्या मनात तरी काय आहे? या अन्यायकारक कायद्याखाली हजारो माणसांना जेलमध्ये टाकले किंवा हद्दपार केले तर तो त्यांच्या स्वाभिमानाचा सन्मान ठरेल. चार दुगाण्या मिळविण्यासाठी पुरुषत्व गमावण्यापेक्षा स्वाभिमानाने जगणे हेच श्रेयस्कर.'

'आता वेगळे होण्याची वेळ आली आहे. साम्राज्यशाही सरकारला हिंदुस्थान हे प्रेमाने जवळ ठेवायचे की शस्त्रास्त्रांनी? हे ठरवायची वेळ आली आहे. हिंदुस्तान की वसाहती? हे आता त्यांनी ठरवायचे आहे. आणि लॉर्ड एल्गिनने सध्यापुरते तरी ठरविलेले दिसते.'

## वाटाघाटी

२८–१२–१९०७ रोजी गांधींवर परवान्याशिवाय ट्रान्सव्हालमध्ये आल्याबद्दल खटला भरण्यात आला. जिथे वकील म्हणून काम केले तिथे आरोपी म्हणून उभे राहताना क्षणभर त्यांना संकोच वाटला. 'राजकीय गुन्हेगाराची कोर्टातील भूमिका वकिलापेक्षा फार उच्च दर्जाची आहे,' या विचाराने ते शांत झाले. ४८ तासांत ट्रान्सव्हाल सोडून जाण्याची शिक्षा त्यांना दिली.

ही कोर्टाची *आज्ञा मोडली म्हणून* १०–१–१९०८ ला गांधींना दोन महिन्यांची साधी कैद अशी शिक्षा दिली.

गांधींना नेल्यावर लोकांनी काळे झेंडे लावून मिरवणुका काढल्या. पोलिसांनी मारहाण केली. १४ जानेवारीला चिनी असोसिएशनचे अध्यक्ष मि. क्वीन व थंबी नायडू यांनी सत्याग्रह केला. २९ जानेवारीपर्यंत १५५ लोकांनी शिक्षा स्वीकारली. त्यात कामगार होते. फेरीवाले होते. इतरही होते. इतर ठिकाणीही सत्याग्रह सुरू झाले.

सत्याग्रहींना निग्रोंच्या जेलमध्ये ठेवले. जागा अपुरी पडली म्हणून जेलच्या आवारात तंबू ठोकले. गांधीजींनी सर्वांसाठी कैद्यांचे कपडे मागून घेतले. जेलच्या नियमांचे काटेकोर पालन केले. एवढे की बाहेर आल्यावर त्यांनी चहा सोडला आणि संध्याकाळचे जेवण सूर्यास्तपूर्वी घेण्यास सुरुवात केली.

या सत्याग्रहाचे पडसाद जगभर उमटले. शेवटी ३० जानेवारीला जनरल स्मट्स्ने गांधीजींना जेलमधून आपल्या घरी आणून वाटाघाटी सुरू केल्या. जनरल स्मट्स् काहीही सोडण्यास तयार नव्हता. पण शेवटी लंडनच्या दबावामुळे रजिस्ट्रेशन सक्तीचे न करता स्वेच्छेने असावे इथपर्यंत तो कबूल झाला. आपल्या सहकाऱ्यांनी अधिकार दिले असल्यामुळे गांधींनी ते मान्य केले.

त्याच मध्यरात्री जोहान्सबर्ग येथील मशिदीच्या आवारात गांधीजींनी जाहीर सभा घेतली. सर्व वृत्तान्त सांगितला. ते म्हणाले–

'या तडजोडीमुळे आपली जबाबदारी आता वाढली आहे. आपण स्वेच्छेने नावे नोंदवू या. यानंतर कुणीही चोरून प्रवेश करू नये.'

त्यावर एका पठाणाने आक्षेप घेतला.

'गुन्हेगाराप्रमाणे ठसे द्यायचे नाहीत असे कालपर्यंत आपण सांगत होता आणि आज मुकाट्याने ठसे द्यावयास सांगता?'

'होय, कायद्याच्या जबरदस्तीखाली ठसे दिले असते तर ते जरूर पाप ठरले असते. पण आता आपण स्वेच्छेने देणार आहोत. आपण मला जबरदस्तीने नमस्कार करायला लावू शकता आणि प्रेमानेही. तोच फरक इथे आहे' गांधी. त्यावर पठाण रागावला.

'तुम्हाला जनरल स्मट्स्ने १५००० पौंड देऊन खरीदले आहे.

अल्लाची कसम खाऊन सांगतो, मी स्वतः ठसे देणार नाही. आणि जो देईल त्याला ठार मारल्यावाचून राहणार नाही.'

'ज्यांना ठसे द्यावयाचे नसतील त्यांनी जरूर देऊ नयेत. मी त्यांच्यासाठीही जरूर खटपट करेन. परंतु कृपया त्यांनी अल्लाच्या नावाने खुनाच्या धमक्या मात्र देऊ नयेत. रोगाने मरण्याऐवजी मित्राच्या हाताने मरणे मी पसंत करेन. आणि अशा स्थितीतही मी त्या मित्रावर रागावणार नाही. कारण माझ्या पारमार्थिक जीवनावर ते उलटेल. तसेच कधी तरी माझ्या निष्पापपणाची जाणीव त्या मित्राला झाल्यावाचून राहणार नाही. आता या तडजोडीला जबाबदार म्हणून मी स्वतः ठसे देणार आहे.'

दुसऱ्या दिवशी सत्याग्रह कचेरीत मंडळी जमली असताना मीर आलम व सात पठाण तिथे आले. 'आपण काय करणार आहात?' त्यांनी गांधींना विचारले.

'मी दाही बोटांचे ठसे देऊन सर्टिफिकेट्स घेणार आहे. तुम्ही आलात तर केवळ अंगठ्याचा एक ठसा देऊन तुम्हाला सर्टिफिकेट्स देववीन.' गांधींचे हे उत्तर ऐकून मीर आलम याने त्यांच्या पाठीत दंडा मारला. ते खाली पडले. दगडावर तोंड आपटून एक दात पडला. कपाळावर खोक पडली. मीर आलमने दंड्याने आणखी प्रहार केले आणि लाथा मारून तो व त्याचे साथीदार पळून गेले पण लोकांनी त्यांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. बेशुद्धावस्थेत गांधींना रेव्हरंड डॉक यांचे घरी नेले. शुद्धीवर आल्यावर प्रथम त्यांनी फॉर्म भरून दिला. या वेळीही त्यांनी मीर आलम आणि इतर पठाणांवर खटले भरण्यास नकार दिला. पण सरकार स्वस्थ बसले नाही. त्यांनी पोलिसामार्फत खटले भरले व पठाणांना तीन महिन्यांची शिक्षा झाली. थोडे दिवस विश्रांती घेऊन गांधींनी पुन्हा कामास सुरुवात केली. 'इंडियन ओपिनिअन' मधून त्यांनी तडजोडीची सर्वांना माहिती दिली. ९ मे ला ८००० अर्ज नोंदविले गेले, पैकी त्या दिवशी ६००० मंजूरही झाले.

'प्रिटोरिया न्यूज'ने करार पाळला म्हणून हिंदी लोकांचे अभिनंदन केले. उलट गांधींनी 'सरकारने आता करार पाळावा. जुने कायदे बदलून सन्मानाने राहता येईल,' असे कायदे करण्याची मागणी केली.

परंतु जनरल स्मट्सने हे सर्व अमान्य केले.

'मी गांधींना, ३० जानेवारीस किंवा ३ फेब्रुवारी १९०८ रोजी कायदा क्रमांक २/१९०७ रद्द करण्याचे किंवा इतर कोणतेही आश्वासन दिलेले नव्हते.' असे त्याने जाहीर केले. गांधींनी मूळ मसुदा जाहीर करण्याचे आव्हान दिले. ते मात्र त्याने स्वीकारले नाही. उलट त्याने नवे कायदे करून स्वेच्छेने दिलेले अर्ज सक्तीचे ठरविले आणि प्रवेशबंदीचे नवे कडक कायदे केले.

सोराबजी शापुरजी या पार्शी गृहस्थाने ८-७-१९०८ ला सत्याग्रह केला. 'जर हे कायदे रद्द करून तडजोडीच्या आधाराने नवीन कायदे केले नाहीत तर घेतलेल्या सर्टिफिकेटांची होळी करू.' अशी जाहीर ग्वाही गांधींनी दिली.

१६ ऑगस्टला जोहान्सबर्ग एका जाहीर सभेत २००० सर्टिफिकेटांची होळी केली. मीर आलम पठाणाने गांधींची माफी मागितली आणि स्वतःचे सर्टिफिकेट त्याने गांधींच्या हवाली केले. ती होळी पाहून एका वृत्तपत्राने जनरल स्मट्सला अमेरिकेतील बोस्टन टी पार्टीची आठवण करून दिली.

वाढते आंदोलन पाहून जनरल स्मट्सने १८ ऑगस्टला पुन्हा गांधींबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. पण त्या फिसकटल्या आणि १३ ऑगस्टला पुन्हा सर्वत्र सर्टिफिकेटसच्या होळ्या पेटल्या. शे. दाऊद महमद व पार्शी रुस्तुमजी यांनी सत्याग्रह केले. नंतर शेकडोंनी सत्याग्रह करण्यात भाग घेतला. १५ ऑक्टोबरला गांधी व बरोबरच्या पंधराजणांना दोन महिन्यांची सजा झाली. त्यांना खोदाईचे आणि सफाईचे काम देण्यात आले.

१६ ऑक्टोबरला लंडनमध्ये निषेध सभा झाली. सर भवानगिरी लाला लाजपतराय, सावरकर, खापर्डे, बिपीनचंद्र पाल, आनंदकुमार स्वामी यांनी सभेत भाग घेतला.

२७ ऑक्टोबरला गांधींना कैद्याच्या कपड्यात हातकड्या घालून पोलिसांच्या पहाऱ्यात व्होल्करस्ट जेलमधून जोहान्सबर्ग जेलमध्ये नेले. स्टेशन ते जेल त्यांची पायी मिरवणूक काढली.

## पवित्र संघर्ष

त्या वेळी कस्तुरबा फार आजारी होत्या. गांधींनी त्यांना जेलमधून एक पत्र लिहिले. 'वेस्टनी केलेल्या तारेने तुझ्या आजाराचे गंभीर स्वरूप समजले. माझे हृदय दुभंगत आहे. पण तुझी सेवा करावयास मी येऊ शकत नाही. सत्याग्रहाच्या संबंधी संघर्षात मी सर्व काही दिले आहे. दंड भरूनच मी बाहेर येऊ शकतो. पण ते मला जमणार नाही. पण तू खचू नकोस. आहार नियमित घे. बरी होशील दुर्दैवाने तू मला सोडून गेलीस तरी मी तितके वाईट मानणार नाही. तुझ्या पश्चात मी पुनर्विवाह करणार नाही असे आश्वासन मी पूर्वीच तुला दिले आहे तू एवढे प्रेम मला दिले आहेस की तुझ्यानंतर ते मला शेवटपर्यंत साथ देईल. निर्वाण व्हावयाचेच असेल तर ईश्वराचे नाव घेत ते व्हावे. हा मृत्यूही सत्याग्रहाला पूरक होईल. माझा संघर्ष केवळ राजकीय नाही. त्याला आध्यात्मिक बाजू आहे. म्हणून तो पवित्र आहे. सत्याग्रहाच्या अवस्थेत जगणे आणि मरणे यात विशेष फरक राहात नाही, हे सर्व तू लक्षात ठेवशील याबद्दल माझी खात्री आहे. तुझ्याकडून तेवढी अपेक्षा आहे. शिक्षा पुरी होऊन सुटका झाल्याबरोबर गांधी त्वरित कस्तुराबाच्या सेवेसाठी दरबानला गेले. तेथून त्यांनी तिला फोनिक्सला नेले.

२५ फेब्रुवारी १९०९ रोजी जवळ सर्टिफिकेट नसल्यामुळे गांधींना तीन महिने सजा व ५० पौंड दंड झाला.

२४ मे १९०९ ला प्रिटोरिया जेलमधून सुटल्यावर गांधींनी जाहीर केले, 'मी इश्वराची प्रार्थना करतो की, आम्ही थोडे असो की मोठ्या संख्येने असो, उद्दिष्ट साध्य होईपर्यंत ही जबाबदारी पेलण्याची शक्ती आम्हाला दे' पकडणे, शिक्षा करणे, हद्दपार करणे हे आता रोजचे खेळ झाले आहेत.

सत्याग्रह करून जेलमध्ये जाण्याबद्दल गांधींनी बरेच लिहिले—

'एक विचार असा की दंड भरून सुटण्याऐवजी जेलमध्ये जाऊन यातना का सोसाव्यात? अशा विचारांनी मनुष्य भ्याड बनतो. जेलच्या भीतीने देशाला उपयुक्त होईल अशी काही सेवाही तो करू शकत नाही.'

'दुसरा विचार असा आहे की, देश आणि धर्म यांच्यासाठी तुरुंगात जाण्यासारखे दुसरे भाग्य नाही. दैनिक जीवनातील ओढाताण, कटकटी तिथे पाठीशी लागत नाहीत. बाहेर अनेकांचे ऐकावे लागते तर इथे फक्त एका वॉर्डरचे ऐकावे लागते. रोज कमाई मिळवून आणणे आणि अन्न शिजविणे ही जबाबदारी तिथे नसते. पुरेसे श्रम करण्याइतके तिथे काम असते. व्यसनापासून अलिप्त राहाता येते. तिथे राहाणाऱ्याचा आत्मा मुक्त असतो त्याच्या शरीरावर बंधने असतात. पण मन मुक्त असते. सवयीचे नियमन करून तिथे शरीराचे

संवर्धन करता येते. इथे मला मोकळे असल्यासारखे वाटते. वॉर्डर जर वाईट असला तर सोसण्याची आणि संयमाने वागण्याची सवय लागते. जे असे मानतात त्यांना जेल हा ईश्वरी प्रसाद ठरतो. कारागृहवास हा दैवी प्रसाद की दुसरे काही आहे, हे ज्याच्या त्याच्या मानसिक घडणीवर अवलंबून राहाते. माझा हा अनुभव आहे की, जेलयात्रा हा जीवनातला एक अत्यानंद आहे. तिथे जो एकाकीपणा आणि त्रास सोसावा लागतो हा शेवटी देशाच्या आणि धर्माच्या उन्नतीसाठी कारणी लागतो.

अशाच तऱ्हेचे उद्गार १८४९ साली अमेरिकेतील एका जेलमध्ये प्रसिद्ध तत्त्वज्ञ व कवी थोरो याने काढले होते.

हा सत्याग्रह सर्वव्यापी ठरला. ट्रान्सव्हालच्या जेलमध्ये २००० सत्याग्रही गेले. लोकसंख्येच्या १/३ भागाने सत्याग्रह केला, अमीरासून रंकापर्यंत सर्वजण सहभागी झाले. सरकारही थकले. जनरल स्मट्स् आणि जनरल बोथा विचारविनिमयासाठी लंडनला गेले.

१० जुलै १९०९ ला गांधी व शेठ हाजी हबीबही शिष्टमंडळ म्हणून लंडनला पोहोचले. पण त्यांची निराशा झाली. पार्लमेंटच्या अनेक सदस्यांना भेटून काही उपयोग झाला नाही. गांधी निराशेने म्हणाले, 'जेवढा मी अधिक लोकांना भेटतो तेवढा त्यांच्या मोठेपणातील फोलपणा तीव्रतेने जाणवतो. प्रत्येकजण आपापल्या विचारात आणि तंद्रीत गुरफटलेला असतो. जे सत्तेवर आहेत त्यांना न्याय-अन्यायाची चीड नाही. स्वतःचे स्थान वर नेण्यात ते गर्क असतात. जर हा साध्यासुध्या न्यायाचाच प्रश्न आहे, असता तर कधीच सुटला असता. एक दोन माणसामागे दिवस घालवणे, पैसे खर्च करणे हे सत्याग्रह तत्त्वाच्या विरुद्ध आहे. त्यापेक्षा सरळ जेलमध्ये जाऊन सोसणे अधिक बरे. जर कधी आमच्या मागण्या मान्य झाल्या तर त्या शिष्टमंडळे नेल्यामुळे नव्हेत तर सत्याग्रह करून, आत्मक्लेश सोसण्याने असे म्हणावे लागेल आणि जर आम्हाला अपयश आले तर त्याचा अर्थ एवढाच की, आम्ही पुरेसे सोसले नाही.'

जनरल स्मट्स् व जनरल बोथा यांच्या वतीने लॉर्ड अॅम्टहील यांनी गांधींना निर्णय कळविला.

'केलेले कायदे रद्द होणार नाहीत. वर्णभेद काढले जाणार नाहीत. किरकोळ फेरफार होऊ शकतील. यापुढे आंदोलन केलेत तर जबाबदारी तुमची राहील.'

शेठ हाजी हबीब यांनी स्वतःचे मत व्यक्त केले 'आमची जमात मोठी आहे. सारी मिळकत त्यांची आहे. त्यांनी आतापर्यंत बरेच नुकसान सोसले, पण यापुढे सोसता येणार नाही.'

गांधींनी सांगितले—

'ज्यांचे शेठ हाजी हबीब प्रतिनिधी आहेत त्यांच्या बाबतीत ते म्हणताहेत ते खरे आहे. पण मी ज्यांचे प्रतिनिधित्व करतो आहे ते सर्व गरीब आणि दुबळे आहेत, पण त्यांचा निर्धार भक्कम आहे. ते गैरसोयी व तत्त्व यासाठी लढत आहेत. जनरल बोथाच्या शक्तीची आम्हाला कल्पना आहे. पण त्यापेक्षा घेतलेल्या शपथेवर आमचा अधिक विश्वास आहे. वाईटांत वाईट होईल ते सोसायची आमची तयारी आहे. आमची श्रद्धा आहे की, शेवटी ईश्वर आम्हाला यश देईल.'

लंडनमध्ये हिंदी क्रांतिकारकांच्या व गांधींच्या भेटी झाल्या. अहिंसा सोडण्यासाठी त्यांनी गांधींना गळ घातली. मदनलाल धिंग्राच्या पराक्रमामुळे लंडन त्यावेळी गाजत होते. त्याच्या शौर्याने गांधी भारावले होते. त्यांनी त्याचे कौतुकही केले. परंतु क्रांतिकारकांच्या कर्तृत्वाची मर्यादाही त्यांनी दाखविली.

'धिंग्रासारख्या धाडसी कृत्यांनी त्यांनी हिंदुस्थानचे भले होईल असे कुणास वाटत असेल तर ते चुकीचे होईल. धिंग्रा हे देशाभिमानी खरे. पण त्यांचे प्रेम आंधळे आहे, होते. त्यांनी बलिदान केले, पण ते चुकीच्या मार्गाने झाले. त्यातून देशाचे नुकसान होईल.'

## टॉलस्टॉय फार्म

द. आफ्रिकेतील सत्याग्रहाला हिंदुस्थानने बरीच मदत केली. काँग्रेसने वेळोवेळी देशभर प्रचार केला. निधी गोळा करून दिला.

परंतु सत्याग्रहात भाग घेणारे शेकडो गरीब मजूर आणि त्यांचे परिवार यांच्या चरितार्थाची फार बिकट समस्या गांधींच्या पुढे होती. कामे मिळत नव्हती. देणग्यांवर त्यांचे प्रश्न सुटणार नव्हते. शेवटी गांधींचे एक जर्मन मित्र मि. हरमान कॅलेनबाग यांनी आपली ११०० एकरांची शेती गांधींच्या हवाली केली. दोघांनी तिला 'टॉलस्टॉय फार्म' असे नाव दिले. तिथे अनेक गरीब मजुरांनी वसाहत केली. गुजराथ, तामिळनाडू, आंध्र, उत्तर प्रदेश येथील श्रमिक मंडळी होती. अशा रीतीने सत्याग्रहातील एक अडचण तात्पुरती दूर झाली. सत्याग्रहींच्या शिक्षणाचीही सोय झाली.

१९१० मध्ये नामदार गोखल्यांनी इंपिरिअल कौन्सिलमध्ये मजुरी करारपद्धत बंद करण्याची प्रभावीपणे मागणी केली. हिंदुस्थान सरकारने लंडनमध्ये बरेच दडपण आणले. परिणामी लंडनच्या इंपिरिअल गव्हर्नमेंटने आफ्रिकन युनिअनला कायदा क्रमांक २/१९०७ रद्द करण्यास सुचविले. वर्णभेदावर आधारलेले कायदेही रद्द करावेत असे कळविले. युनिअन सरकारने १५–२–१९११ ला एक विधेयक मांडून हे कायदे मागे घेतले.

राज्यारोहण समारंभ पार पडल्यावर आफ्रिकन युनिअनने पुन्हा प्रवेशबंदीचे विधेयक आणले. १९१२ मध्ये नामदार गोखले यांनी द. आफ्रिकेला भेट देऊन दौरा काढला.

१९१३ मध्ये प्रवेशबंदीच्या कायद्याच्या आधाराने एका विवाहित स्त्रीला आफ्रिकेत येण्याची बंदी करण्यात आली. तिथल्या सुप्रीम कोर्टाने ही बंदी केवळ योग्यच ठरवली नाही तर सदर कायद्याखाली विवाहच बेकायदेशीर ठरवला. ३० मार्चला जोहान्सबर्गमध्ये एका जाहीर सभेत गांधींनी हा प्रश्न हाती घेतला. 'आपल्या स्त्रियांचे संरक्षण करणे आणि त्यांचा सन्मान राखणे हे हिंदी नागरिकांचे पहिले कर्तव्य आहे. या संरक्षणासाठी आता त्यांनी सत्याग्रह करावयास हवा.' असे आवाहन त्यांनी केले.

एप्रिल १९१३ ला युनिअन गव्हर्नमेंटने नवे प्रवेशबंदीचे विधेयक मांडले. ते फारच जाचक होते. जूनमध्ये सदर विधेयक मंजूर झाले.

गांधींनी नागरिकांना अपील केले.

'आता आपण तिसऱ्या सत्याग्रहाची तयारी करीत आहोत. हा सत्याग्रह थोडा मोठा राहील. सत्याग्रह सर्वत्र केला जाईल. ट्रान्सव्हालमध्ये येण्याचे श्रम न घेता आपआपल्या गावी सत्याग्रह करावा. विनापरवाना माल विकून इज्जतीने सत्याग्रह करावा.

प्रवेशबंदीच्या कायद्याने विवाहभंग झाल्याचे कळताच कस्तुरबा अस्वस्थ झाल्या.

'आपण हिंदुस्थानात परत जाऊ या'—कस्तुरबा.

'आता जाणे हे भ्याडपणाचे ठरेल.'—गांधी.

'मग मी आता सत्याग्रह करते.'—कस्तुरबा.

'जरूर कर.'—गांधी.

फोनिक्स फार्मवरील पंधरा स्त्रिया व कस्तुरबा यांनी २२ सप्टेंबरला व्होल्कहर्स्टला सत्याग्रह केला. त्यांना तीन महिन्यांची सजा झाली. त्यानंतर टॉलस्टॉय फार्मवरील स्त्रियांनी सत्याग्रह केला.

बहुतेक तामीळ होत्या व त्यांच्याजवळ लहान लहान मुलेही होती. त्यांना पकडल्यावर ३००० खाणकामगारांनी १७ ऑक्टोबरला काम थांबवले. संप सर्वत्र पसरू लागला. कामगारांचे रेशन, पाणी तोडण्यात आले. गांधींनी त्यांना घरे सोडण्याचा सल्ला दिला. इथून तिथून माणसे जमत होती. त्यांची संख्या सहा हजारांवर गेली. बरीच टॉलस्टॉय फार्मवर गेली. आणि मग हा मोर्चा निघाला. त्याचे वर्णन सुरुवातीस आले आहे.

यावेळी गांधींना नऊ महिन्यांची शिक्षा झाली. पोलॉक व कॅलेनबाक यांना तीन तीन महिन्यांची शिक्षा झाली.

नामदार गोखल्यांनी पुन्हा इंपिरिअल कौन्सिलवर दबाव आणला. सेक्रेटरी ऑफ स्टेटसने हालचाल केली आणि मग या सार्वजनिक संपाची चौकशी करण्यासाठी युनिअनने जस्टिस सर सॉलोमन यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. समितीने हिंदुस्थान सरकारला पुरावा मांडण्यास तसेच गांधींची सुटका करण्याची शिफारस केली. १८ डिसेंबर १९१३ ला गांधींना सोडले. या चौकशी समितीवर कुणीही हिंदी मनुष्य नसल्यामुळे बहिष्कार घालण्याचे ठरले.

गरीब मजुरांवर केलेल्या गोळीबारामुळे गांधी फार दुःखी झाले. तीन पौंडांचा टॅक्स रद्द होईपर्यंत त्यांनी मजुरांचे कपडे (अर्धी लुंगी व सदरा) वापरणे, शिरस्त्राण न वापरणे, अनवाणी चालणे आणि एक वेळ जेवणे अशी शपथ घेतली. नव्या वर्षाच्या सुरुवातीस जर सरकारने हिंदी लोकांची न्याय्य गाऱ्हाणी दूर केली नाहीत तर पुन्हा सत्याग्रह, कारागृहवास आणि हद्दपारी स्वीकाराव्या लागतील असे त्यांनी जाहीर केले.

नव्या आंदोलनाची बातमी मिळताच नामदार गोखल्यांनी गांधींना सबूरीचा सल्ला दिला. गोखल्यांचे प्रतिनिधी अँड्र्युज व पिअर्सन गांधींना भेटले. गोखले आजारी होते. द. आफ्रिकेच्या लढ्यास त्यांनी सर्वतोपरी साहाय्य केले होते. त्यांच्या शब्दाचा मान ठेवून सत्याग्रह स्थगित करण्यात आला.

त्याच वेळी रेल्वेच्या युरोपिअन कामगारांनी संप केला आणि युनिअन सरकार अडचणीत आले. सत्याग्रह स्थगितीमुळे सरकारने सुस्कारा सोडला.

जनरल स्मट्सचा सेक्रेटरी गांधींना म्हणाला,

'तुमचे लोक, 'काळे लोक' आम्हाला अजीबात आवडत नाहीत. त्यांच्यासाठी काही करण्याची इच्छाही होत नाही. पण काय करणार ? मला सारखी इच्छा होते की, गोऱ्या रेल्वे कामगारांसारखे हिंसाचार तुम्ही करावेत म्हणजे मग तुम्हाला शासनाचा इंगा दाखविता आला असता.'

जनरल स्मट्सने गांधींना आश्वासन दिले की, सरकार तुमच्या मागण्या मान्य करणार आहे. मात्र समितीकडून तशा शिफारशी याव्यात.

समितीने तिच्या शिफारशी लवकर जाहीर केल्या. समितीशी असहकार केल्याबद्दल हिंदी नागरिकांना तिने ठपका दिला. संपात गोऱ्या सैनिकांनी अत्याचार केले हे अमान्य केले. मात्र तीन पौंडांचा टॅक्स रद्द करावा आणि काही किरकोळ शिफारशी तिने केल्या. युनियन सरकारने त्या शिफारशी स्वीकारल्या आणि २६ जून १९१४ ला इंडियन रिलीफ बिल ६० विरुद्ध २४ मतांनी मंजूर केले.

आणखीही जरूर ते फेरबदल करण्याचे आश्वासन जनरल स्मट्सने जाहीरपणे दिले. गांधींनीही जाहीरपणे प्रतिसाद दिला. ते म्हणाले,

'इंडिअन्स रिलिफ बिल मंजूर केल्यामुळे सप्टेंबर १९०६ रोजी सुरू झालेला सत्याग्रह आठ वर्षांनी संपुष्टात आला आहे. हिंदी नागरिकांना बरेच कष्ट आणि जबरदस्त आर्थिक नुकसान सोसावे लागले आणि सरकारला बराच मनःस्ताप सोसावा लागला.'

सत्याग्रह संपला खरा, पण त्यासाठी बरेच जीवही गेले. ७६ वर्षांचा हरभतसिंग तुरुंगातच मेला, तर १६ वर्षांची वलीअम्मा जेलमध्ये तापाने फणफणली आणि सुटून आल्यावर मेली. गांधींनी तिला विचारले,

'वलीअम्मा ! जेलमध्ये गेल्यावर पश्चात्ताप होत नाही ना ?'

'पश्चात्ताप ? मी आता पुन्हा जाईन सत्याग्रहात.'

'पण त्यात तू मेलीस तर ?'

'चालेल की. मातृभूमीसाठी नाही मरायचे तर कुणासाठी ?'

तिच्या स्मृतिप्रीत्यर्थ जोहान्सबर्गला 'वलीअम्मा हॉल' बांधण्यात आला. तेव्हा गांधी म्हणाले, 'वलीअम्माने आपल्या हाताने स्वतःचे सेवामंदिर बांधले. तिची तेजस्वी मूर्ती अनेकजणांच्या हृदयात कोरलेली आहे. जोपर्यंत हिंदुस्तान जिवंत आहे तोपर्यंत तिचे नाव दक्षिण आफ्रिकेत अजरामर राहील.'

१८ जुलै १९१४ ला हरमतसिंग, वलीअम्मा, नारायण स्वामी नागप्पा या वीरांचे स्मरण करून गांधी आणि कस्तुरबांनी दक्षिण आफ्रिकेचा किनारा कायम सोडला.

## जनरल स्मट्स, गिलबर्ट मरे

गांधींनी द. आफ्रिकेसाठी काय केले, हे १९३९साली, गांधीजींच्या ७० व्या वाढदिवशी जनरल स्मट्सने सांगितले. तो म्हणाला,

'ज्याच्याबद्दल मला अत्यादर होता त्या गांधींशी शत्रुत्व करण्याची आपत्ती माझ्यावर आली होती. त्यांनी हाती घेतलेल्या आंदोलनांनी काही वेळ माझी दमछाक झाली. उलट त्यांच्या योजनांप्रमाणे सर्व काही घडत गेले. कायदा व सुव्यवस्था यांची जबाबदारी माझी होती. आणि असे कायदे की, ज्यांना लोकमतांचा पाठिंबा नव्हता. आणि शेवटी ते नाक मुठीत धरून रद्द करावे लागले. त्यांच्या दृष्टीने ते महान यश होते. वैयक्तिक संबंध ठेवण्यात गांधी कमी नव्हते. जेलमध्ये त्यांनी स्वतः एक चप्पलजोड शिवला आणि शिवल्यावर मला भेट म्हणून पाठविला. एवढ्या थोर पुरुषाने तयार केलेल्या चपला वापरण्याची आपली लायकी नाही हे माहीत असतानाही मी तो जोड बऱ्याच उन्हाळ्यात वापरला.'

तसेच गिलबर्ट मरेने १९१४ साली हिबर्ट जनरल जर्नलमध्ये गांधीजींबद्दल लिहिले—

'ज्या माणसाला वैषयिक सौख्य, संपत्ती, आराम, बढती अगर स्तुती यांची गरज भासत नाही आणि योग्य वाटते तेच तो करतो, अशा माणसांशी व्यवहार करताना अधिकारपदावर असलेल्यांनी फार जपून व्यवहार करावेत. कारण तो फार जहाल आणि संत्रस्त ठेवणारा शत्रू असतो. त्याला शरीराने पकडता येईल, पण त्याचा आत्मा हाती लागणे अशक्य आहे.'

□

# एलकुंचवार - पालेकरांची 'पार्टी'

## एक खुली चर्चा

### १ : साहित्यिक कंपूतले काही अस्सल नमुने...

मृणालिनी रानडे

जुलूसनंतर दिग्दर्शित केलेली 'पार्टी' ही अमोल पालेकरांची दुसरी 'एकांकिका.' महेश एलकुंचवार यांनी लिहिलेल्या या नाटकाचा पुण्यातला पहिला प्रयोग १२ तारखेला 'बालगंधर्व 'मध्ये झाला.

या नाटकाची 'गोष्ट' सांगता यावी असे कथानक नाही. हे केवळ एका अनुभवाचे, एका प्रसंगाचे चित्रण आहे. हा अनुभव आहे एका पार्टीचा. पार्टीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या एका विशिष्ट वर्गातील लोकांचे व्यक्तिदर्शन लहानसहान कंगोऱ्यांसकट नाटककाराने घडविले आहे.

नाटकाला सुरुवात होते तेव्हा दमयंती काणे ही पार्टीची तयारी करत असते. तिचा एक लेखक मित्र दिवाकर बर्वे याला मिळालेल्या बक्षिसानिमित्त पार्टी ठरविलेली असते. साहजिकच पार्टीला येणारे सर्वजणच साहित्यिक-वर्तुळातले !

या नाटकाला कथा नाही, तशीच नायक-नायिकाही नाहीत. वेगळे विचार, वेगळी मतं असलेला हा साहित्यिक कंपू. त्याच्या सामूहिक जीवनाभोवती सर्व नाटक केंद्रित झाले आहे.

या सर्वांहून वेगळे व्यक्तिमत्त्व आहे ते सोनाचे. सोना, दमयंती काणेची मुलगी. तिला असल्या पार्टीचा, त्यातील कृत्रिम उपचारांचा मनस्वी तिटकारा. कौमार्यावस्थेत सुद्धा मातृत्वाचा भार उजळ माथ्याने पेलणारी नि अमृतच्या मृत्यूच्या वार्तेने पार उन्मळून गेलेली सोना ! तिचा उद्वेग वैताग नि दुःख नीरा आडकर यांनी कुठेही over-acting न करता (वाव असूनही) सहजपणे दाखवले आहे.

कम्युनिझमचा खरा अर्थ न कळता केवळ इतरांच्या सहवासासाठी येणारी वृंदा-लंब्याचवड्या गप्पा मारणारा, तारुण्याची रग असलेला, पण कृतीची वेळ येताच मागे हटणारा भारत-नाटकाकडे एक धंदा म्हणून पाहणारे, सतत 'कमर्शिअल' दृष्टिकोन ठेवणारे आगाशे, अशा व्यक्तिरेखांतून आजच्या लेखकांवर टीका नक्कीच केली आहे. पण टीकेपेक्षाही तटस्थ वृत्तीने केलेले त्यांचे चित्रण मला अधिक महत्त्वाचे वाटते.

अमृत हा एक कम्युनिस्ट कार्यकर्ता. खऱ्या अर्थाने कार्यकर्ता, दलित वर्गात मिसळून वगैरे काम करणारा. त्याचा नाटकात कुठेही प्रवेश नाही. त्याच्या मृत्यूच्या बातमीने धक्का बसल्यांपैकी 'जोगदंड' हा एक ! 'उद्याच्या हेडलाईनचा प्रश्न सुटला,' म्हणून आनंद होण्याऐवजी त्याला खरोखरच दुःख होते. एक जर्नॅलिस्ट असूनही हे विशेष.

पार्टीत विशेष रस नसलेले पण फक्त दमयंतीचे मित्र म्हणून उपस्थित राहिलेले डॉक्टर ! सोनाचे दुःख फक्त तेच केवळ समजू शकत होते. डॉक्टरांचे काम अनंत भावे यांनी केले आहे. त्यांना फारसे काम नाही. तरी त्यांचे सुरुवातीला हसणे वगैरे नाटकी वाटते.

मालविका ही स्त्री अशी आहे की, तिच्याशिवाय 'असली' पार्टी पूर्ण होणे अशक्यच. पार्टीची म्हणजे पिण्याची, नाचण्याची आवड असलेली, कोणाच्याही कोणत्याही वाक्यावर विनोद समजून खळखळून हसणारी, कोणत्याही मताचा, विचाराचा पुसटसा शिक्का नसलेली. 'कोरी करकरीत' मालविका साहित्यिकांच्या पार्टीला येते, enjoy करू शकते, यातच बरेच काही आहे.

तिच्या 'सूज्ञ' नवऱ्याचे काम अमोल पालेकर यांनी केले आहे. खरे तर झोपण्याखेरीज फारसा वाव या नाटकात त्यांना नाही.

या पार्टीचे प्रमुख पाहुणे बर्वे नि त्यांची पत्नी मोहिनी-आपल्या स्त्रीत्वाच्या भांडवलावर चांगला नवरा मिळविणारी नि उतरणीला लागलेल्या तारुण्याबरोबर तो गमवायला लागेल, या भीतीने ग्रासलेली मोहिनी, तिचा संशय, चालणं, बोलणं, घडोघडी दचकणं सुनीला प्रधान यांनी आपल्या अभिनयांतून समर्थपणे प्रकट केले आहे.

बर्वे हे एक थोर लेखक ! एका भावुक क्षणी त्यांच्या दृष्टीने बरेच बरं नसले तरी खरे बोलून जातात. शब्दांपलीकडे आपल्याला खरे काही मिळविता आले नाही याबद्दल वाटणारा खेद-कधी तरी का होईना पावसात भिजणाऱ्या भिकाऱ्यांकडे पाहून दाटून आलेली कणव-स्वतःच्या मर्यादेची मनाला पटलेली ओळख-तरीही कॉन्फरन्सला जाण्यासाठी आतुरलेले बर्वे. त्यांची भूमिका मधू भट यांनी केली आहे.

असे हे पार्टीतले होस्ट आणि गेस्ट्स् स्वतःच्या मोठेपणाबद्दल भ्रामक कल्पना उराशी बाळगून त्याच त्या वर्तुळात, चाकोरीत फिरत राहतात, राहणार आहेत. कोणतीही सुखदुःखाची घटना खऱ्या अर्थाने त्यांच्यावर परिणाम करू शकत नाही. स्वतःपलीकडे कोणतीच गोष्ट त्यांना दिसत नाही. केस विस्कटण्याच्या भीतीने ग्रासलेली मोहिनी काय नि 'मी रिपोर्टर नाही, जर्नॅलिस्ट आहे' असे सांगणारा जोगदंड काय, पुन्हा पुन्हा एकच गोष्ट सांगत राहतात.

अमोल पालेकरांच्या दिग्दर्शनाइतकेच या नाटकाचे नेपथ्यही उत्कृष्ट आहे. सोनाची खोली, त्याला लागून असलेली बैठकीची खोली-बाहेरचा व्हरांडा व झोपाळा; एवढाच मोजका पण उठावदार सेट आहे.

निरनिराळ्या भागांतील दृश्यं उभी करण्यासाठी light effects च्या भानगडीत न पडता केवळ मोठ्या होणाऱ्या आवाजाच्या

माध्यमातून होती परिणामकारकरीत्या उभी केली आहेत.

प्रत्यक्ष पार्टीला जाऊन असला अनुभव घेण्यापेक्षा अलिप्तपणे 'पार्टीला, उपस्थित राहण्याचा हा अनुभव निश्चितच अधिक परिणाम करतो. ¤

## संघर्षाची समस्या

सत्यजित रथ

नाटक प्रेक्षकांनी पाहायचे नसते, प्रेक्षकाने पाहायचे असते. तेव्हा प्रत्येक प्रेक्षकाचा नाटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन निराळा. एक प्रेक्षक या नात्याने या नाटकाविषयीच्या माझ्या मताशी माझ्या माहितीतले बहुसंख्य प्रेक्षक सहमत नाहीत. पण तरीही, नाटकाविषयी सम्यक विचार करताना प्रत्येक प्रेक्षकाच्या मताला सारखेच महत्त्व असावे, द्यावे.

मराठी प्रेक्षकाच्या नाटकाच्या लेखनापासून काही विशिष्ट अपेक्षा आहेत. नाटकात आपल्याला पात्रे लागतात, व्यक्तिमत्त्वे लागतात, त्यांना एकमेकांशी जोडणारे दुवे लागतात, या दुव्यांच्या बांधणीतून एक प्रश्न उभा राहावा लागतो, आणि या प्रश्नाचे नाटकापुरते उत्तर—म्हणजेच 'नाटकाचा शेवट' आपल्याला रंगभूमीवर पाहायचा असतो. वरीलपैकी अनेक गोष्टी या नाटकात नसल्यामुळे 'ते विस्कळीत आहे', 'ते पुढे जात नाही किंवा मागेही जात नाही,' या व अशा अनेक चुका काढता येतात, काढल्या गेल्या आहेत.

पण माझा दृष्टिकोन जरा निराळा आहे. या नाटकात एका संघर्षाचे स्वरूप उभे केले आहे. संघर्ष म्हटला, की दोन बाजू आल्याच. एक बाजू 'पार्टी' ज्याची आहे अशांची; दुसरी, पार्टी ज्यांची नाही, अशांची.

म्हणजे, पहिल्या बाजूला डोळे बांधून आपण निवडलेल्या एका विशिष्ट मार्गाने वाटचाल करणारे लोक. आपला मार्ग सोडला तर बाकी जीवनाचे त्यांना काही सोयरसुतक नाही. आपले काय चुकते, कोठे चुकते हे समजून देखील त्याबाबत शक्य असूनही काही न करणारे वृन्दा, बर्व्यासारखे लोक, आपल्या दांभिकपणाचाच गर्व असणारे आगाशे आणि आपले काही चुकते आहे; आपल्या दुनियेबाहेर एक वेगळी दुनिया आहे हे समजून न घेणारे दमयंती, मालविका, भारत यांच्यासारखे लोक, असे या एकाच प्रवृत्तीचे विविध पैलू या संघर्षात एका बाजूला आहेत. त्यांना एकत्र आणणारी गोष्ट म्हणजे जीवनाच्या शाश्वत मूल्यांशी त्यांनी केलेला द्रोह; ते एका मूलत: अप्रामाणिक अशा 'बुद्धिजीवी बहुजनसमाजा'त मोडतात.

दुसरी बाजू ही पहिल्या बाजूसारखी एकाच प्रवृत्तीच्या लोकांची बाजू नव्हे. यात वेगवेगळ्या प्रवृत्ती आहेत, पण वरील प्रवृत्तीच्या तुलनेने या सर्व प्रवृत्ती निश्चितच जीवनाशी जास्त प्रामाणिक आहेत, आणि त्याचमुळे त्यांचा पहिल्या प्रवृत्तीशी संघर्ष आहे. आपला मार्ग सोडण्याची कुवत नसतानाही आंधळ्या प्रेमाखातर तो मोडायची धडपड, म्हणजे मोहिनी. पण तिलाही हे माहीत आहे की, आपली धडपड व्यर्थ आहे. डॉक्टर ही व्यक्ती पार्टीला येते आणि तरीही ती पार्टीतली नाही. याचे कारण डॉक्टर साहित्यिक वर्तुळातला नाही हे नसून, तो या तथाकथित 'साहित्यिका' पेक्षा जास्त समजूतदार आहे, हे होय. डॉक्टर, सोना, यांनी आपापले मार्ग स्वीकारले आहेत, ते बदलण्याची कुवत त्यांच्यात नाही, पण तरीही त्यांना अमृतचा मार्ग समजतो, आणि तो मार्ग आपल्या मार्गापेक्षा जास्त प्रामाणिक आहे याचेही त्यांना भान आहे. अमृतच्या मृत्यूने दु:ख झाले, ते या दोघांनाच. रंगभूमीवर नसलेला आणि तरीही नाटकात असलेला अमृत हा त्यामुळे संघर्षाचा एक महत्त्वाचा घटक झाला आहे. तोही कधीकाळी पार्टीला येत असावा. पण प्रामाणिक राहण्याची धडपड त्याला दुसऱ्याच मार्गावर, एका वेगळ्याच अंतापर्यंत घेऊन गेली. त्यामुळे रंगभूमीवर तो नसला तरी त्याच्या प्रामाणिकपणाचे नैतिक पाठबळ संघर्षात जितेजागते आहे.

वरील विवेचनावरून असे लक्षात येईल की, ही सर्व पात्रे ही व्यक्तिमत्त्वे नाहीत, तर एखाद्या विशिष्ट प्रवृत्तीच्या विविधांगांची ती प्रतीके आहेत. वैयक्तिक समस्या त्यांनाही आहेत हे खरे, पण त्या समस्यांचा उपयोग संघर्षाच्या तीव्रतेला उठाव देण्यासाठी आहे; आणि त्यामुळे या व्यक्तिगत समस्यांच्या कारणमीमांसेची चर्चा करण्यात, आणि तशी कारणमीमांसा नाटककाराने दिली नाही हा नाटकाचा दोष मानण्यात काही अर्थ नाही. कारण वैयक्तिक समस्यांचा ऊहापोह हे नाटकाचे ध्येय नसून संघर्षाचे स्वरूप स्पष्ट करणे हे आहे. उदाहरणार्थ, सोनाचे पार्टीतून बाजूला पडणे, सोनाचे प्रेम आणि तिचे मूल, व आगाशांनी सोनाला घातलेली मागणी या गोष्टी जशा सोनाचा प्रामाणिकपणा दाखवतात, तसेच वृन्दा आणि अमृतचे संबंध; आणि तिचे भारत आणि आगाशांशी वर्तन या गोष्टी वृन्दाच्या अप्रामाणिकपणाला उठाव आणतात. तेव्हा या अनुत्तरित समस्यांचे प्रयोजन केवळ संघर्षाच्या दोन बाजू स्पष्ट करण्यापुरते आहे. नाटकातील पात्रे व्यक्तिमत्त्वे म्हणून मानल्यास या समस्यांना उत्तरे शोधावी लागतील; प्रतीके मानल्यास नाही.

खरे म्हणजे या वैयक्तिक समस्यांच्या पार्श्वभूमीमुळेच एक मूलत: बुद्धिजन्य संघर्ष नाट्यमय झाला आहे. पर्यायाने नाटकाचा प्रयोग अत्यंत परिणामकारक होतो.

अभिनयाविषयी पाहता, अशा प्रकारच्या संघर्षात अभिप्रेत असणारी तरलता काही कलाकारांनी, विशेषत: बर्वे, भारत यांनी एका अधिक ढोबळ पातळीवर नेल्यासारखी वाटते.

इंग्रजी वाक्यांची काही ठिकाणी खटकणारी फेक, बालगंधर्व रंगमंदिरातील ध्वनिक्षेपण, अशा किरकोळ बाबी सोडल्या तर दिग्दर्शन, नेपथ्य आणि नाट्यप्रयोगात कोणतीही उणीव वाटत नाही.

शेवटी, माझी आपली एक कल्पना, नाटकाच्या नावाबद्दलची. लेखकाला काय म्हणायचे असते हे मी सांगू नये खरे म्हणजे, पण 'पार्टी' या नावाचा द्व्यर्थी उपयोग केल्यासारखा वाटतो. एक 'कॉकटेल पार्टी' आणि आणि दुसरी-पार्टीला आलेले बहुसंख्य लोक ज्या 'बुद्धिजीवी बहुजनसमाजा'च्या पक्षात मोडतात, ती 'पार्टी.' मी वर केलेल्या विवेचनाला हा एक लहानसा मुद्दा आधार म्हणून धरायला हरकत नाही.

'या संघर्षाचा प्रश्न आता फार शिळा झाला. किती वेळा त्यावर नाटके लिहायची?' असा प्रश्न विचारला जाईल. 'यावर उत्तर काय ते सांगा,' असेही कोणी म्हणेल. मला वाटते, प्रश्नाचे पूर्ण स्वरूप समजल्याखेरीज त्याचे उत्तर सापडायचे

नाही, आणि या प्रश्नाचे स्वरूप अजून पुरेसे उलगडलेले नाही. ते समजण्याच्या दृष्टीने नाटककाराने व नाटककर्त्यांनी एक सफल प्रयत्न केला आहे. ¤

## ३. प्रेक्षकांच्या विचाराची सुरुवात

संजीव मंगरूळकर

अमोल पालेकर आणि त्यांचे सहकारी यांनी नुकताच पुण्यात 'पार्टी' हा नाटच-प्रयोग सादर केला. प्रायोगिक रंगभूमीच्या दृष्टीने लक्षणीय अन् देखणा वाटणारा हा प्रयोग त्याची सहिता आणि कथानक याबाबत मात्र काहींना थोडा वादग्रस्त वाटलेला दिसतो.

नाटकाच्या संहितेचा (script) विचार केल्यास, सर्वप्रथम संहितेचे प्रयोगाशी नाते काय असावे, यावर विचार करावा लागेल. आजवर मराठी रसिकांनी संहितेकडून एका ढोबळ कथानकाबरोबरच साहित्यिक सामर्थ्याचीही अपेक्षा केली. त्यामुळे अर्थातच नाटचामध्ये त्यातील साहित्यालाही एक विवक्षित आणि महत्त्वाचे स्थान आले. त्याला दाद देणारा एक वर्ग तयार झाला. नाटक हे केवळ प्रेक्षणीयच नव्हे तर वाचनीयही असू लागले. संहितेकडे पाहण्याची ही दृष्टी आता बरीच बदलली आहे. आणि तिचा साहित्यिक कल बराच ओसरू लागला आहे. याचा अर्थ तिचे साहित्यिक-मूल्य ढासळले असा मुळीच नव्हे, मात्र तिचा अवास्तव साहित्यिक-फुलोरा झडून, तिच्या प्रयोगक्षमतेवर अन् आशयगर्भतेवर अधिक कटाक्ष पुरविला जात आहे. यातून नाटकाचे वैचारिक पातळीवर उत्थान होते, ते खूपच सूक्ष्म बनते, मात्र आता त्यात प्रेक्षकाला केवळ निष्क्रिय, तटस्थ राहून चालत नाही, तर या संहितेत त्याचाही एक महत्त्वपूर्ण भाग असतो. त्यामुळे अशी संहिता केवळ रंगमंचावर नटांकरवीच पूर्ण होत नाही; त्याला प्रेक्षकांची बौद्धिक जाणही तितकीच आवश्यक असते. नाटचाच्या या सूक्ष्मतेमुळे, 'पार्टी'मध्ये कथास्वरूप बनून राहिलेल्या संघर्षाचे रंगमंचावरील चित्रण (presentation) खूपच कमी आहे; पण ते अधिक वास्तव आहे. त्यामुळे पार्टीचा शेवट ही प्रेक्षकांच्या विचाराची केवळ सुरुवात ठरते. अर्थात ही जाणीव नसणाऱ्या प्रेक्षकांना प्रयोगात अपुरेपणा वाटणे साहजिकच आहे!

संहितेच्या सूक्ष्मतेमुळेच, या नाटचातून विविध व्यक्तींना जाणवलेले, आशय भिन्न असतील, कारण पार्टीमध्ये मानवी प्रवृत्तींचा संघर्ष केवळ तटस्थपणे चित्रित केला आहे. त्यातून व्यक्तीच्या मनात उठणारी स्पंदने ही केवळ व्यक्तिगत स्वरूपाची असतील आणि ती त्याच्या पूर्वानुभवावर आणि पर्यायाने त्याच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असतील. त्यामुळे अर्थातच संघर्षाचे एकच एक उत्तर अथवा कथावस्तूची संपूर्ण परिपूर्ती आपण संहितेकडून अपेक्षित नाही. ती खूपशी व्यक्तिगत आणि त्यामुळेच प्रेक्षकाला अधिक जवळची असते.

संघर्षाच्या वास्तविक अन् तटस्थ चित्रणातूनच निर्माण झालेले आणखी एक वैशिष्टच म्हणजे प्रस्थापित नायकाचा अभाव! आजवरच्या बऱ्याच नाटकांमध्ये नाटकाचा संघर्ष हा एका व्यक्तीभोवती विशेषत्वाने केंद्रित होई आणि संहिता ही या नाटकाची समर्थक ठरे. यामुळे साहजिकच बराचसा प्रेक्षकवर्गही नायकाच्या दृष्टीतूनच कथावस्तूचे आकलन करत असे. हा संघर्ष अर्थातच आकलनाला सुकर ठरे. 'पार्टी' मध्येही संघर्ष आहे. समाजातील प्रामाणिक-अप्रामाणिक, प्रतिगामी-पुरोगामी, भ्याड, लब्धप्रतिष्ठित या सारख्या विविध प्रवृत्तींचा अटळ संघर्ष त्यात दिसतो पण या संघर्षाला एक नायक नाही; किंबहुना हा संघर्ष हाच या नाटकाचा नायक अथवा केंद्रबिंदू आहे. यामुळे नाटकातील सर्वच पात्रे सारख्याच वजनाची अन् तोलाची वाटतात. नाटकाचा प्रयोग ही एक अधिक व्यापक अर्थाने सामूहिक अभिव्यक्ती ठरते. या सर्व कारणांमुळे, या नाटकाच्या संहितेचा स्वतंत्र विचार करण्याऐवजी त्यांच्या संपूर्ण प्रयोगाच्या परिणामाचा विचार करणे अधिक श्रेयस्कर आणि या प्रयोगाच्या यशस्वितेतच संहितेचे मोठे यश सामावलेले आहे. एलकुंचवारांच्या लेखणीचे हेच सामर्थ्य आहे.

दिग्दर्शक या नात्याने या नाटकातील अमोल पालेकर ह्यांचे यश गौरवास्पद आहे. वरवर काहीसे विस्कळीत वाटणारे हे कथानक त्यांनी अतिशय भरीव पद्धतीने सादर केले. नेपथ्यातली त्यांची कामगिरीसुद्धा लक्षणीय वाटली. रंगमंचाच्या तीन भागांमध्ये एकाच वेळी विलग प्रसंग सादर करीत असतानाच, त्यांनी त्याचा परिणाम मात्र तांत्रिकदृष्टचा खूपच सलग ठेवला. यातून कथानकाला एकसूत्रता येण्यास बरीच मदत झाली. पार्टीच्या रंगतदार पोशाखीपणाचे दर्शन त्यांनी जितक्या समर्थपणे घडविले, तितक्याच मार्मिकतेने या पोशाखामागची दांभिक लाचारी देखील प्रेक्षकांसमोर ठेवली. अभिनयाच्या दृष्टीने विचार केल्यास, एकंदर अभिनयाचा सामूहिक परिणाम चांगला वाटला आणि कथानक नायकप्रधान नसल्याने व्यक्तिगत अभिनयाच्या उणीवा जाणवल्या नाहीत. मात्र या बाबतीत वस्तुतः बरीच पात्रे उणी पडली. विशेषतः बर्वे आणि भारत यांची कामे अगदीच सुमार वाटली. त्यांचा स्टेजवरचा वावर खूपच कृत्रिम आणि नाटकी वाटला. भारतला साजेसे व्यक्तिमत्त्व असूनही त्याचा लाभ उठवला गेला नाही. त्याच्या अभिनयात सतत एकप्रकारची ओढाताण वाटत राहिली. मात्र यातून नाटकाच्या सामूहिक परिणामाला बाध आला नाही. डॉक्टरांचा अभिनय मात्र खूपच परिपक्व आणि संयमित वाटला. आगाशेयांच्या अभिनयातही लक्षात राहण्याजोगे काहीच विशेष वाटले नाही. पालेकरांनी आपली छोटीच भूमिका नेटकेपणाने पार पाडली, मात्र त्यांनी अशी भूमिका होण्यामागचे कारण समजू शकले नाही. त्यांना यापेक्षा महत्त्वाच्या भूमिकेत पाहाण्याची रसिकांची इच्छा होती आणि नाटकात तशी जरूरीही सतत भासत राहिली. स्त्रीभूमिकांमध्ये वृंदा आणि सोनाच्या भूमिका खूपच परिणामकारक वाटल्या. काहीशी तुसडी, स्वाभिमानी अन् प्रामाणिक सोना प्रेक्षकांच्या नक्कीच लक्षात राहील. वृंदाचा पार्टीतला सहज सराईत वावर, अशा वेळी तिचा उतू जाणारा उत्साह, किरकोळ कोटया कुरघोडया करून पार्टीवर जम बसविण्याची तिची लकब आणि सगळयाच्या मुळाशी असलेली एक आतुर प्रौढ कुमारिका–वृंदाचे हे पात्र अनुया पालेकरांनी ताकदीने सादर केले. दयमंती राणे मात्र सुमारच वाटल्या! अभिनयातल्या या कमतरतेमुळे हे नाटक पुष्कळवेळा केवळ दिग्दर्शकाचेच आहे असे वाटते आणि संहितेच्या

क्षमतेचा पुरेपूर आणि योग्य वापर करून पालेकरांनीही त्यावर आपला पूर्ण ठसा उमटविलेला आहे.

नाटकाची प्रकाशयोजना अतिशय अनुरूप, समर्पक आणि संयमित वाटली. तांत्रिक बाबीच्या अतिरेकातून नाटकाचा परिणाम साधण्याचा प्रयत्न केला जात असताना, त्या संदर्भात या संयमित तंत्राचा परिणाम उल्लेखनीय वाटतो. याच दृष्टीने आणखी एक जमेची बाजू म्हणजे पार्श्वसंगीताला दिलेला पूर्ण फाटा ! चांगले नाटक संगीताच्या अनावश्यक कुबडीशिवायच किती जिवंतपणे साकार होऊ शकते याचे प्रत्यंतर यातून येते ! मात्र याचवेळी ध्वनिसंयोजनाच्या सदोषतेचा मुद्दाम उल्लेख करावा लागेल केवळ या दोषामुळे कित्येक प्रेक्षकांपर्यंत नाटक पुरेसे पोहोचूच शकले नाही. हा तांत्रिक दोष वगळता नाटकाचा एकूण परिणाम खूपच सुरेख वाटला.

पालेकरांच्या या प्रयत्नाला मात्र मनापासून दाद द्यावीशी वाटते ! रसिकांच्या प्रायोगिक रंगभूमीवरील अपेक्षा त्यांनी खूपच उंचावून ठेवल्या आहेत. ◻

## ४ : विरत जाणारा नाट्यपरिणाम

विद्याधर पुंडलिक / मुकुंद संगोराम

काही महिन्यांपूर्वी अनिकेत या संस्थेने सादर केलेला बादल सरकार यांच्या 'जुलूस'चा प्रयोग पाहिल्यानंतर त्याच संस्थेनं सादर केलेला 'पार्टी' या महेश एलकुंचवार यांच्या नाटकाचा प्रयोग पाहिला. नाटकाचा आशय आणि अभियक्ती जरी निराळे असले तरी, 'जुलूस'मुळे 'पार्टी' बद्दलच्या अपेक्षा खूपच उंचावल्या होत्या, आणि आता असं म्हणावसं वाटतं, की 'त्या' आशांचं आणि अपेक्षांचं समाधान 'पार्टी'च्या प्रयोगामुळे होऊ शकलं नाही.

मोजून दीड तास चालणारी ही एक पार्टी. पार्टीचं कारण, दिवाकर बर्वे या नाटककाराचा साहित्यिक सन्मान. पार्टीत सुमारे आठ ते नऊजण. प्रत्येकाला आपलं नैराश्य, जीवनातील उणीव वगैरे जाणवली असल्यामुळे बहुधा त्यांचा हा पार्टीचा शौक असावा. नाटकातल्या प्रत्येकाला स्वतःचं असं दुःख आहे की, जे तो स्वतःच भोगतोय. त्या दुःखाची किनार जरी कुठे रुपेरी असली तरी ते दुःख त्या व्यक्तीला जाणवलंय. मग रंगमंचावर प्रत्येकाचं स्वतःचं दुःख सांगण्यासाठी ही पात्रं जमली आहेत का, असा प्रश्न उभा राहतो.

पडदा वर जाताच बेडरूममध्ये सोना दिसते. तिचं दुःख कुमारी मातेचं, पण सबंध नाटकभर तिचा वावर, तिच्या हालचाली या कुठंही या दुःखाचं प्रकटीकरण करताना दिसत नाहीत. हीच गोष्ट इतरांचीही. रंगमंचावर ते दुःख जाणवण्याइतक्या प्रमाणात दाखवलं गेलं नाही हे मात्र खरं !

आता पार्टीचं निमित्त काय ? दिवाकर बर्वे यांच्या साहित्यिक सन्मानार्थ ही पार्टी. पण कुठंही असं दिसत नाही की, पार्टी बर्वेंच्या सन्मानार्थ आहे. बर्वे पार्टीमध्ये इतके 'मर्ज' होतात की, पार्टीतलं त्यांचं महत्त्व कुठं उरत नाही. पार्टीचा विकास मुळी नाट्याच्या अंगाने होतच नाही, या मताचे डॉ. विद्याधर पुंडलिक. नाटकाला नाट्यात्म सूत्र ( unifying dramatic vision ) नसल्यामुळे असेल, पण नाटक कथेच्या अंगानं विकसित होत जातं आणि कथेच्या अंगानं ते विकसित होत गेल्याचा परिणाम म्हणून असेल कदाचित पण कुठंतरी विरळ होत गेलेलं दिसून येतं.

फॉर्मच कथनात्मक असल्यामुळे प्रत्येकजण narration करतो. naration मधून एकच गोष्ट साध्य होते आणि ती म्हणजे माहिती पुरविणे. रंगमंचावर प्रत्येकजण काहीतरी माहिती पुरवतोय असं वाटतं. बरं, ही माहिती पुरेशी नसते की जिच्या आधारे त्या व्यक्तीचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व साकारू शकेल, त्यामुळे तिचा विकासही पूर्णांशाने झालेला दिसून येत नाही. त्यामुळे दोन पात्रांमधे 'संवाद' चाललाय असं वाटतच नाही. प्रत्येकजण आपल्याला त्याची दुःखं कथन करतोय असं काहीसं वाटत. यामुळेच आपण त्या पार्टीत involve होऊ शकत नाही.

आता 'जुलूस'च्या संदर्भात थोडंसं— 'जुलूस' हे सामूहिक जीवनाचं चित्र. जुलूस मधेही 'पार्टी'सारखाच आहे, पण तिथं त्या सबंध समूहालाच एक स्वतंत्र अस्तित्व आहे, आपण कुठंतरी 'जुलूसा'त अडकलो आहोत ही भावना जुलूस पाहताना सतत जाणवते. आणि समूहात शिरला की, माणूस स्वतःचं अस्तित्व विसरून जातो, समूह त्याला भारून टाकतो आणि तो समूहाचाच एक अविभाज्य घटक बनून जातो.

'पार्टी'मधे ग्रुप आहे, त्याला एक अस्तित्वही आहे, पण प्रत्येक पात्राच वेगळेपण (Isolation) सबंध नाटकात असल्याने समूहाचं अस्तित्व विरून जातं, प्रत्येकाचं स्वतःचं अस्तित्व उरतं, निर्जीव.

या पात्रांच्या वेगळेपणामुळे नाटकाचा एकसंधपणा कुठंतरी गमावल्यासारखा वाटतो. दोन पात्रांच्यामधील नातं हे संवादामधून, अभिनयावरून तर जाणवलं नाहीच. त्यामुळे नाटकात net work of relationship चा अभाव जाणवला.

एका पात्राच्या संबंधात मात्र असं म्हणता येत नाही. वृंदा ही कम्युनिस्ट पक्षाची माजी कार्यकर्ती. तिचं दुःख, तिच्या हालचाली, या रंगमंचावरील तिचं महत्त्व स्पष्ट करतात. तिचे भारतशी असलेले संबंध, तिचे आगाशेबरोबरचे संवाद या सर्व ठिकाणी तिचं अस्तित्व कुठंतरी पूर्णांशाने उभं राहिल्यासारखं वाटलं.

बाकीच्या पात्रांच्याबाबत पुन्हा isolation चा प्रश्न उद्भवतो. प्रत्येकजण रंगमंचावर वेगवेगळं असल्यासारखे वावरत होते, त्यामुळे त्या सर्वांमध्ये असं काही नाट्यात्म सूत्र दिसतच नाही. उलट हा 'डिस्कशन प्ले' वाटतो. प्रत्येकाचं अस्तित्व हें दुसऱ्या कशात तरी दिसायला हवं, निदान समूहात तरी. 'पार्टी'मध्ये असं काहीच जाणवत नाही, त्यामुळे दोघांच्या relationship मधून कथाभाग विकसित होत नाही. इथं समूहाचं वर्चस्व न राहता ते त्या त्या व्यक्तीचं राहतं. मग एकसंध परिणाम वगैरे गोष्टी दूरच.

पार्टी मनात काहीच उमटवून जात नाही. 'जुलूस'चा परिणाम हा मनात राहणारा, उरणारा, टिकणारा होता. त्या तुलनेत, 'पार्टी'च्या प्रयोगानंतर मनात कुठलाच परिणाम राहत नाही, ना आपण त्या पार्टीत Involve होतो, ना त्या नाटकाशी एकरूप होतो. एलकुंचवारांच्या या नाटकाला पालेकरांनी आणलेलं नाट्यात्मक परिमाणसुद्धा कुठंतरी कमीच पडलं असं सतत भासतं.

नवनाट्यातील हे प्रयोग विचार करायला लावणारे असतात हे मात्र खरं ! ◻

हिंदी चित्रपट



# रंगीला रतन

## श्रीमंतांसाठी डोंबाऱ्याचा खेळ

हिंदी सिनेनिर्मितीमध्ये काय किंवा एकंदरीतच चित्रसृष्टीत काय, कुणी उठून काय काय म्हणून करावं याला काही धरबंधच राहिलेला नाही खरा. पूर्वी जी क्षेत्रं खास कलाकारांसाठी किंवा ज्ञात्यांसाठी राखीव म्हणून समजली जायची, त्यांच्यावर आता कुणीही येऱ्यागबाळ्यानं आक्रमण केल्याचं दिसतं. एरवी मटकाकिंग म्हणून गाजलेल्या रतन खत्रीनं चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात घुसायचं काय कारण होतं? पण इतर सर्व पापं करून भागल्यासारखा, त्यानं रंगीला रतन नावाचा एक चित्रविचित्र चित्रपट काढला आहे. त्यात त्यानं एक खास भूमिकाही केल्याची बातमी आहे, तथापि मटकाकिंगसारख्या बड्या बड्या असामींशी माझ्यासारख्याचा कधीच काही संबंध यायची शक्यता नसल्यानं मी त्याला पडद्यावर ओळखू शकलेलो नाही. बहुधा त्यानं कर्तव्यदक्ष सी. आय. डी. इन्स्पेक्टरची भूमिका वठवली असणार.

'रंगीला रतन' सुरू होतो तो सूडकथेच्या वळणानं. आपल्या मुलानं खून केल्यानंतर त्याला फाशीची सजा व्हायला कारणीभूत ठरलेल्या सरकारी वकीलसाहेबांचा (अशोककुमार) सूड घेण्यासाठी पठाण (अजित) एक विलक्षण डाव रचतो. त्याच्या छोट्या मुलाला पळवून नेऊन त्याला तो डोंबारी कम् उचल्या चोर म्हणून तयार करतो. मुलगा किशन (ऋषिकपूर) त्याच्या तावडीतून सुटायचे निष्फळ प्रयत्न करीत असतानाच पठाण, त्याच्या हातून नकळत वकीलसाहेबाच्या दुसऱ्या मुलाचा खून झाल्याचा आभास निर्माण करतो. डॉ. आनंद (डॉ. श्रीराम लागू)च्या आधाराने नवीन जीवन सुरू करायच्या प्रयत्नात असलेल्या *किशन ऊर्फ रतन ऊर्फ गोपालला* अखेर आपल्याच वडिलांसमोर खुनी म्हणून न्यायासाठी उभं राहायची वेळ येते आणि अजितचा सूड यशस्वी झाल्यासारखा दिसतो. अर्थात प्रत्यक्षात योग्य त्या आडवळणानंतर अजितच खरा खुनी असल्याचे सिद्ध होते वगैरे वगैरे. सेन्सॉरच्या निर्बंधांच्या कैचीत सापडलेल्या आणि बरीच उलथापालथ करून सुटलेल्या चित्रपटांपैकी हा एक. याच्या खुणा जागोजाग जाणवल्याशिवाय राहत नाहीत. त्यामुळेच की काय, फटाफट मारामाऱ्या होऊन फट् म्हणता हत्या होण्याऐवजी इथे हृदयपरिवर्तन होतं. अगदी चक्क हृदयपरिवर्तन; राजस्थानच्या दरोडेखोरांची होतात तशी. डॉ. आनंदच्या किरकोळ लेक्चरपाठोपाठ किशनमहाराज गुन्हेगारी सोडून कष्टाची कमाई करून जगायला लागतात. यात तो जी कामं करताना दाखवलाय् ती पाहून प्रेक्षकांचंही हृदयपरिवर्तन कसं होत नाही, काही कळलं नाही. एवढ्या गोष्टी येणारा माणूस रस्त्यावर पडणं शक्यच नाही. ऋषिकपूरनं यातल्या डोंबाऱ्याच्या खेळाच्या निमित्तानं नाचगाण्यांचा भरघोस हंगामा घालण्याची संधी साधली आहे. नाच आणि चोऱ्या करून फावल्या वेळात त्यानं परवीन बाबीसारख्या श्रीमंत बापाच्या लाडक्या एकुलत्या एक देखण्या मुलीवर प्रेमही करून टाकलं आहे. तिची व्यक्तिरेखा मूळ कथानकाच्या पंचक्रोशीच्या आसपासही फिरकत नाही. कृत्रिमरीत्या पार पाडल्यासारखी वाटणारी ही भूमिका परवीननंही तितक्याच कृत्रिम अभिनयानं आणि काहीशा बेपर्वाईनं ओढून टाकली आहे. सिनेमाभर ती दिसते बरी, त्यामुळे असह्य होत नाही एवढेच. कुठलंही पात्र किंवा कोणतीही घटना तर्कबुद्धीला सुसंगत वाटेल, खरी वाटेल अशी दाखवायची नाहीच असा चंगच बांधून आल्यासारख्या कथाकार–दिग्दर्शकांनी, डोकं घडावरच ठेवून चित्रपटाला आलेल्या मूर्ख प्रेक्षकांवर भीषण सूड उगवला आहे, तेव्हा त्याही अर्थानं ही सूडकथा होतेच. संगीतकार कल्याणजी आनंदजी यांनी आपल्या (आणि इतरांच्याही) निरनिराळ्या चित्रपटांतल्या बऱ्याबऱ्या tunes उचलून त्यांचा मोठ्या सफाईनं वापर केला आहे. कुणावरही अन्याय होऊ दिलेला नाही. आता त्या सगळ्यात *संगीत कुठं सापडत नाही हा काय त्यांचा* दोष? उद्या प्रेक्षक, खुशाल आपले या 'रंगेल रत्ना'मध्ये दिग्दर्शन आणि अभिनय सापडत नाही म्हणून तक्रार करतील. आफ्टर ऑल, हा सगळा एक डोंबाऱ्याचा खेळ आहे. अर्थात तो फक्त श्रीमंतांसाठीच आहे. कारण गरीब (आणि शहाणे) लोक असल्या खेळाला तीन तीन रुपये कसे मोजतील?

—शिरीष सहस्रबुद्धे

या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत : दहा रुपये**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २५।९।७६ ते १।१०।७६

**मेष : महत्त्वाच्या कामात यश**

गुरू दुसरा, शनी चौथा, शुक्र ५ वा व रवि–मंगळ सहावे अशी यावेळी तुमची ग्रहस्थिती आहे. महत्त्वाची कामे करून घ्यायला हरकत नाही. स्थावर नोकरीतील प्रमोशन, बदली, बेकारीचे निरसन अर्ज अशा अनेक बाबतीत आठवडा यश देणारा आहे. उच्चपदस्थांच्या गाठीभेटी घेऊन आपले काम कौशल्याने साधा. विरोधकदेखील यावेळी सहकार्य देतील. प्रगतीची गाडी भरधाव वेगाने नेणारा हा सप्ताह आहे. पांचवा शुक्र कलाक्षेत्रात नावलौकिक व प्रसिद्धी देईल. भोवतालच्या लोकांत लोकप्रियता वाढवील. शुभ दिनांक २५–२९

**महिलांना :** गायिकांच्या मैफली गाजतील. बरेच काही चांगले घडेल.

**विद्यार्थ्यांना :** नवे क्षेत्र पादाक्रांत करा. अपेक्षा उंचावतील.

**वृषभ : रवि–मंगळ लाभदायक**

अनेक प्रकारच्या कटकटीतून तुम्ही यावेळी मुक्त होणार आहात. पांचवे रवि–मंगळ तुम्हाला सारे काही देणार आहेत. मनाची कुचंबलेली स्थिती सावरून नवे ध्येय व नवा उद्योग यांत तुमचा प्रवेश होणार आहे. उत्साह उचंबळून येईल, नोकरी करणाऱ्यांना फार छान काळ आहे. वरिष्ठांची मर्जी राहील. इतकेच नव्हे तर, त्यांच्यावर तुमचा प्रभाव राहील. त्यामुळे अनेक कामे फायदेशीर होतील. चालू धंद्याचे तंत्र बदलण्यात यश येऊन नवे आत्मसात करू शकाल. भांडवलाचा पुरवठा होईल. येणे वसुली होईल तर देणे देण्यासाठी सवलत मिळेल. तब्येत सुधारेल. शुभ दिनांक २६–२८

**महिलांना :** स्वतंत्र उद्योग व नोकरी प्रगतीची वाटचाल करील.

**विद्यार्थ्यांना :** विशेष दर्जाची परीक्षा द्या. पास व्हाल.

**मिथुन : मन:स्थिती नाजूक राहील**

दुसरा शनी साडेसातीचा आहे. आर्थिक परिस्थिती डळमळत ठेवणार आहे. पैसा येईल व जाईल. गुरू बारावा आहे तो अविचार करण्याची वृत्ती निर्माण करील पण यावेळी तुमची खरी कसोटी लागणार आहे. सुखस्थान प्रतिकूल आहे. मन उद्विग्न राहील. कोणती ना कोणती काळजी लागून राहील. पैशाची काळजी तात्पुरती दूर होईल. स्थावराचा व घराचा प्रश्न चिंतेचा बनण्याचा संभव आहे. मित्र–नातेवाईक यावेळी सहकार्य देणे कठीणच आहे. वरिष्ठ जागेवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोकरीत दक्ष राहणे आवश्यक आहे. शुभ दिनांक २९–३०

**महिलांना :** माहेरच्यासंबंधांत थोडाफार बिघाड येण्याची शक्यता आहे.

**विद्यार्थ्यांना :** यावेळी प्रयत्नावर भर देणे आवश्यक आहे.

**कर्क : गुणांना संधी**

पराक्रमात रवि–मंगळासारखे असामान्य ग्रह असताना माणसाच्या कर्तृत्वाला बहर येतो. आकांक्षा पालावत व महत्त्वाकांक्षेचा पतंग आकाशात झेप घेत असतात. मित्रहो, तुमच्या वाट्याला कित्येक दिवसानंतर इतके छान ग्रहमान आले आहे की, यावेळी तुमच्यातील सुप्त गुण जागृत होतील व ते निरनिराळ्या क्षेत्रांत तुमच्याकडून कर्तबगारी गाजवून घेतील. राजकारणात आता तुमचा मार्ग चालू झाला तर आश्चर्य मानू नका. नोकरीत प्रमोशनवर बदली होणार आहे. बेकारांचा वनवास संपला आहे. आर्थिक बाजू यावेळी भक्कम होईल. रेस, लॉटरीत नशीब उजाडेल. धंद्यांत यश हातात पडेल. शुभ दिनांक २६–२८

**महिलांना :** नोकरीत महत्त्वाकांक्षा सफल होतील. माहेरची मदत मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** संशोधन क्षेत्रांत प्रगती करू शकाल.

**सिंह : राजकारणात प्रतिष्ठा**

प्रामुख्याने तुमची रास ही राजकारणात तुमचे कर्तृत्व पणाला लावणारी व ते गाजवणारी आहे. या वेळी राशीस्वामी रवी मंगळाबरोबर दुसरा झाला आहे तो वाईट नाही. तुमच्या बाबतीतील अनेकांचे अंदाज फसणार आहेत व विरोधकांच्यापुढे तुम्ही यशस्वीपणे न उकलणारे कोडे उभे करणार आहात. नोकरीतील अडथळे दूर झाले आहेत. मालक व वरिष्ठांच्या मनातील गैरसमज दूर होऊन तुमच्या प्रगतीचा मार्ग खुला झाला आहे. मनाप्रमाणे बदली करून घेऊ शकाल. आर्थिक कोंडी हळूहळू फुटेल. मात्र यावेळी तुम्हाला पैशाची अडचण फारशी पडणार नाही. यावेळी काही चांगले घडू शकेल. शुभ दिनांक २८–२९

**महिलांना :** प्रतिष्ठा उंचावणारी घटना नोकरीत घडणार आहे.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल.

**कन्या : प्रतिष्ठा वाढणार आहे**

राशीत असलेल्या रवी-मंगळाच्या सहवासाची तुम्ही भीती बाळगू नका. उलट तुमच्या प्रगतीचे व कर्तबगारीचे पत्ते त्यांच्याच हाती आहेत हे लक्षात ठेवा. मान व प्रतिष्ठा आपणहून चालत येईल. सार्वजनिक क्षेत्रांत कर्तृत्व चमकेल. नवे क्षेत्र उपलब्ध होईल. लेखन, साहित्य प्रसिद्धीने लोकप्रियता वाढेल. नोकरीत वरिष्ठांवर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडून तुमचा गुणांना नवी संधी मिळेल. आर्थिक बाजू सुधारेल. ओढाताण दूर होईल. कौटुंबिक संबंधात अनुकूल बदल होऊन नवे संबंध प्रस्थापित होतील. शुभ दिनांक २५-२९

**महिलांना :** मानसिक व कौटुंबिक स्वास्थ्य चांगले मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** लेखन, वाङ्मय क्षेत्रांत पाऊल पुढे पडेल.

**तूळ : खर्च आटोक्यात ठेवा**

शनी हा तुमचा मित्र असून तो तुमचे कल्याण करतो हे खरंच आहे. तो सध्या दहावा आहे त्यामुळे नोकरी व धंदा प्रगतीच्या वाटेवर वेगाने वाटचाल करीत आहे, हेही खरे. तरीपण रवी व मंगळ सध्या बारावे आहेत व ते अनेक अडथळे निर्माण करण्याची वाट पाहात आहेत. प्रामुख्याने आर्थिक बाजू कमकुवत ठेवण्याचा त्यांचा कल आहे. इतून

काही काम न होणे, आळस वाटणे, आलेली संधी गमावण्याची पाळी येणे असे काही तरी घडू लागणार आहे. हाती आलेला पैसा फार काळजीपूर्वक वापरा. मूळचे ग्रह चांगले असतील तरच रेसमधे पैसे मिळतील. तब्येतीची काळजी घ्या.

**महिलांना** : रक्तदाब असलेल्या महिलांनी नोकरीत जास्त श्रम करू नयेत.

**विद्यार्थ्यांना** : नियमाच्या व कायद्याच्या विरुद्ध वागू नका.

**वृश्चिक : पैसा मिळेल**

पैसा मिळून खर्च झाला तर, कर्जाचे डोंगर उभे राहत नाहीत. हर्शल व राहू तुमची आर्थिक पुंजी कुरतडीत असले तरी, रवी-मंगळ ती तुम्हाला भरभरून देणारे आहेत. त्यामुळे काळजी करण्याचे कारण नाही. रेस व लॉटरी, व्यापारी वायदे, खेळणी इत्यादी क्षेत्रांत तुमच्या हातात 'घबाड' पडणार आहे. कर्जातून मुक्त होण्याचा काळ जवळ आला आहे. धंद्यातील अडचणी निवारण होऊन नव्या योजना कार्यान्वित होऊ शकतील, एखादा नवा धंदादेखील उभा करू शकाल. नोकरीत आशाआकांक्षा सफल होतील. प्रमोशन मिळेल. शुभ दिनांक २७–२९

**महिलांना** : लॉटरीत व स्थावराचा वारसा मिळून मन आनंदी राहील.

**विद्यार्थ्यांना** : नोकरी मिळून शिक्षणाचा खर्च परस्पर निघेल.

**धनु : धंदा वाढेल**

दहावे स्थान हे नोकरी, धंदा इत्यादींसंबंधी मार्गदर्शक आहे. रवि-मंगळ दशमस्थानी ही एक मोठी पर्वणीच म्हटली पाहिजे. या दोन्ही ग्रहांचे एकमेकांबरोबर पटत नसले तरी, स्थानमहात्म्य आहे. तुमच्या धंद्यातील मंदीची व अडचणीची परिस्थिती आता संपून प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल. प्रामुख्याने अर्थ परिस्थिती चांगलीच सुधारेल. अनपेक्षितपणे पैसे मिळू शकतील. व्यापारातील अंदाज अचूक ठरतील. अनेकांचे सहकार्य मिळेल. नव्या धंद्याची सुरुवात याचवेळी करायला अनुकूलता आहे. नोकरीत आशाआकांक्षा पालवतील. चांगले संबंध प्रस्थापित होतील. शुभ दिनांक २७–२९

**महिलांना** : बेकारांना चांगली नोकरी मिळेल. पैसा मनासारखा खर्च करता येईल.

**विद्यार्थ्यांना** : मनातील स्वप्ने साकार होतील.

**मकर : उत्कर्षकारक**

शनि–गुरू यांसारखे ग्रह जरी तुम्हाला म्हणावी तशी साथ देत नसले, तरी रवि–मंगळ हे भाग्यस्थानी असलेले ग्रह तुम्हाला भरपूर साथ देत आहेत. यावेळी सर्व प्रकारच्या अडचणीवर मात करून तुमचे पाऊल सर्वच क्षेत्रांत प्रगतीपथावर पडणार आहे. चालू धंद्यांत नव्या योजनेची सुरुवात कराल तर नव्या धंद्याची सुरुवात करू शकाल. शेती उत्तम होईल. व्यापार तेजीत येईल. तोटा भरून निघेल. शेतीचे अंदाज अचूक ठरतील. रेस व लॉटरीत लाभ होईल. नोकरीत वरिष्ठ दर्जाचे अधिकार हाती येतील. कामाचे चिज होईल. शुभ दिनांक २९–३०

**महिलांना** : सार्वजनिक क्षेत्रात मोठी प्रतिष्ठा मिळेल. नोकरीत बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : प्रवासाचे बेत पार पडतील.

**कुंभ : आशादायक काळ**

अनेक ग्रह अनुकूलतेकडे जात आहेत. गेले काही दिवस तुमची होत असलेली कुचंबणा थांबणार असून आता जीवनात काही तरी नवे भरीव घडणार आहे. यावेळी तुम्ही राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळवणार आहात. मोठी प्रतिष्ठा मिळणार आहे. सत्ता व नोकरी उंचावणार आहे. प्रमोशन मिळणार असून मिळकतीत भर पडणार आहे. हेतू–पूर्तीचे समाधान मिळणार आहे. वकिलीचा व्यवसाय उत्तम चालणार आहे. धंद्यांतील मंदीची परिस्थिती नाहीशी होईल. नवे मार्ग उपलब्ध होतील. आशाआकांक्षा सफल होण्यासारखा काळ जवळ येत आहे. शुभ दिनांक २९–३०

**महिलांना** : स्वप्नपूर्तीचे समाधान लाभेल. नोकरीत बढतीचा योग आहे.

**विद्यार्थ्यांना** : नवे नवे मार्ग उपलब्ध होतील. मदत मिळेल.

**मीन : साधारण अनुकूलता**

एकटा गुरू तुमचे मनोरथ पुरे करू शकेल. शनि–रवि–मंगळ वगैरे ग्रह तेवढेसे वाईट नसले तरी, त्यांच्या हातून तुमचे कांही भले करणे होईल यावर तुम्ही विसंबून राहू नका नोकरीत वरिष्ठांची मर्जी कशी राहील यावर विचार करा. मतभेद वाढवू नका. चालू धंद्यांत बरकत येईल. हळूहळू अनुकूलतेची चाहूल लागेल. लेखनाची सवय लागेल. वाङमय–साहित्य अर्धवट राहील वैयक्तिक जीवनात मतभेद वाढवू नका. मिळतेजुळते घेणे आवश्यक आहे. बाहेरच्या माणसांना हात घालू देऊ नका. आर्थिक परिस्थिती व आरोग्य समाधानकारक राहील. शुभ दिनांक २६–२९

**महिलांना** : कौटुंबिक स्वास्थ्य कसे मिळल याची अधिक काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना** : प्रेमाच्या भानगडीत न पडणे हिताचे ठरेल. □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०